म. ग्रं. सं.
विषय : निबंध
सं. क्र. ३७९२

# संघ संस्कारांची बलस्थाने

लेखक : उत्तम कानिटकर

REFBK-0026855

भारतीय विचार साधना, पुणे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

3 1 JAN 1996

( क्र. मा. पहा )
१००००–११–८९

# संघ-संस्कारांची बलस्थाने

प्रा. उत्तम कानिटकर

REFBK-0026855

भारतीय विचार साधना, पुणे

**❁ प्रकाशक :**
बं. शं. दाते
भारतीय विचार साधना, पुणे प्रकाशन.
१८४७ सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०

**❁ प्रथम आवृत्ती :**
ऑगस्ट १९९२, कलियुगाब्द ५०९४

**❁ मूल्य रुपये : १५/-**

**❁ संगणक अक्षरसंयोजक :**
ज्ञानमुद्रा
१८४७ सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०

**❁ मुद्रक :**
आयुर्विद्या मुद्रणालय
९९२ सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०

**© सर्व हक्क प्रकाशकाधीन**

# दोन शब्द

मित्रांनो,

प्रिय रामदासजी कळसकरांच्या प्रेमळ आग्रहामुळेच ही लेखमाला १९८३-८४ मध्ये माझ्या हातून लिहून झाली. 'एकता' मासिकाचे सिद्धहस्त संपादक, तत्पूर्वी संघाचे प्रचारक, भारतीय जनसंघाचे खंदे कार्यकर्ते म्हणून तर ते सर्वांना परिचित आहेतच, पण संघसंस्कारांतून कर्करोगासारख्या दुर्धर संकटाशी हसत हसत १२ वर्षे झुंझण्याची शक्ति त्यांच्यामध्ये उत्पन्न झाली होती, आणि त्या दिवसातही ते सर्व प्रकारच्या जबाबदाऱ्या धडाडीने पेलत होते. अलिकडच्या काळातला हा एक पराक्रमच म्हणायचा! त्यांच्या इच्छेप्रमाणे या लेखमालेचा दहावा लेख प्रकाशित झाला, आणि पुढच्याच महिन्यात ते स्वर्गवासी झाले. केवळ स्नेहापोटी हा संग्रह प्रिय रामदासजींच्या स्मृतीला अर्पण करीत आहे. अकरावा लेख नंतर जोडला आहे.

संघाच्या महाकोशल प्रांत-कार्यालयाने या लेखमालेचा हिंदी अनुवाद (अनुवादक : श्री. बापूराव सरदेसाई, भोपाळ) प्रकाशित करून आधीच संपूर्ण देशात प्रसारित केला. मूळ मराठी लेखांचे हे संकलन आता महाराष्ट्रात भारतीय विचार साधनेच्या परिश्रमाने प्रकाशित होत आहे याचा आनंद वाटतो.

संघातले संस्कार कोणत्या बलस्थानांवर आधारलेले आहेत हे समजून घेण्याची इच्छा असलेल्या कुणालाही हे संकलन उपयोगी पडावे म्हणून वेगळ्या पद्धतीने सारा विषय मांडण्याचा प्रयत्न केला आहे. कार्यकर्त्यांच्या त्यावरील चिंतनपर सूचनांचे स्वागत!

**– उत्तम कानिटकर**

६२९, सदाशिव पेठ,
फडतरे चौक, पुणे ३०
(२७-८-१९९२)

मिळाले 3498 २६८५५ २६।२।८३

# १

**येरवड्याच्या कारागृहातला प्रसंग. अनेकांचे नित्य येणे जाणे माननीय बाळासाहेब देवरसांच्या खोलीवर असे. ते सारेजण बाळासाहेबांना नेहमी प्रश्न विचारीत, संघ एवढा मोठा कसा झाला?**

**अनेकांना हे कोडे आहे. ना राजाश्रय ना धनाश्रय. शून्यातून विश्व उभे करणाऱ्या डॉक्टर हेडगेवारांजवळ कोणती जादू होती?**

**संघाची बलस्थाने कोणती?**

संघाचे काम आपल्या देशात सुरू झाल्याचे आता सातवे दशक चालू आहे. संघाच्या स्थापनेच्या वेळी डॉक्टर हेडगेवारांजवळ गोळा झालेल्या दहा-पंधरा वर्षांच्या मुलांच्या कुशपथकातले श्री. बाळासाहेब देवरस आज संघाचे सरसंघचालक आहेत. म्हणजे इतक्या वर्षात, त्यांच्या पहिल्या पिढीपासून आज जे बाल स्वयंसेवक संघात आहेत ती सहावी पिढी म्हणायची. साधारणपणे कार्यकर्त्याच्या घडणीचा काल दहा वर्षांचा समजून मी हे म्हणतो. प्रश्न गणिताचा नाही, विषय समजण्यासाठी हे सोयीचे इतकेच. या सहा पिढ्या संघात आजही एकाच वेळी काम करीत आहेत हे एक मोठेच देखणे लक्षण आहे.

शिवाय सर्वसाधारण कुटुंबांतून आलेली ही हजारो माणसे संघाच्या प्रेरणेतून मोठमोठी कामे करून गेली आहेत. त्यांना आपापल्या कौटुंबिक जबाबदाऱ्या आहेत, मर्यादित उत्पन्नात तोंडमिळवणी करण्याची चिंता आहे,

घरगुती अडीअडचणी आहेत, आयुष्यात येणारे बरे वाईट प्रसंग आहेत. सर्वसंगपरित्याग करून एखाद्या श्रेष्ठ कामाला वाहून घेणे सोपे नाही; अशा वाहून घेतलेल्या माणसालासुद्धा किती मनाची तयारी आणि निर्धार करावा लागतो. आणि संघासारख्या विराट लोकसंग्रहाच्या कामत साहजिकच नित्याचे साधारण माणसाचे जीवन कंठणारेच मोठ्या संख्येने असणार. अशा माणसांमध्ये काही कर्तृत्व करून दाखविण्याची ऊर्मि संघाच्या वातावरणात उत्पन्न होते, हा पाच पिढ्यांचा अनुभव आहे. कुणी पूर्ण वेळ आणि कष्ट देऊन कामाला लागले. त्यातले काहीजण सारे आयुष्य समर्पित करून काम करीत आहेत. इतर बहुसंख्य आपापला उद्योगधंदा सांभाळून, कुटुंबाच्या सर्व काळज्या घेतच पण मुद्दाम वेळ आणि कष्ट देऊन संघाचे काम करतात. सामान्य माणसांनी, असामान्य प्रयत्नांनी आजवर हा संघ असा वाढवला. वर्षानुवर्षे न थकता कष्ट करून वाढवला.

**कशामुळे? :**

अकृत्रिम प्रेम आणि स्नेहाच्या वागणुकीने संघाचा कार्यकर्ता लोकांना जवळ आणतो. कुठली लालूच दाखवीत नाही, कुठल्या स्वार्थाला फुलवीत नाही. हा झाला संघाच्या कामाचा एक पैलू. पुढे अशा जवळ आलेल्या माणसांना संघ काय सांगतो? कोणती प्रेरणा देतो? आज आपले-आपले पाहणाऱ्या, संकुचित, स्वार्थी, भ्रष्टाचारी जगात त्यांना वावरावे लागते अशीच ही सारी माणसे; नाइलाजाने त्या साऱ्या गदारोळातून वाट काढीत आपले जीवन जगत असतात. संघाच्या जवळ आल्यानंतर त्यांच्यामध्ये दुष्टतेला तोंड देण्याची हिंमत कशी येते? त्यांच्या जीवनाला कुठला उद्देश प्राप्त होतो? कोणत्या नव्या दृष्टीचा लाभ त्यांना होतो? कशामुळे सर्वसामान्य जीवन कंठीत असतांनादेखील काही भले काम करण्याची प्रवृत्ति आणि शक्ति त्यांच्यामध्ये येते? कुठले असे संस्कार संघाच्या वातावरणात होतात?

वास्तविक हे असे संघात घडत आले आहे, की गोष्ट आता अनुभवाने सिद्ध झालेली आहे; आणि समाजाची, समाजशास्त्राची, आजच्या स्थितीची चिंता करणाराला हा प्रश्न पडला पाहिजे की, देशभरात प्रामाणिक आणि झडझडून काम करणारांची वानवा, चांगल्या चारित्र्याचे संकट, दिशाहीनता यांची बजबजपुरी झालेली असताना, या संघात अशी कुठली

प्रेरणा मिळते? त्यातूनच आलेल्या, एक नव्हे, दोन नव्हे, हजारो माणसांवर कोणता असा परिणाम होतो की ज्यामुळे ती निरपेक्षपणाने वेळ आणि कष्ट खर्ची घालायला तयार होतात? हा वास्तविक आता एक अध्ययनाचा विषय झाला पाहिजे. निदान संघाच्या कार्यकर्त्यांनी आपण होऊन याचे अध्ययन केले पाहिजे. संघसंस्कारांचा प्राण नेमका कशात आहे याची जाणीव कार्यकर्त्याला स्पष्ट असली पाहिजे, कारण तोच संघाचा कामाचा दुसरा पैलू आहे.

**तयासी तुळणा कैची :**

असा विचार करू लागले म्हणजे संघाच्या संस्कारांची काही महत्त्वाची बलस्थाने आपल्या लक्षात येतात. ओळीने विचार करता करता, बघण्याची दृष्टी स्वच्छ होत जाते. या बलस्थानांची जाणीव आणि अनुभूति संघाच्या कार्यकर्त्याला असायला हवी. संघासारख्या शाखा चालवण्याचा, परेडी करण्याचा प्रयत्न अनेकांनी करून पाहिला पण ते फजीत झाले. नेमके काय संघात आहे, सांगितले जाते, आचरले जाते ज्यामुळे संघाच्या शाखेसारखी संघाचीच शाखा (रामरावणांचे युद्ध रामरावणांच्या युद्धासारखे, त्याला दुसरी उपमा नाही, तसे) असू शकते? कोणती आहेत ती संघसंस्कारांची बलस्थाने, ज्यामुळे संघाच्या या विशाल सामाजिक प्रयोगातून तेजस्वी, कर्तृत्ववान, समर्पण करणारी माणसे निर्माण होत आहेत, सहा पिढ्या हा जगन्नाथाचा रथ हिंमतीने खेचीत आहेत, हे जाणून घेण्यासाठी संघसंस्कारांच्या बलस्थानांचा आपण अभ्यास करू या. जेथून संघाच्या कामाला शक्ति मिळते, संघाचा माणूस घडतो, त्या काही गोष्टींचा विचार करू या. त्यापूर्वी सुरुवातीला मात्र येथे एकच खुलासा करायचा. लोकसंग्रह, स्नेहाचा व्यवहार, संघटनेचा मंत्र आणि तंत्र हा पैलू नंतर विचारात घ्यायचा; सुरुवातीला 'संस्कारांची बलस्थाने' कोणती ते पहावयाचे.

**आपलेपण :**

माणसाचा स्वभाव असा आहे की एखाद्या गोष्टीबद्दल त्याला आपुलकी वाटत असेल तर त्यासाठी तो जीवन ओवाळून टाकायला तयार होतो. माणसाच्या आपुलकीची मर्यादा एकट्यापासून वाढत वाढत विश्वापर्यंतही जाऊ शकते.

पण एवढे मात्र खरे की एकदा एखाद्या गोष्टीला आपले म्हटले की, मग मात्र, एरवी आपले-आपले एकट्याचे किंवा कुटुंबापुरते पाहणारा

माणूसदेखील, त्याकरता वाटेल ती झीज सोसायलासुद्धा तयार होतो. एरवी स्वार्थाच्या मागे लागलेला माणूस एखादा उदात्त विचार घेऊन जर निघाला तर कल्पनाही येणार नाही असा पराक्रम करून जातो. मग त्याला दुसऱ्या कुणी 'असे कर' म्हणून सांगावे लागत नाही. नियमावली तयार करून द्यावी लागत नाही. त्याच्या त्या श्रद्धास्थानाच्या हितासाठी काय करावे, काय टाळावे हे त्याला आपोआप सुचते. हाच तो स्वतःपुरते पहाणारा, भित्रा, संकुचित, प्रत्येक गोष्टीतून मला काय मिळेल याचा हिशेब करणारा माणूस का, अशी शंका यावी इतके मोठे काम, माणूस अशा एखादा श्रद्धास्थानाकडे वळला म्हणजे करू लागतो! मग त्याची पाहण्याची, विचार करण्याची दृष्टीच बदलते, तो स्वतःला झोकून द्यायलाही तयार होतो.

**आपली भारतमाता :**

संघाच्या संस्कारात पहिला धडा डॉक्टरांनी सर्वांपुढे ठेवला तो हा, की ही आपली **भारतमाता** हजारो वर्षांच्या आपल्या जीवनाची जननी आहे आपली मातृभूमी हाच आपल्या राष्ट्रजीवनाचा गाभा आहे. जमीन, हवा व पाणी या गोष्टी मुबलक देऊन तिने आमचे मातेप्रमाणे पालनपोषण केले; सुखी आणि निरोगी जीवन जगण्यासाठी आवश्यक अशा साऱ्या गोष्टी तिने आपल्याला दिल्या; प्रचंड पर्वतांच्या तटाआड ती पित्याप्रमाणे आपले संरक्षण करते, इतकेच नव्हे तर तिच्या नद्यांच्या काठी वनात वर्षानुवर्षे कठीण तपस्या करणाऱ्या शास्त्रज्ञ-ऋषींनी आपल्या प्रगतीचा आणि मनाच्या शांतीचा मार्ग दाखवून दिला आहे. थोडक्यात म्हणजे आपली भारतभूमि आपली माता, पिता आणि गुरू यांचीच मूर्ति आहे. संघाच्या संस्काराचे पहिले प्रबलस्थान म्हणजे आपली ही भारतमाता, आणि आपण सारे हिचे पुत्र, ही जाणीव!

**हा आंधळेपणा नव्हे :**

परदेशी लोकांनी आपल्या भावनेची थट्टा केली. दगड, माती, पाणी खनिज यांनी भरलेली इतर जमिनीसारखी ही जमीन; हे भारतातले लोक बावळटच म्हणून त्या जमिनीलाच आई काय मानतात, दगडधोंड्याची पूजा काय करतात, पहाडांना वडील समजतात, झाडांना फेरे काय मारतात! साधारणपणे प्रत्येक गोष्ट आपल्या बुद्धीला पटली तरच मानणारा भारतातला बुद्धिवादी माणूसदेखील म्हणतो, 'ठीक आहे या जमिनीने

आपल्याला अन्न दिले, पाणी दिले, आधार दिला, खनिज पदार्थ दिले, ते निसर्गात होतेच म्हणून दिले! आपणच मेहनत करून ते मिळवले. पण हे ''माता-पिता-गुरू'' वगैरे कशाला? या निर्जीव वस्तूंच्या मागेपुढे भाबड्या भावना जोडून उगीच या गोष्टी अतिरंजित कशाला करता? माता एकच, जिने जन्म दिला ती. बाकी उगीचच भूमाता, गोमाता, नदीमाता, समुद्रपिता म्हणत सुटणे म्हणजे आंधळेपणा आहे. सरळसरळ भौतिक गोष्टींचा विचार भौतिक म्हणूनच करावा आणि त्यांचा जितका उपयोग तितकेच त्यांचे मूल्य समजावे!'

याला श्रीगुरुजींनी एकदा फार चांगला काटशह दिला. ते म्हणाले, '—माणसाचे शरीर म्हणजेच देखील एक जड भौतिक पदार्थच आहे. आपल्या आईचे शरीर दुसऱ्या एखाद्या स्त्रीच्या शरीराप्रमाणेच जड वस्तु आहे. मग आपली आई तरी इतर स्त्रियांहून वेगळी आहे असे का मानावे? तिच्याविषयी भक्ति कशासाठी? .... दुसरे उदाहरण घ्या. मनुष्यशरीराच्या पोषणाला पिष्टपदार्थ, प्रथिने, चरबी, क्षार, आणि पाणी यांची आवश्यकता असते ना, ते सारे अंश माणसाच्याच शरीरामधे सहज मिळतात, कारण माणूस म्हणजे जीवशास्त्राप्रमाणे रक्त, मांस आणि अस्थि! मग आपण आपल्या शेजारच्या माणसालाच का खाऊ नये!... पण हे तर्कशास्त्राला पटले तरी सुसंस्कृतपणाचे लक्षण नव्हे. म्हणून केवळ बुद्धी असून भागत नाही. अंतःकरणाच्या उदात्त भावनांची अनुभूतीही माणसाला झाली पाहिजे!'' (विचारधन : पृष्ट ८०)

**ही शास्त्रीय भावना आहे :**

अर्थात् बुद्धीच्या कसोटीवर कुठलीही गोष्ट पारखून घेणाराशी आपले भांड़ण काही नाही. आपण त्याला एवढेच म्हणू की आम्ही या भूमीला माता मानीत असलो तर ते आंधळ्या भावनाप्रधानपणामुळे नव्हे, अगदी व्यवहाराला धरून! माता म्हणवून घ्यायला ही धरित्री संपूर्णपणे पात्र आहे म्हणून. त्यांच्याच भाषेत सांगायचे तर पाच शक्तींनी हे जग निर्माण झाले आहे, त्या शक्ति म्हणजे आकाश (Space), वायु, तेज (अग्नि), पाणी, आणि पृथ्वी. माणूस आपल्या पाच इंद्रियांनी त्यांचे गुणधर्म ओळखतो. कानांनी आकाशाचा गुणधर्म म्हणजे आवाज ऐकतो, त्वचेचे वायूचा स्पर्श समजतो, डोळ्यानी प्रकाश बघतो, जिभेने सगळ्या द्रव रसांची

(पाण्यासारख्या) चव घेतो, नाकाने मातीचा सुगंध घेतो. पण गंमत अशी आहे की, आकाशाचा शब्द हा एकच गुणधर्म, तर वायूला दोन, अग्नीला शब्द-स्पर्श-रूप हे तीन्ही, पाण्याला चार गुणधर्म असतात, पण पृथ्वीजवळ मात्र शब्द-स्पर्श-रूप-रस-गंध हे पाचही गुण असतात. हा सिद्धांत सगळ्या शास्त्रज्ञांनी मान्य केला आहे. आजचे रसायनशास्त्राचे पंडितदेखील पृथ्वीची ही शक्ति मान्य करतात. कुठलाही बुद्धिवादी या बाबतीत विरुद्ध असणार नाही. (महाभारताचा उपसंहार : १० : चिं. वि. वैद्य : पृ. ४५५) अशा या पृथ्वीला आम्ही आपली माता म्हणतो तर जन्म देणे आणि वाढविणे हे जे आईचे काम, तेच ती करते म्हणून! त्याच्यात आंधळेपणा कुठे आहे? वास्तविक पृथ्वीला आई मानणे ही आपल्या शास्त्रीय दृष्टिकोणाची पहिली पायरी आहे. कारण त्यामुळेच आपण या पाच शक्तींच्या अगदी जवळ जाऊन पोचतो. हे प्रचंड जग काय आणि कसे आहे याचा शोध करण्याची बुद्धि आपल्याला होऊ लागते. हे सगळे शास्त्रीय प्रकरण आहे - भाकडकथा नव्हे! म्हणून ही आपली मातृभूमि, आणि आपण हिचे पुत्र, ही भावना अत्यंत शास्त्रशुद्ध आणि 'सु'बुद्धीला पटेल अशीच आहे.

**नसानसात वीज खेळल! :**

एकदा आपण भारतभूमीला माता म्हणून ओळखू लागलो की आपल्या साऱ्या विचारात विजेच्या गतीने फरक पडेल. आपलेपणाची जाणीव एकदा आपल्या मनात भारतमातेबद्दल उत्पन्न झाली म्हणजे आपल्या वागणुकीची दिशाच बदलेल. दगड-माती-विटा-सिमेंटचेच बांधलेले घर, पण ते आपले घर म्हटल्यावर माणूस त्याचे काय काय लाड करतो! त्याला मुंडावळ्यासारखी तोरणे काय बांधतो, त्याची पूजा काय करतो, त्याला सुंदरसे नाव काय ठेवतो, त्याला नाना प्रकारचे रंग काय देतो. सारे बुद्धिवादीसुद्धा हे सगळे करतात बरे का! का, तर ते 'आपले' घर म्हणून. त्याच्यावर कुणी वेडेवाकडे काही लिहू नये म्हणून ऑर्डर काढतो - "जाहिराती लावू नयेत!" त्या घराचे फोटो काढतो - अहो, कुणी कुणी त्या घराची कुंडलीसुद्धा तयार करून घेतात! मग ही 'पुण्यसिंधुवलयांकित' अशी आपली भूमी आपली 'माता' आहे असे एकदा म्हटले, म्हणजे आपण तिच्यासाठी काय करणार नाही? संघाच्या संस्काराचे म्हणूनच हे पहिले जबरदस्त बलस्थान : आपली भारतमाता!! एकदा तिच्यासाठी सारे करायचे असे आपल्या मनाने घेतले म्हणजे आपण एका वेगळ्याच स्फूर्तीने भारले

जातो. मग भारतमातेच्या हजारो वर्षांच्या इतिहासाकडे, इथल्या आमच्या कोट्यवधि बंधूंकडे पाहण्याची आमची नजरच बदलते. मग आमच्या जीवनाला काही उदात्त उद्देश निर्माण होतो. अशा महत्कार्याच्या प्रयत्नात आपला हातभार लागला पाहिजे अशी ऊर्मि मनात उभी राहते.

**बंधुता :**

आणि मग झालेही आपसात काही भांडण-तंटे, तरी आई असेपर्यंत भाऊ एकमेकांना मिळून राहतात, आईला दुःख होऊ नये याची काळजी घेतात, तसे आपण आपली भांडणे मर्यादित ठेवतो. एकाची आई, तशीच ही मोठी आई! एखादे उदात्त ध्येय आयुष्याला उत्पन्न झाले, म्हणजे साधी माणसेदेखील पराक्रमी बनतात. रामाचे वानर आणि वनवासी, श्रीकृष्णाच्या गोप-गोपी आणि यादव, विक्रमादित्याचे मातीचे सैनिक, शिवाजी महाराजांचे शब्दाखातर रक्त सांडणारे मावळे सहकारी, लोकमान्य टिळकांचे तेली-तांबोळी, गांधीचे सत्याग्रही ही सारी सामान्य माणसेच होती, पण जीवनाला एक 'मिशन' लाभल्यावर प्रचंड कतृत्व करून गेली. मातृभूमीचे आम्ही पुत्र, म्हणजे आम्ही सारे भाऊच ना, मग भेदभाव कसला! 'बंधुता' त्यातून आपोआप मूळ धरील, आणि त्यापोटीच समानता येईल. आपल्या या भारतमातेकड़े वाकडा डोळा करून पाहण्याची कुणाला हिम्मतच होऊ नये अशी ताकद आपल्याला उभी करायला हवी असे डॉक्टर हेडगेवार नेहमी सांगायचे. ती ताकद उभी करण्याचा मूलमंत्र आहे – 'ही आमची भारतमाता' !!

**सुपुत्र व्हावे लागेल :**

संघ संसकारांचे हे पहिले बलस्थान. ही आमची मातृभूमि आणि आम्ही हिचे पुत्र. एक गोष्ट मात्र नीट समजून घेतली पाहिजे, 'आम्ही' म्हणजे कोण? या मातेचे पुत्र म्हणून उभे राहण्याची योग्यता कुणाची? ती केवळ जन्माने ठरते की कर्माने? कोणते कर्म, कसे वागणे त्यासाठी योग्य ठरेल? कुपुत्र म्हणविण्यासारखे, लाज वाटण्यासारखे तर आपल्या हातून काही घडत नाही ना? या मातेकरता कुठले आहे आमचे कर्तव्य?

या भूमीची 'मातृभूमी-पुण्यभूमी' या भावनेने भक्ति केली हिंदूंनीच. हिंदूंमध्येसुद्धा बेइमान कुणी निघाले नाहीत असे नाही, पण अशा लोकांचे इथे कधी कौतुक झले नाही. इतर अनेक पंथांचे, पूजापद्धतींचे लोक येथे

आले, राहिले, वाढले. त्यांच्या पिढ्यान्‌पिढ्या इथे झाल्या आहेत. पण दुर्दैवाने त्यांच्यातल्या अनेकांना ही भूमि कधी आपली मातृभूमी वाटली नाही! आज त्यांच्या बाजूने बोलणारे जेव्हा म्हणतात की तेही अखेर 'भारतीय' आहेत, तेव्हा बोलणारांचा अर्थ इतकाच असतो की ते भारतात राहणारे आहेत, आणि भारताच्याच सरकारच्याच व्यवस्थेप्रमाणे राहात आहेत; पण केवळ एखाद्या विशिष्ट देशात राहण्याने माणसाचे मनही त्या देशाच्या सुखदुःखाशी संपूर्णपणे मिळून गेले आहे याची खात्री देता येत नाही. सरकारास मानून येथील नित्यनियमांप्रमाणे राहिले म्हणजेच केवळ झाले असे नाही - तसे कुणीही आपल्या स्वार्थासाठी करीलच! या मातृभूमीचे सुपुत्र म्हणविण्यासाठी केवळ एवढीच प्रादेशिक किंवा उपभोगाची भावना पुरेशी नसते. जे मुख्य हवे असते ते या भूमीवरचे अकृत्रिम आणि निस्वार्थ प्रेम, आणि या भूमीवरच्या साऱ्या अशाच प्रेम करणारांशी बंधुता. ती असेल, तर मग परमेश्वराची भक्ति आणि पूजा कुणी कोणत्याही प्रकाराने करो, तो या पुण्यभूमीचा सुपुत्र म्हणता येईल. पण जर या मूळ गोष्टी नसतील तर तो केवळ जन्माने हिंदू असला तरी देखील बेईमानी करू शकेल.

''यं वैदिकाः मंत्रदृशः . . . .'' हा श्लोक आपण वाचला आहे, म्हटला आहे; त्यात वैदिक, वेदान्ती, शैव, वैष्णव, बौद्ध, जैन, सिख्ख या सगळ्या पद्धतींनी परमेश्वराला मानणारांचा 'प्रभु' एकच आहे असे म्हटले आहे. त्याहीपुढे जाऊन मी तर म्हणेन, या सगळ्यांचा परमेश्वर या कल्पनेवर विश्वास आहे, पण ज्यांचा ईश्वराच्या अस्तित्वावर या इतरांसारखा विश्वास नाही अशांना देखील आपल्या मातृभूमीचे पुत्र म्हणवून घेण्याचा अधिकार आहे. प्रभूला जसे इतरजण मानतात तसे ते नसतील मानीत, पण ईश्वर न मानणाऱ्या सांख्य तत्त्वज्ञानालादेखील आमच्याकडच्या विचारात मानाचे स्थान आहे. त्याचप्रमाणे या चिरंतन मातृभूमीला आपली माता मानून येथील अशा प्रत्येकाला जर ते भाऊ मानीत असतील, या समाजाच्या सुखदुःखात जर ते कुठलीही अपेक्षा न ठेवता, कुठल्याच पंथप्रचाराकरता नव्हे तर आपुलकीने सहभागी असतील, तर तेही या मातृभूमीचे सुपुत्रच आहेत. जन्माने हिंदू असलेल्याला ही भावना उपजत असावी अशी साहजिकच अपेक्षा असेल, कारण त्याचे ते बाळकडूच असायला हवे. पण सुपुत्र कुणी केवळ जन्माने होत नाही. तो आपल्या कर्माने होतो. या भूमीवर हजारो वर्षे श्रेष्ठ तत्त्वज्ञान आणि उदात्त व्यवहार यांची

सांगड घालून जी संस्कृति विकास पावली तिच्याशी आपलेपणाने समरस होऊन आपल्या मातृभूमीला वैभवाच्या शिखरावर नेण्याची निर्भेळ इच्छा असलेलाच प्रत्येकजण हिचा सुपुत्र म्हणवून घेऊ शकेल. दुसरा नाही!

**रोकडा व्यवहार :**

या विषयावर अनेक विचारवंतांनी पुष्कळ लिहिलेले आहे, देशविदेशातल्या साहित्यिकांनी, देशभक्तांनी मातृभूमीची स्तुतिस्तोत्रे गायिली आहेत. ते सगळे मुळातूनच वाचायला हवे, आणि त्यातून मिळालेली प्रेरणा संघाच्या वातावरणात सुगंधासारखी विखरून पसरायला हवी. पण एक गोष्ट विसरून चालणार नाही. या मातृभूमीच्या भक्तीचें वातावरण देशभरात संघात आणि संघाबाहेरही विस्तारले पाहिजे हे एक, आणि दुसरे म्हणजे प्रत्यक्ष रोजच्या व्यवहारात प्रत्येकाच्या आयुष्यात या भक्तीपोटी त्याने काय करावे आणि काय करू नये, याची पुरेशी कल्पनाही आपल्या देशातल्या माणसांना आली पाहिजे! केवळ 'हां, आम्ही भारतमातेचे पुत्र आहोत बरे कां,' असे कधीमधी म्हणत राहून भागायचे नाही. भक्ती म्हणजे सौदेबाजी नव्हे, भक्ती म्हणजे संपूर्ण आत्मसमर्पण, खंडोबल्लाळासारखे! पावलापावलावर त्या भक्तीचे प्रत्यक्ष व्यवहारात दर्शन. आपल्या मातृभूमीला वैभवाच्या शिखरावर नेण्याची इच्छा केवळ चांगल्या गायकाचे गाणे ऐकताना आपल्यालाही वाटतें आपण गायक व्हावे, तशी वांझ नाही; खरोखरच आपण त्या स्फूर्तीने गाणे शिकू लागलो तर त्यासाठी जी मेहनत करावी लागते ती रोज करण्याची तयारी लागते. प्रत्येकाने आपली वागणूक त्या कसोटीवर पारखून पाहायला हवी.

आपल्या देशातल्या संरक्षण विभागात तयार होणाऱ्या जड वाहनांच्या कारखान्यात मार्गदर्शन करण्यासाठी १९५४-५५ च्या सुमारास काही जर्मन यंत्रज्ञ आले होते. दोन वर्षे येथे राहून त्यांनी अनेक महत्त्वाच्या गोष्टी आपल्या तंत्रज्ञांना शिकवल्या. असेच एकदा कुणा मोठ्या माणसाने त्या जर्मन यंत्रज्ञांना चहाला बोलावले असताना गप्पांच्या ओघात विचारले, 'तुम्ही आता इतके दिवस भारतात आहात, इथल्या कामाबद्दल आणि कामगारांबद्दल तमचे काय मत आहे?' त्यांचा म्होरक्या आपले खरे-खरे म्हणणे सांगायला संकोच करीत आहे असे वाटून त्यांनी पुन्हा आग्रह केला की अनमान न करता सांगा.

तेव्हा तो म्हणाला, "मित्रा, १९४५ साली दुसरे महायुद्ध संपले तेव्हा आमचा देश बेचिराख झाला होता, त्याची फाळणीही करण्यात आली, पण जे काही आमच्या हातात उरले ते पुन्हा उभे करायचे असा आम्ही निर्धार केला, आणि कामाला लागलो. दिवस रात्र पाहिली नाही. वेतनाचा हिशेब केला नाही. एकच वेड होते, जर्मनी पुन्हा उभा करायचा! - आणि आज दहा वर्षातच आम्ही तुम्हाला मदत करू शकण्याइतपत आपल्या पायावर उभे राहिलो आहोत!!" थोड थांबून तो पुढे म्हणतो, "तुमचा देशही त्याच सुमाराला स्वतंत्र झाला आणि तुमच्या हाती एक चांगले चाललेले व्यवस्थित शासन आले, राष्ट्रीय संपत्ती आली; परिवर्तनानंतर सारेच शून्यातून उभे करायचे अशी काही गोष्ट नव्हती. पण मी पाहात आहे की तुमची माणसे झडझडून काम करीत नाहीत, वेळेचा उपयोग करीत नाहीत, चुकारपणाच करीत राहतात. ज्या कामाला आमच्याकडे चार माणसांना एक दिवस पुरतो तेच काम तुमची दहा माणसे दोन दिवसांतदेखील व्यवस्थितपणे करीत नाहीत - - - आणि याचं कारण सांगू तुम्हाला? Your People do not love your country!! (तुमचे लोक तुमच्या देशावर प्रेमच करीत नाहीत.)"

**या भक्तीची शक्ति :**

म्हणून मातृभूमीची भक्ति, भारतमातेवरची असीम श्रद्धा ही अशी रोजच्या व्यवहारात प्रकट व्हायला हवी हे महत्त्वाचे, त्याखेरीज तरणोपाय नाही. रोज भगवद्गीतेचा पाठ करणाऱ्या एका गृहस्थांना विचारले की यातले तुम्ही आचरणात काय आणता? ते म्हणाले की, 'गीता आचरणात आणायची म्हणजे हा गीताचा अपमान आहे. मी फक्त पाठ करतो - '! कोणत्याही श्रेष्ठ तत्त्वाला असा देवपणा चढवून आपण झटकून बाजूला होणे ढोंगीपणाचे आहे. भारतमातेची भक्ति आणि सेवा करण्याचे हे संघसंस्कारातले पहिले बलस्थान समजून घेऊन, त्याच्याभोवती शेकडोंना एकत्र करून, त्यांच्या हाताने प्रत्यक्ष आचरण व्हावे यासाठी आपण सर्वांनी प्रयत्नशील राहिले पाहिजे. कारण या बलस्थानातूनच प्रेरणा घेऊन संघाच्या बहुसंख्य कार्यकर्त्यांनी मातृभूमीच्या सेवेत आपले तन, मन, धन अर्पून आजवर हा संघ वाढविला आहे.

❑

# २

संघाचे संस्कार काही महत्त्वाच्या श्रद्धास्थानांभोवती गुंफलेले असतात, कारण विचारपूर्वक मनात बाळगलेली डोळस श्रद्धा एक विलक्षण शक्ति उत्पन्न करते. साहजिकच ज्या गोष्टींबद्दल अशी श्रद्धा बाळगायची, त्या गोष्टी अशा असल्या पाहिजेत की ज्यांचे गुणधर्म कधी बदलणार नाहीत! ज्या गुणधर्मांसाठी त्या गोष्टीवर श्रद्धा ठेवायची तेच जर बदलत राहिले, बिघडत राहिले, तर आपली भयंकर फसवणूक होईल. डोंगराळ भागातून जेव्हा सैन्याच्या तुकड्या कूच करतात तेव्हा होकायंत्राच्या मदतीने तर दिशा ठरवितातच, पण शिवाय समोरच्या अग्रेसराला अशी शिकवण असते की डोळ्यासमोर कुठली तरी स्थिर वस्तू पहा आणि तिच्याकडे जायचे आहे हे लक्षात ठेवून चालत रहा. डावी-उजवीकडे वळण्याची आज्ञा झाली की वळल्याक्षणीच त्या बाजूची दुसरी एखादी स्थिर वस्तू चटकन पाहून ठरव आणि सरळ तिच्या रोखाने चालत आपले पथक घेऊन जायचे आहे असे ध्यानात ठेव. स्थिर वस्तूच हवी दिशा चुकू नये म्हणून; हलणारी गाय पाहून जर अग्रेसर तिच्याकडे जाऊ लागला तर फजितीच व्हायची! तसेच श्रद्धेचे आहे. न चळणाऱ्या गोष्टीवरच श्रद्धा ठेवली, तरच कधी दिशाभूल होणार नाही, अनपेक्षित धक्के बसणार नाहीत.

म्हणून संघाच्या संस्कारांची मांडणी करताना डॉक्टर हेडगेवारांनी दुसरे जबरदस्त बलस्थान गुरूच्या जागी मांडले ते म्हणजे **भगवा ध्वज!** १९२८ साली जेव्हा व्यास पूर्णिमेच्या दिवशी संघात पहिल्यांना गुरूपूजनाचा उत्सव होईल असे डॉक्टरांनी सांगितले, त्यावेळी स्वयंसेवक निरंनिराळ्या

कल्पना लढवू लागले. कुणी म्हणाले उद्या आपल्याला गुरू म्हणून डॉक्टरांची पूजा करण्याची संधी मिळेल. पण दुसऱ्या दिवशी ध्वजारोहण झाल्यावर डॉक्टरांनी सर्वांना ध्वजाचेच 'गुरू' म्हणून पूजन करण्याची शिकवण दिली! ते म्हणाले, 'माणूस कितीही मोठा आणि सद्गुणी असला तरी त्याच्यात काही उणीव राहू शकते. शिवाय आज आदर्श असलेला मनुष्य उद्या विघडणार नाही कशावरून? तेव्हा कुणा माणसाला गुरू मानून चालणे आपल्या संघासारख्या कामाला उपयोगाचे नाही. एखादे तत्त्व जर डोळ्यापुढे ठेवले, तर ते मात्र अढळ राहते. आपण आपल्या हिंदू समाजाला जागे करून आपल्या राष्ट्राला मोठे करण्याचे ध्येय ठेवले आहे, मग त्यासाठी आपल्या तत्त्वाचे प्रतीकच असलेला आपला भगवा ध्वज हाच गुरू मानणे योग्य ठरेल. म्हणून आपण कोणत्याही व्यक्तीला नव्हे, आपल्या परमपवित्र भगव्या ध्वजालाच गुरूच्या जागी मानू या.' मग त्याप्रमाणे डॉक्टरांनी स्वतः प्रथम ध्वजाचे पूजन केले आणि पाठोपाठ सगळ्या स्वयंसेवकांनीही त्याप्रमाणे ध्वजाची पूजा केली, आपल्या श्रद्धेप्रमाणे फुले वाहून शक्य तेवढी गुरुदक्षिणा ठेवली. या पहिल्या गुरुदक्षिणेपासून आजवरच्या अनेक वर्षांत 'भगवा ध्वज हा प्राण आमुचा-जीवनपुष्पें पुजुं या त्याला' या भावनेने स्वयंसेवक ध्वजाचेच पूजन करीत आले आहेत!

तुम्ही कधी बाबासाहेब पुरंदरे यांच्याबरोबर एखादा किल्ला किंवा पुण्याचा शनिवारवाडा पाहायला गेला आहात का? एरवी पंधरा-वीस मिनिटात फिरून होईल असा शनिवारवाडा त्यांच्याबरोबर पाहताना मात्र, दोन तास कसे निघून गेले हे कळतसुद्धा नाही; कारण तिथला एकेक दगड, एकेक पायरी बाबासाहेबांशी बोलत असते! 'इथल्या मातीचं ढेकूळ पाण्यात टाका, जो तवंग उमटेल, तो इतिहासाचा!!'- असे बाबासाहेबांनीच सांगितले आहे. कारण मुका निर्जीव निसर्गदेखील, तुम्हाला ती दृष्टि असेल तर कितीतरी गोष्टी सांगू लागतो. तसेच या भगव्या ध्वजाचे आहे! त्याच्याकडे उघड्या डोळ्यांनी पाहिले तर आपला संपूर्ण इतिहास, संस्कृती आणि श्रेष्ठ शिकवण आपल्या नजरेसमोर येते. ही प्रतीकांची भाषा ज्याला समजत नाही, तो एक वेळ ध्वजाला कापडाचा तुकडा किंवा मातृभूमीला दगडधोंडे समजेल; पण त्याला म्हटले की तुझ्या आईच्या चित्रावर लाथ मार बरं - तर तो रागावून उठतोच ना! वास्तविक चित्र म्हणजे आई नव्हे, पण चित्रातच तो आईची पूर्ण आठवण करतो; तसेच प्रतीकाचे असते.

परमपवित्र गभवा ध्वज यासाठीच संघाने गुरू मानला, आणि ते एक स्थिर श्रद्धाकेंद्र म्हणून पुन्हा सर्वोच्च जागी स्थापन केले.

वि. स. खांडेकरांचे एक फार सुंदर गीत आहे - 'रणीं फडकती लाखो झेंडे'. त्यात एक कडवे असे आहे :

**कधी न केले निजमुख काळे पाठ दावुनी शत्रूला**
**कृष्णकारणीं कधिही न रणीं धर्माचा हा ध्वज दिसला ।**
**चोच मारण्या परखणावर काकापरि नच फडफडला**
**जणू जटायू रावणमार्गी उलट रणांगणि हा ठेला ।**
**परलक्ष्मीला पळवायला पळभर पदर न हा पसरे**
**श्वासाश्वासासह सत्याचे संचरते जगती दारे ।**

मूळ गीत पूर्णच पाठ करण्यासारखे आहे, कारण त्यात भगव्या ध्वजाची श्रेष्ठता ओतप्रोत भरलेली आहे. शिवराय, मुरारबाजी, संभाजी, खंडोबल्लाळ यांची तेजस्वी जीवने तर त्यात आली आहेतच, पण आपले प्राण हसत हसत देणाऱ्या पतिव्रतांचे दर्शन तर थरारून टाकणारे आहे. -

**'स्मशानातल्या दिव्य महालीं निजनाथासह पतिव्रता**
**सौभाग्याची सीमा झाली उजळायाला या जगता ।**
**रमा-माधवासवें पोचल्या गगनांतरि जळत्या ज्योती**
**चिन्मंगल ती चिता झळकते या भगव्या झेंड्यावरती ।**

- अशा या भगव्या ध्वजाने हजारो वर्षे पराक्रमाची आणि निरपेक्ष त्यागाची प्रेरणा दिली. सज्जनांच्या रक्षणासाठी आणि दुर्जनांची दुर्जनता नष्ट करण्यासाठी ज्यांनी ज्यांनी प्रयत्न केले त्यांनी हाच ध्वज उभारला. केवळ लढाया लढतानाच नव्हे तर संपूर्ण जीवनभर या ध्वजाला पाहून मिळणारी स्फूर्ति जागती ठेवली. 'ध्वज' ही कल्पना सगळीकडे जगभर मान्यता पावलेली आहे, कारण ते आत्मविश्वासाचे व अस्मितेचे प्रतीक असते. हिंदूंनी भगव्या ध्वजाला आपल्या संपूर्ण जीवनात मानाचे स्थान दिले तर त्यात वावगे काहीच नाही!

असा हा मानबिंदु संघातल्या संस्कारात अत्यंत श्रेष्ठ समजला गेला आहे. एखाद्या शाखेवर एकदा ध्वज लागला म्हणजे तो नियमितपणे लागला

पाहिजे. खंड पडता कामा नये असा संघात आग्रह असतो. म्हणून जोपर्यंत एखाद्या क्षेत्रात संघाचे बीज मूळ धरीत नाही तोपर्यंत त्या शाखेत ध्वज लावण्याची सुरुवात केली जात नाही. अर्थात् ध्वज न मिळालेल्या शाखेत देखील ध्वजाची जागा ठरलेली असते. आणि तेथेच सारेजण प्रणाम करतात, एकलव्यासारखे! पण एकदा ध्वज मिळाला की तो कधी हटू द्यायचा नाही, अशी सर्वांची जिद्द असते. गुरुपूजनाच्या दिवशी पूजा फक्त ध्वजाचीच करायची असते, इतर चित्रे मांडली असली तरी त्यातल्या कुणावरही गुरुपूजन म्हणून फुले वाहायची नसतात. हा त्या चित्रातल्या श्रेष्ठ व्यक्तींच्याबद्दल अनादर नव्हे, व्यक्तिनिरपेक्ष असा भगवा ध्वजच संघात 'गुरू' मानला आहे, या पवित्र तत्त्वाचे ते पालन असते! असे संस्कार संघात आग्रहाने करण्याची सर्वांची खटपट असते.

आणि भगवा ध्वजच सर्वश्रेष्ठ मानल्यामुळे, संघात कधी कुणा व्यक्तीवर काम आधारले गेले नाही. माणसे बदलली तरी झेंडा पडू द्यायचा नाही हा निर्धार कायम राहिला. आणि आज पाच पिढ्या होऊन गेल्या, संघाचे काम एकाग्रतेने चालले आहे, वाढते आहे. गेल्या पाच वर्षात कितीतरी ज्येष्ठ कार्यकर्ते वयोमानाप्रमाणे आणि सतत परिश्रमांमुळे परलोकी गेले, पण संघाचा विचार दिगंत नेण्यासाठी कंबर कसलेली माणसे, 'अश्रू पुसून' पुन्हा पुढेच जात राहिली आहेत. कारण सर्वांच्या डोळ्यासमोर आपल्या भारतमातेचे पुनर्वैभव, आणि भगव्या ध्वजाची उत्तुंग शिखरावर स्थापना, या दोन नितांत श्रद्धेच्या गोष्टी अढळ आहेत. म्हणूनच ही 'जगन्नाथाची रथयात्रा' अखंडपणे आणि जाणीवपूर्वक चाललेली आहे. 'हे माझे काम आहे' अशा डोळस भावनेने प्रत्येकजण या कामात लागलेला आहे.

नाही तरी 'ध्वज' हा कुणा एका नेत्याचा नसतो. माणसाचा इतिहास पाहिला म्हणजे असेच लक्षात येते की लोकोत्तर नेता मिळाला म्हणजे सामान्य माणूसदेखील असामान्य काम करून जातो, आणि त्यातूनच इतिहास घडतो. 'वेड लागल्याशिवाय इतिहास घडत नाही', आणि असे वेड सामान्य माणसाला लागावे अशीच महापुरुषांची धडपड असते. कार्यकर्त्यांच्या स्नेहाळ आणि आपुलकीच्या वागण्यामुळे स्वयंसेवक संघात येतात आणि आकर्षित राहतात, पण कार्यकर्त्यांचा प्रयत्न असाच असतो की हळूहळू 'भारतमाता' आणि 'भगवाध्वज' या मानबिंदूंच्या भोवतीच साऱ्यांचे आकर्षण वाढावे!

संघातले संस्कार या दोन मूलग्राही श्रद्धांवर आधारलेले असल्यामुळे संघात एकदा आलेला माणूस कधी संघ सोडीत नाही.

संघात त्यागपत्र नाही, कारण त्यागणार काय? भारतमाता की भगवा ध्वज? छे छे, दोन्हीपैकी काहीच कुणीही त्यागीत नाही! कधी कुणाच्या विकृत वागण्यामुळे दुखावून कोणी संघाच्या कामापासून दूर झालेही असतील, कुणी स्वतःच्या गैरवर्तनामुळेही बाजूला झाले असतील; पण या दोन मौलिक श्रद्धांच्या भोवती संघाचे संस्कार गुंफलेले असल्याने एक तर अशा दूर गेलेल्यांची संख्या अगदी कमी, आणि दूर गेलेलेसुद्धा वेळप्रसंगी बाकी सारे बाजूला ठेवून, भारतमातेसाठी किंवा भगव्या ध्वजासाठी सरसावून पुढे येतील, इतक्या या दोन श्रद्धा संघात भक्कमपणे त्यांच्यातही रुजलेल्या आहेत. प्रत्यक्ष संघाच्या कामात सतत लागलेल्यांच्या मनात तर त्या असतातच.

याचा एक मोठा गमतीदार परिणाम होतो. एखादी राष्ट्रीय किंवा सामाजिक महत्त्वाची घटना घडली, म्हणजे त्याबद्दलची संघाच्या माणसांची प्रतिक्रिया सबंध देशभर एकाच वेळी एकाच प्रकारची होते! म्हणजे सगळ्यांचे विचार साचेबंद नसतात; बारकावे आणि तपशील ज्याच्या मगदुराप्रमाणे, अभ्यासाप्रमाणे वेगवेगळ्या पातळीवरचे असतील, पण विचारांचा मूळ गाभा भारतमातेचे आम्ही पुत्र, आणि आमचा सर्वश्रेष्ठ गुरू 'भगवा ध्वज हा असल्यामुळे पुत्रभावनेच्या विरुद्ध किंवा भगव्या ध्वजाकडून मिळणाऱ्या शिकवणीच्या विपरीत असे काही घडले की संघाच्या प्रत्येक स्वयंसेवकाच्या मनात साहजिकच एकसारखाच विचार येतो. मारुतीने सीतामाईंनी भेट म्हणून दिलेली मोत्यांची माळ एकेक मोती फोडून पाहिली - त्यात 'राम' आहे की नाही म्हणून, अशी कथा आपण ऐकतो; संघाचा जागरूक स्वयंसेवक प्रत्येक महत्त्वाच्या गोष्टीला आपल्या मौलिक दोन धारणांची कसोटी लावून त्यात 'भारतमातेची निस्वार्थ भक्ति' आणि 'भगव्या ध्वजाची शिकवण' आहे की नाही हे पाहील तर त्यात नवल ते काय? याच दोन गोष्टींची आज उणीव आहे, आणि ती दूर करण्यासाठी संघाचे कार्य आहे.

साहजिकच या कसोटीवर तो प्रत्येक घटना गंभीरपणाने तोलून पाहील. मग कुणी 'चिनी लोकांनी बळकावलेल्या भूप्रदेशावर एक गवताचे

पातेसुद्धा उगवत नाही त्यामुळे तो तितका महत्त्वाचा नाही-' असे म्हटले तर संघाच्या माणसांची देशभरात एकच प्रतिक्रिया होणारच!! प्रत्येक व्यवहारात, मला काय मिळेल एवढ्यापुरताच विचार करण्याची प्रचंड फौज राजकारणात घुसलेली पाहून संघाच्या लोकांचा अनेक राजकारण्यांच्याबद्दल आदर आणि विश्वास कमी होणारच!! कुणी याला साचेबंदपणा म्हणेल, तर त्याच्याच मनात संघविरोधी साचे बनलेले असावेत एवढेच म्हणावे लागेल.

संघाच्या संस्कारांचा पोत या दोन मजबूत धाग्यांनी विणलेला असल्युळे आणखी एक फार महत्त्वाचा परिणाम झाला आहे, तो म्हणजे आपल्या हिंदूराष्ट्राच्या परमवैभवासाठी संघाने चालविलेले प्रयत्न अगदी योग्य मार्गावर चालले आहेत याबद्दल प्रत्येक संघाच्या माणसाच्या मनात जबरदस्त विश्वास उत्पन्न झाला आहे! हे कार्य अतिशय मौलिक, महत्त्वाचे आणि आपले कर्तव्यच आहे अशी बुद्धि निर्माण झाली आहे. 'हे राज्य व्हावे ही तर श्रींचीच इच्छा-' हा दृढ विश्वास, ही शिवाजी महाराजांची मूलगामी शक्ति होती! संघाच्या स्वयंसेवकांच्या हृदयात हा आत्मविश्वास आहे.

त्यामुळे संघाचे काम करताना त्याच्या मनात कुठलेही संशयाचे सावट नसते. आपला उद्देश श्रेष्ठ, न्यायपूर्ण आणि विधायक आहे अशी खात्री असली म्हणजे माणसाचे पाऊल निश्चयी आणि निर्धाराचे पडते. संशयाचा किडा मनात फिरत असला तर मात्र कुणी सर्वस्व पणाला लावून कुठले काम करू शकत नाही. अहो, संशयाने घेरले होते तोपर्यंत अर्जुनासारखा अजिंक्य वीरदेखील शस्त्र खाली ठेवून विकल होऊन बसला होता! श्रीकृष्णाच्या बहुमोल मार्गदर्शनाने जेव्हा त्याच्या मनातील शंका संपली, तेव्हाच तो युद्धासाठी निश्चय करून सिद्ध झाला.

म्हणून संघनिर्मात्याने स्वयंसेवकांच्या हृदयात 'भारतमाता' आणि 'भगवा ध्वज' या दोन बलस्थानांचे अमिट संस्कार इतके प्रबळ उत्पन्न केले की संघाच्या विचाराबद्दल आणि उद्देशांबद्दल कुणाच्या मनात संशयाला कधी जागाच राहिली नाही. साहजिकच संघाच्या कामाला आपल्याला शक्तीप्रमाणे ज्याने जितका हातभार लावला तो कोणतीही कसर न ठेवता लावला. प्रत्येकाने संघाचे काम आपले म्हणून केले, कर्तव्य समजून आपण होऊन केले! या दोन बलस्थानांचे संस्कार झालेला स्वयंसेवक स्वयंप्रेरित (Charged) शक्तीने संघाच्या लोकसंग्रहाच्या आणि संस्कारांच्या कार्यात

जबाबदारी घेण्यासाठी पुढे सरसावला, हाच गेल्या पाच पिढ्यांचा अनुभव आहे. जो त्याची मर्यादा आल्यावर थांबला, त्यानेही विचार सोडला नाही, 'दिशा बदलली नाही.

म्हणून आज संघाच्या नावाने सज्जनांना आनंद होतो, दुर्जनांच्या काळजात धडकी भरते अशी प्रत्यक्ष स्थिती दिसू लागली आहे. खांडेकरांच्या गीतात शेवटच्या कडव्यात म्हटले आहे -

**"वीज कडाडून पडता तरुवर कंपित हृदयांतरि होती**
**टक्कर देता पत्थर फुटती डोंगर मातीला मिळती।**
**झंझावातापोटी येऊनि पान हलेना हाताने**
**कलंक असला धुवुनि टाकणे शिवरायाच्या राष्ट्राने। ..."**

भगव्या ध्वजाकडे पाहून ही ऊर्मि आपल्या मनात उसळावी, आणि आपल्या मातृभूमीच्या सेवेसाठी आपण कटिबद्ध व्हावे अशी तळमळ लागावी, असे संघाचे संस्कार आहेत. डॉक्टर हेडगेवारांच्या शीर्षपत्रावर संत तुकारामाचे वचन छापलेले असे -

**"दया तिचे नाव, भूतांचे पालन।**
**आणिक निर्दाळण, कंटकांचे।"**

संघाची निर्मितीही याच श्रेष्ठ कर्तव्यासाठी आहे, आणि 'भारत-माता' आणि 'भगवा ध्वज' ही दोन श्रद्धा-केंद्रे संघाच्या संस्कारांची मौलिक बलस्थाने आहेत.

पण डॉक्टर एवढ्यावरच थांबले नाहीत. या गोष्टींबद्दल तीव्र भावना असणारी अनेक माणसे आधीही होती, इतरत्र कार्यही करीत होती. पण संघात या भावना प्रत्येक्ष व्यवहारात आणण्याचा आग्रह होता आणि त्यासाठी डॉक्टरांनी प्रत्येकाला करण्यासारख्या काही गोष्टी ठरवून दिल्या. त्या गोष्टी करता करता स्वयंसेवकांच्या कर्तृत्वाला सुंदर पैलू पडत जातात, आणि साधी माणसे प्रचंड कर्तबगारी करून जातात; त्या व्यावहारिक गोष्टींबद्दल यानंतर विचार करू या.

❑

# ३

संघाच्या कार्यक्रमांच्या आणि वातावरणाच्या आकर्षणामुळे माणूस संघाजवळ येतो, संघाच्या कार्यकर्त्यांने कुठलीही स्वार्थी अपेक्षा न ठेवता केलेल्या स्नेहाळ वागणुकीमुळे तो संघात रुळतो, आणि हळूहळू 'भारतमातेची भक्ति' अन् 'भगव्या ध्वजाबद्दलचा आदर' मनात रुजू लागला की तो संघाच्या कामात खोलवर जाऊ लागतो.

पण श्रद्धेचे परिवर्तन केव्हाना केव्हा तरी विश्वासात व्हावे लागते, खात्री (Conviction) पटावी लागते! त्याशिवाय कुणी अशा कामात वर्षानुवर्षे टिकून राहू शकत नाही. डॉक्टर हेडगेवारांनी मनुष्याच्या स्वभावाची ही नाडी बरोबर ओळखली होती, त्यामुळे त्यांनी 'भारतमातेचे प्रेम' आणि 'भगव्या ध्वजाची मनस्वी भक्ति' या दोन मौलिक बलस्थानांबरोबरच प्रत्येकाला स्वतः करण्यासाठी आणखी एका महत्त्वाच्या गोष्टीचा पायंडा पाडून दिला. ती गोष्ट म्हणजे रोज भगव्या ध्वजासमोर उभे राहून मनापासून करण्याची **प्रार्थना!**

**सामूहिक प्रार्थना :**

सामूहिक प्रार्थनेबद्दल भगिनी निवेदिता यांनी फार सुंदर लिहिले आहे. त्या म्हणतात, 'सामुदायिक प्रार्थना हिंदू धर्मात असलीच तरी ती अविकसित स्वरूपात आहे. हिंदुधर्मातील प्रार्थनेची कल्पना इतकी तीव्र, भावनोत्कट आणि प्राणमय असते, इतकी आंतरिक व जिव्हाळ्याची असते की ती सामुदायिक करणे लोकांना कसेसेच वाटते! .................... (पण)

भविष्यकाळात हिंदुधर्मसुद्धा बहुजनसमाजाच्या विकासात भाग घेतल्यावाचून राहणार नाही. सामुदायिक प्रार्थनेचे महत्त्व हिंदुधर्म समजून घेईल, सामान्य लोकांच्या शिक्षणाचा, त्यांच्या विकासाचा विचार येईल, साक्षात्काराचे परमोच्च ध्येय सामान्य जनतेसाठी खाली उतरेल, यशोदेसाठी परमात्मा 'बाळकृष्ण' होईल. जरा खाली वाकून आपण मुलाबाळांशी हितगुज करतो ना, तसा हिंदुधर्म सामान्य लोकांना एकवटण्यासाठी झटेल. 'हिंदुधर्माच्या प्रार्थनेत सर्व लोकांना स्थान असावे, त्यांच्या आकांक्षा, त्यांची सुखदुःखे, त्यांची जीवने, त्यांची हृदये यांचे प्रतिबिंब त्या प्रार्थनेतून पडले पाहिजे. एकत्र जमून सर्वांनी ती प्रार्थना म्हटली पाहिजे. प्रार्थना चालली असताना लोकांचे हृदय बोलले पाहिजे व तोंडही उघडले पाहिजे. साऱ्यांनी प्रार्थनेला केव्हा जमावयाचे, कोठे जमावयाचे हे ठरले पाहिजे, व्यवस्थितपणा आला पाहिजे'. (रिलिजन ॲण्ड धर्म : निवेदिता) भगिनी निवेदितांचा हा उतारा थोड्या विस्ताराने अशासाठी दिला की त्यांनी सामुदायिक प्रार्थनेचा प्रभाव प्रत्यक्ष पाहिला होता, त्यातली गंभीरता, सुंदरता, उठावदारपणा यांनी त्यांचे मन वेधून घेतले होते, सामान्य माणसाचा त्यात झालेला अंतर्भाव त्यांच्या दयाळू हृदयाला भिडला होता.

**स्पष्ट संघविचार :**

संघाच्या स्वयंसेवकांच्या मनात आपले ध्येय ठसठशीतपणे उमटवील अशी प्रार्थना संघाच्या सुरुवातीपासूनच डॉ. हेडगेवारांनी सुरू केली. १९४० मध्ये नवी संस्कृत भाषेतली प्रार्थना आली, पण त्यापूर्वीची मराठी आणि हिंदी मिश्र प्रार्थनादेखील ध्येयाच्या बाबतीत सुस्पष्ट होती. दोन्ही प्रार्थना समोर ठेवून पाहिल्या म्हणजे संघविचाराची बैठक आधीपासूनच कशी निश्चित होती हे लक्षात येते. म्हणून जुनी प्रार्थना पूर्ण स्वरूपात पाहू –

**नमो मातृभूमी जिथे जन्मलो मी**
**नमो आर्यभूमी जिथे वाढलो मी**
**नमो धर्मभूमी जियेच्याच कामी**
**पडो देह माझा सदा ती नमी मी ॥**
**हे गुरो श्रीरामदूता शील हम को दिजिये**
**शीघ्र सारे सद्‌गुणोंसे पूर्ण हिंदू कीजिये**
**लीजिये हम को शरण में रामपंथीहि हम बने**
**ब्रह्मचारी धर्मरक्षक वीरव्रतधारी बने ॥**

शेवटी जयजयकार असे -

**॥ भारतमाता की जय ॥**

**॥ राष्ट्रगुरू श्रीसमर्थ रामदास स्वामी महाराज की जय ॥**

**विलक्षण प्रेरणा :**

'पडो देह माझा सदा ती नमी मी' ही मराठी, अन् 'पतत्वेष कायो नमस्ते नमस्ते' ही संस्कृत ओळ बघा. 'शील हम को दीजिये', आणि 'वीरव्रतधारी बने' या कल्पना नव्या प्रार्थनेतही ठळक रूपाने आल्या आहेत. संस्कृत प्रार्थनेत फक्त 'शक्तिमन् प्रभो-' असे म्हटले आहे. हिंदुसमाजात मानल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या उपासनादेवतांच्या गुंतागुंतीत न पडता सर्वशक्तिमान प्रभूला आवाहन केले आहे, त्यात सारे आले. 'अस्य धर्मस्य संरक्षणम्' म्हणताना प्रत्येक हिंदूला मान्य होणारा त्याचा-त्याचा धर्म साहजिकच समाविष्ट झाला आहे. मतामतांचा गलबला आणि दैवतांवरून वाढलेले भेद यांना संघाच्या प्रार्थनेत कुठे जागा नाही, म्हणून असे सर्वांना सामांवून घेणारे शब्द योजले आहेत. जो कुणी रूढ अर्थाने परमेश्वराचे अस्तित्वच मानीत नसेल त्यालासुद्धा 'परं वैभवं नेतुम् एतत् स्वराष्ट्रम्-' ही भावना मात्र समजू शकते, प्रेरणा देऊ शकते! 'वयम्'-' म्हणजे 'आपण सारे भाऊ' ही गोष्ट त्याला पटली, आणि सर्वांच्या सुखदुःखात तो एकजीव झाला, म्हणजे झाले. 'हिंदुराष्ट्राङ्गभूतः' या वर्णनात तो बसू शकतो! त्याने फक्त या राष्ट्राला 'स्वराष्ट्र' म्हणून ओळखायला हवे.

**ईश्वराचे कार्य :**

प्रार्थनेच्या विस्तृत अर्थाबद्दल संघाचे पहिले प्रचार-प्रमुख श्री. बाबासाहेब आपटे यांनी आणि इतर अनेकांनीही लिहिले आहे ते मुळातूनच वाचले पाहिजे. आम्ही जे करायला निघालो आहोत ते 'हे प्रभो, तुझेच कार्य आहे' ही प्रार्थनेतली भावना फार महत्त्वाची आहे. जगाच्या प्रचंड पसाऱ्यामागे काहीतरी एक योजना आहे आणि त्या योजनेत प्रत्येकाने आपापले काम नेटकेपणाने पार पाडले पाहिजे असे तत्त्वज्ञ सांगतात. अठ्ठावीस वेगवेगळ्या संस्कृतींचा अभ्यास करून काही महत्त्वाचे निष्कर्ष ठरविणाऱ्या अर्नाल्ड टॉयन्बीने असे सांगितले आहे की, विसावे शतक विज्ञानाचे आहे, पण एकविसाव्या शतकाचा परवलीचा शब्द धर्म हा असणार आहे! इतकेच नव्हे तर टॉयन्बीने पुढे हिंदुस्थानचा स्पष्ट उल्लेख करून

म्हटले आहे की यापुढे मानवजातीला मार्गदर्शन करण्याचे काम हिंदुस्थानच करणार आहे. हे सांगताना, त्याने असे म्हणण्याचे प्रमुख कारण असे नोंदविले आहे की आज अंदाधुंद घातक शस्त्रसंभारांच्या चढाओढीतून मानवजाती भयंकर संहाराच्या ज्वालामुखीच्या तोंडावरच जाऊन पोचली आहे, आपसातल्या द्वेषांनी भरलेले, केवळ शास्त्राच्या घमेंडीवर पण कुठलाच संयम न ठेवता एकमेकांच्या गळ्याचा घोट घेण्याच्या तयारीत असलेल्या जगातल्या अनेक लहान मोठ्या देशांच्या हातून सारी दुनियाच नष्ट होईल की काय अशी भीती उत्पन्न झाली आहे. अशा वेळी या सगळ्या वेगळेपणातूनही सार्‍यांची एकात्मता उत्पन्न करण्याचा धडा देण्याची योग्यता फक्त हिंदुस्थानाचीच आहे, कारण तो इथल्या संस्कृतीचा स्वभावच आहे! तो स्वभाव जागा करायचा, त्यामागे एक संघटित ताकद उभी करायची. संघाच्या प्रार्थनेत 'त्वदीयाय कार्याय बद्धा कटीयम्' असे म्हटले आहे, ते 'परमेश्वराचे' हे असे कार्य आहे!

**पाच गुण :**

साहजिकच इतके मोठे कार्य करायचे तर प्रार्थना करणारामध्ये काही महत्त्वाचे गुण निर्माण झाले पाहिजेत. म्हणून प्रार्थनेत पाच नेमक्या गुणांची जोड करण्याची आकांक्षा व्यक्त केली आहे. ते म्हणजे विश्वाला अजिंक्य अशी शक्ति, जग नम्र होईल असे शील, आपण होऊन पत्करलेल्या काटेरी वाटेवर हिंमतीने पुढे जाता येईल असे ज्ञान, या पृथ्वीवर आणि मृत्यूनंतरच्या सूक्ष्म जगातदेखील उत्कर्ष व्हावा यासाठी अगदी आवश्यक असे उग्र वीरव्रत, आणि कधीही न ढळणारी आपल्या ध्येयावरची निष्ठा! हे गुण ज्यांच्या रोमरोमात भिनले आहेत अशा लक्षावधी हिंदुराष्ट्रांगभूतांची प्रबळ संघटना उभी झाल्याशिवाय जगातल्या राक्षसी प्रवृत्तींचा कान पकडून त्यांना काही भल्या कामाकडे वळविण्याचे प्रचंड कार्य कसे करता येईल? म्हणून संघाच्या प्रार्थनेत शेवटी म्हटले आहे की आमची संघटित कार्यशक्ति आमच्या या श्रेष्ठ 'कार्य-धर्माचे' रक्षण करून या राष्ट्राला परम वैभवाच्या जागी नेण्यास लौकर समर्थ होवो असा आशीर्वाद, हे प्रभो, आम्हाला दे!

**हृदयाची हाक :**

खरोखर संघाची प्रार्थना हे एक सर्वंकष राष्ट्रगीत आहे. जसजसा याचा अर्थ जास्त उलगडत जातो तसतशी त्याची परिपूर्णता जाणवू लागते.

'हिंदुराष्ट्र' या तत्त्वाशी ज्यांचे मतभेद असतील त्यांची गोष्ट वेगळी, पण राज्य धर्मनिरपेक्ष असावे - राष्ट्र मात्र हिंदू संस्कृतीच्या आधाराने उभे राहावे, ही गोष्ट ज्यांना मान्य असेल त्यांच्यासाठी ही प्रार्थना विलक्षण विश्वास आणि खात्री उत्पन्न करणारी आहे. भारतमातेवर आईवर करावे तसे प्रेम करणारा, भगव्या ध्वजाकडे संस्कृतीची ध्वजा म्हणून, क्षुल्लक राजकारणी डावपेचात न गुंतता, गुरू म्हणून पाहणारा, आणि 'होय, हे हिंदुराष्ट्र आहे' अशी मनाशी खूणगाठ बांधलेला प्रत्येकजण, या प्रार्थनेची महती समजू शकेल. त्याच्यासाठी ही केवळ संघ या संस्थेची प्रार्थना नव्हे, ही तर हृदयाची हाक आहे!!

**प्रत्येक वेळी अर्थ समजून म्हणावी :**

अशी ही संघाची प्रार्थना, संघसंस्कारांचे एक अत्यंत जागृत बलस्थान आहे. मला आठवते, पुणे महानगराचे माजी कार्यवाह श्री. बापूराव जोशी नेहमी आग्रहाने सांगत की, 'प्रार्थना म्हणताना प्रत्येक शब्दाचा अर्थ मनात आणून ती म्हणावी ... सहा महिन्यात तुम्हाला आपल्या आयुष्यात मोठा बदल झालेला दिसेल!' कुणीतरी केव्हातरी रचलेला, रचणाऱ्याची भूमिका न समजता केवळ परिपाठ म्हणून म्हणण्याचा तो मंत्र किंवा स्तोत्र नव्हे; रुद्र, सौर, हरिपाठाचे अभंग, रामरक्षा, करुणाष्टके ही कितीतरी अर्थपूर्ण आहेत, पण केवळ सवयीने ती म्हणत राहून, त्याविरुद्ध जीवन कंठणारे हजारो असतात. संघाच्या प्रार्थनेचे तसे होता कामा नये, हा संघात सतत आग्रह असला पाहिजे. त्याच्या अर्थाशी एकरूप झाले, तर ती प्रार्थना आपल्या जीवनात प्रेरणा (Charge) जागवील. दिशा देईल. म्हणून संघात रोजच्या प्रार्थनेला आग्रह आहे. श्रीगुरुजींनी देह ठेवण्याच्या दिवशीदेखील प्रार्थना चुकू दिली नाही ... ''सायंकाळी नित्याच्या प्रार्थनेची वेळ झाली. कार्यालयातील स्वयंसेवक प्रार्थनेसाठी जमलेले पाहून गुरुजींनीही उभे राहण्याचा प्रयत्न केला. पण त्यांचा तोल जाऊ लागला. त्यामुळे त्यांनी खुर्चीवर बसूनच प्रार्थना म्हणावी, असे डॉक्टर थत्ते यांनी त्यांना सांगितले. शेजारच्या मोठ्या खोलीत ध्वज लागला. सर्वांच्या समवेत गुरुजींची प्रार्थना झाली. अखेरीस नित्याप्रमाणे त्यांनी भारतमातेचा जयजयकार केला. तेच गुरुजींचे अखेरचे शब्द ठरले! त्यानंतर गुरुजी काही बोलले नाहीत.'' (तेजाची आरती : पृ २४५)

**एकाग्रता :**

'याचसाठी केला होता अट्टाहास' या ऊर्मीने संघाच्या स्वयंसेवकाच्या तोंडी अखेरच्या क्षणी भारतमातेचा जयजयकार येतो; 'जब प्राण तन से निकले...' महात्मा गांधींच्या मुखी 'हे राम-' हे शब्द स्वाभाविकपणे येतात; यातच आयुष्यभराच्या एकचित्त प्रार्थनेचे सार आहे. प्रार्थना म्हणणे ही यांत्रिकपणे मन भलतीकडे ठेवून करण्याची गोष्टच नव्हे. भारतीय जनसंघाचे प्रसिद्ध कार्यकर्ते कै. रामभाऊ म्हाळगी संघशिक्षणवर्गात आग्रहाने सांगायचे की, 'प्रार्थना सुरू झाली की साऱ्यांनी केवळ स्वयंसेवक म्हणून एकाग्रतेने प्रार्थनाच म्हणावी; कार्यवाह, मुख्यशिक्षक, शिक्षक ही सारी नाती विसरून स्वतःची म्हणूनच प्रार्थना म्हणावी. कोण हलतो आहे, कोण बोलतो आहे, कोण नीट उभा नाही यावरची देखरेख प्रार्थना करीत असताना मुळीच करू नये. त्याकरता पुष्कळ वेळ मिळेल. प्रार्थनेच्या वेळी प्रत्येकाने स्वतः ध्यान देऊन अर्थ मनात आणीत केवळ प्रार्थनाच करावी!' अशी म्हटलेली प्रार्थना आपल्या शरीरात तेज उत्पन्न करील, बुद्धीला स्थिरता देईल, मनात आत्मविश्वास जागवील. त्यातून जो शक्तीचा स्फुल्लिंग निर्माण होतो तो अणु-परमाणूंच्या शक्तीइतकाच बलशाली असेल. प्रार्थनेची संस्कार करण्याची शक्ती अशी विलक्षण आहे. संघटनयोगाचे ते 'ब्रह्मसूत्र' आहे!!

**बंधुत्व :**

म्हणून संघात 'निदान प्रार्थनेला तरी ये,' हा आग्रह असतो. निदान हुतुतू खेळायला तरी ये, मग वाटले तर लौकर जा, असे कुणी म्हणत नाही! वंदेमातरम् हा मंत्र वेदमंत्राहूनही आम्हाला वंद्य आहे, असे एक सुंदर गीत आहे. सारे वेदमंत्र कळण्याची आजची प्रत्येकाची स्थिती नाही. पण संघाच्या प्रार्थनेची भावना हृदयात रुजली तरी आज त्यातून प्रचंड शक्ती निर्माण होईल; म्हणून संघात प्रार्थना ही अत्यंत महत्त्वाची प्रेरणा आहे. या मंगल राष्ट्रगीताने माणसे एकत्र येतात, त्यांची मने जुळतात. ज्ञानप्रबोधिनीचे संस्थापक कै. अप्पासाहेब पेंडसे यांची 'सगा' नावाची एक अतिशय उत्कट कथा त्यांच्या 'विवेकानंद आणि इतर गोष्टी' या संग्रहात वाचायला मिळते. मी ती अनेकदा कथाकथनाच्या कार्यक्रमात सांगतो. ज्याला आपण प्रयागच्या संगमावर प्रवाहाच्या मधोमध नाव उलटून देण्याची धमकी देऊन लुटायला निघालो आहोत तो विनायक, मृत्यूला सामोरे जाण्यापूर्वी जी

प्रार्थना म्हणतो ती ऐकून नावाडी - रामप्रसादला अशीच एकत्र प्रार्थना करणाऱ्या हजारो माणसांची आठवण होते आणि त्यावेळी कुण्या साधुपुरुषाने सांगितलेल्या 'आपण सारे भाऊ आहोत' या शिकवणुकीचे स्मरण होऊन रामप्रसाद विनायकाला आपला भाऊ मानतो, अशी ती कथा आहे. ती प्रार्थना असते, 'नमस्ते सदा वत्सले मातृभमे'! प्रार्थनेच्या विलक्षण प्रभावावर ती फारच सुंदर कथा आहे -----! संघात प्रार्थनेचा आग्रह आहे तो असा मूलगामी आहे. त्या प्रार्थनेच्या प्रत्येक शब्दात हिंदू राष्ट्रीय जीवनाची भूमिका आणि व्यवहार सखोल भरलेला आहे.

**मौलिक गुण :**

या निमित्ताने एक गोष्ट मनात येते. संघात प्रार्थना रोज म्हटली जावी हा आग्रह जसा असतो, तसाच त्या प्रार्थनेत परमात्म्याजवळ मागितलेले पाच गुण ---- शक्ति, सुशील, ज्ञान, वीरव्रत, अक्षय ध्येयनिष्ठा ---- स्वयंसेवकाच्या स्वभावात यावेत, रक्तात भिनावेत असा जाणीवपूर्वक प्रयत्न आपण करतो की नाही याची कार्यकर्त्याने नेहमी तपासणी करीत असले पाहिजे. कालपरिस्थितीप्रमाणे आणखी काही गोष्टींचेही संस्कार होणे जरूरीचे असतेच, पण या पाच गुणांचा पाया संघाच्या कार्यातून आणि कार्यक्रमातून घातला जावा ही मौलिक अपेक्षा असते.

हिंदूंचे संघटन करायला आपण निघालो; जन्माने हिंदू असले म्हणजे प्राथमिक आधार जमला हे खरे; पण पुढे ते कर्माने देखील हिंदू' बनले पाहिजेत तरच त्या संघटनेच्या शक्तीचा 'स्वराष्ट्राला परम वैभवापर्यंत नेण्यासाठी' सार्थ उपयोग होऊ शकेल. तेव्हा या गुणांची जोपासना करण्याकडे आपले पुरेसे लक्ष असायलाच हवे. जगाला अजिंक्य अशी सामूहिक शक्ती कशी उत्पन्न होऊ शकते, याचा कार्यकर्त्याने शास्त्रशुद्ध अभ्यास केला पाहिजे. आपल्या विचाराप्रमाणे कोणत्या विशेष गोष्टी हिंदू म्हणविणारामध्ये असल्या पाहिजेत याबद्दल समजून घेतले पाहिजे. हिंदूंच्या मौलिक गुणधर्मांची वाढ प्रत्येकाच्या स्वभावात करण्याचा प्रयत्न करीत करीत, अशांची संघटना बांधायची, हा आपला मुख्य प्रयत्न आहे ना? मग त्यासाठी त्या मौलिक गुणधर्मांची ओळख करून घेणे आवश्यकच आहे. वैदिक अर्थाने हिंदू शब्दाची नेमकी कल्पना काय आहे हा एक स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे, आणि ज्याला ज्या प्रमाणात जमेल तेवढा तो त्याने

अवश्य करावा. पण संघाची प्रार्थना प्रत्येक माणसाच्या ज्या चार वैयक्तिक सद्‌गुणांचा स्पष्टच उल्लेख करते, त्यांच्या बाबतीत तर प्रत्येक कार्यकर्त्याने भरपूर चिंतन केलेच पाहिजे. तेव्हा त्या चार गुणांची थोडी चर्चा उपयोगी ठरेल –

**सुशीलं जगद्येन नम्रं भवेत् :**

जग ज्यामुळे नम्र होईल असे उत्तम शील परमात्म्याजवळ मागितले आहे. आपल्या चांगुलपणामुळे जग आपल्यापुढे नम्र व्हावे, जगाने आपला आदर करावा अशी आकांक्षा बाळगणारे जगातले 'हिंदुराष्ट्र' हे एकमेव राष्ट्रच म्हणावे लागेल! आपल्या पाशवी शक्तीच्या भीतीमुळे, आपल्या जबरदस्त विध्वंसक टाचांखाली भरडले जाण्याच्या भयाने, आपल्या शस्त्रास्त्रांच्या विघातक स्फोटकतेमुळे जगाने आपल्याला घाबरावे आणि आपला वचक बाळगावा अशी इच्छा असणारी इतर राष्ट्रे असतातच. आपल्या धनसंपत्तीच्या बळावर इतरांच्या रोजच्या जीवनाच्या देखील नांग्या आपण आखडू शकतो या गळचेपीच्या दराऱ्यामुळे इतरांनी आपल्या आर्थिक गुलामीत राहावे अशी आकांक्षा ठेवणारीही राष्ट्रे असतातच. पण आपल्या सदाचारामुळे जग नम्र व्हावे आणि जगाने आपल्या राष्ट्राला वंदनीय मानावे असा विचार हिंदुराष्ट्रातच स्वाभाविकपणे येतो. अर्नाल्ड टॉयन्बीचे जे आडाखे वर सांगितले, त्याचे गमक हेच आहे. संघाने म्हणूनच या सत्त्वशीलाची कास धरली आहे.

संघ ही सज्जनांची संघटना आहे असे विरोधीदेखील मान्य करतात, त्याचे हे रहस्य आहे. संघाच्या संघटनेची भीती कुणाला वाटत असेल तर ती दुर्जनांना, संकुचित स्वार्थासाठी भारतमातेला विसरून राजकारणातल्या कोलांट्याउड्या मारणारांना. शीलवान माणसाच्या शब्दात जी शक्ती असते, ती दुष्टांच्या शस्त्रातदेखील नसते. या शीलाची कामना संघाच्या प्रार्थनेत सुरुवातीपासूनच आहे हे लक्षात घेतले म्हणजे संघाचे कामच अत्यंत विधायक स्वरूपाचे आहे हे उघड होते; अर्थात् सज्जनपणाला शक्तीचीही जोड हवीच, दुबळ्याच्या चांगुलपणाला कमजोरी समजले जाते हा रोकडा अनुभव लक्षात घेऊन सज्जनतेची एकजूट झालेली शक्ती उत्पन्न करण्याकडे संघाचे लक्ष आहे. व्यक्ती म्हणून हिंदू माणसाने सत्शील असले पाहिजे हा संघाचा आग्रह आहे.

**श्रुतम्, यत् स्वयं स्वीकृतं कण्टकाकीर्णमार्गं सुगं कारयेत् :**

आपण होऊन स्वीकारलेल्या, काट्याकुट्यांनी भरलेल्या मार्गाला सुलभ करणारे ज्ञान आम्हाला दे अशी परमेश्वराजवळ प्रार्थना केली आहे. सुरुवातीला ज्या आत्मविश्वासाचा (Conviction) उल्लेख केला आहे, तो आपल्या कार्याबद्दलचा विश्वास, ज्ञान नसेल तर उत्पन्न होत नाही. संघाने स्वीकारलेला मार्ग कण्टकाकीर्ण आहे या एका शब्दात कितीतरी खोल अर्थ भरलेला आहे. आज साऱ्या हिंदू राष्ट्राला त्या मार्गावरूनच जावे लागणार आहे. या मार्गावर सत्तेच्या पायघड्या नाहीत, धनसंपत्तीची उधळण नाही, प्रतिष्ठा आणि मोठेपणाची रोषणाई नाही. श्रीगुरुजींचे अत्यंत आवडते एक गीत होते - 'असु अम्ही सुखाने पत्थर पायातील । मंदीर उभविणे हेच आमुचे शील ।।' - त्या भावनेने आपल्या मार्गावरून वाटचाल करायची आहे. अशी वाटचाल करणाराला आपले पाऊल भक्कमपणे टाकण्यासाठी ध्येयाचे, मार्गाचे आणि लागणाऱ्या कष्टांचे पुरेसे ज्ञान असायला हवे. परिस्थितीची पूर्ण जाणीव असायला हवी. पं. दीनदयाळ उपाध्याय यांची ओळख करून देताना श्रीगुरुजींनीच एकदा म्हटले होते की 'यांच्या हृदयात आग आहे, पण शिरावर बर्फ आहे!!' अशी मुळीच न डळमळणारी निष्ठा ज्ञानामुळेच उत्पन्न होते.

'विहिरीमध्ये अपार पाणी आहे. परंतु पोहरा जर वाकणार नाही तर त्याच्यात पाणी शिरणार नाही. नम्रपणा हा ज्ञानाचा आरंभ आहे. जेथे आदर नाही तेथून आपल्याला ज्ञान घेता येणार नाही. आपण सर्वज्ञ आहोत, आपणास कोण काय देणार, या ऐटीत राहिल्यामुळेच कितीतरी लोक अज्ञानात राहतात, अंधारात राहतात-' असे निवेदितेने म्हटले आहे. ज्याला लोकांच्या जागरणाचे काम करायचे आहे त्याला आपल्या मनाची कवाडे उघडी ठेवली पाहिजेत. आणि अशा कार्यासाठी लागणारे ज्ञान म्हणजे केवळ माहिती (information) नव्हे; अनुभूति (realisation) असायला हवी!! म्हणून संघाच्या व्यवहारात अनुभवाला जास्त महत्त्व असते - केवळ माहितीला नाही. एकंदरच संघातले वळण 'एखादी तरी ओवी - अनुभवावी' या प्रकारचे असते, त्याचे मुख्य कारण हेच आहे! चौफेर नजर असावी. काय घडते आहे याची जाणीव असावी, काय करायचे आहे याची पक्की दिशा असावी, आणि स्वतः ते पुढे होऊन करायचे अशी उभारी असावी,

असाच संघात संकेत असतो, तो यामुळे! संकटमय मार्ग चालून जाण्यासाठी हवे, ते हे ज्ञान!!

**समुत्कर्ष निःश्रेयसस्य एकं उग्रं परं साधनं, नाम वीरव्रतम्- :**

हे वीरव्रत देखील संघाच्या प्रार्थनेत पहिल्यापासूनच समाविष्ट केलेले आहे. शरीराच्या मृत्यूनंतरदेखील जीवनशक्तीचे पुढेही अस्तित्व असते असा आपल्या तत्त्वज्ञानाचा अभ्यासपूर्ण अनुभव आहे; शरीर संपले म्हणजे सारेच संपले असे हिंदू विचार मानीत नाही. तेव्हा 'परलोक' ही कल्पना आपल्या दृष्टीने शास्त्रशुद्ध आणि अनुभवाने सिद्ध झालेली आहे. याचा तपशीलाने अभ्यास ज्याचा त्याने करावयाचा, पण त्या परलोकात देखील काही भले काम आपल्या हातून घडावे आणि त्याचा साऱ्या समाजाला उपयोग व्हावा अशी आपली शिकवण असते.

पण त्याचबरोबर या शरीरात आपण आहोत तोपर्यंत आपले या लोकांतले कर्तव्य आपण करून संपूर्णपणे श्रेष्ठ स्थान आपल्या समाजाला मिळवून दिले पाहिजे हाही आपल्या विचाराचा आग्रह असतो. भगिनी निवेदिता यांनी सांगितले आहे - 'हे जग म्हणजे आत्म्याची पाठशाळा आहे. पाठशाळेच्या बाहेर अनंत जीवन आहे ही गोष्ट खरी, परंतु शाळेच्या जीवनात जो उत्कृष्ट काम करील तोच शाळेबाहेरही उत्तम रीतीने वागेल. जो या मर्यादित जगात नीट खेळला, तोच अनंत जीवनातल्या खेळात खेळाडू म्हणून शोभेल. जो इहलोकात चांगला वागेल त्यालाच परलोकाची मजा!' 'समुत्कर्ष' आणि 'निःश्रेयस' या दोन कल्पनांची ही केवळ थोडीशी ओळख आहे.

पण या दोन्ही गोष्टी ज्या माणसाला आणि समाजाला साधायच्या असतील त्याचे त्यासाठी श्रेष्ठ पण उग्र असे साधन, म्हणजे वीरव्रत! वीरव्रती माणसाची वीरता केवळ शारीरिक रणकौशल्यापुरती नसते, ती त्याच्या हृदयात असते. वीरव्रत हे जगण्याचे व्रत आहे, केवळ हुतात्मा म्हणून मरण्यापुरतीच त्याची सीमा नाही. वीराला प्रवाहाविरुद्ध पोहायचे असते. निर्भय होऊन, कोणत्याही लोभाला किंवा संकटाला न डरता त्यावर स्वार व्हायचे असते. बंदूक लढत नाही-त्यामागचे हृदय लढते! असे लढणारे हृदय वीरव्रतीचे असावे लागते. संघाच्या जुन्या प्रार्थनेत श्रीरामदूताला विनविले होते की आम्हाला वीरव्रतधारी बनण्याची प्रेरणा दे. तो रामदूत

हनुमान खरोखरच वीरव्रतींचा अद्वितीय आदर्शच म्हटला पाहिजे. हनुमान म्हणजे मूर्तिमंत वीरव्रत! मिर्धाराने कोणतेही काम तडीस नेणारा प्रत्येकजण, आपापल्या क्षेत्रातला वीरच! भारत भक्ति स्तोत्रातल्या सगळ्या श्रेष्ठ व्यक्तींनी जे काही महत्कार्य केले, ते त्यांच्या वीरव्रतामुळेच. संघाच्या संस्कारातूनही असे वीरव्रताने चालणारे पुढे सरसावले. विवेकानंद शिला स्मारक, वनवासी कल्याण आश्रम, कुष्ठनिवारण संघ, ही आणि अशी अनेक परिवारातली कार्ये कुणा वीरव्रतींचीच जागती प्रतीके आहेत. जिद्द, आत्मविश्वास, यशाची खात्री, हिम्मत, पण त्याचबरोबर समतोल बुद्धी यांच्या जोरावरच कुणीही वीरव्रती शून्यातूनदेखील उत्तुंग काम उभे करू शकतो, कण्टकाकीर्ण मार्गावरही दमदार पावले टाकू शकतो.

**अक्षया तीव्रा ध्येयनिष्ठा हृदन्तः अनिशं प्रजागर्तु । :**

आमच्या हृदयात तीव्र आणि कधीही कमी न होणारी ध्येयनिष्ठा सतत जागती राहू दे, असे मागणे केले आहे. ध्येयावरची अढळ निष्ठा पिढ्यान्पिढ्या ज्या लोकांमध्ये चालत राहते, ते समाज इतिहास घडवितात! माणसे बदलली, तरी झेंडा पडू देत नाहीत, कारण ते केवळ एका जीवनाचे कार्य नसते. ध्येयनिष्ठ माणसाच्या मृत्यूनंतरसुद्धा 'कधीही भरून न येणारी' हानी झाली असे भासत नाही, कारण तो आपल्या ध्येयाची कास धरलेली आणखी चार माणसे निर्माण करून जातो! असे लोक हाती घेतलेल्या कामात स्वतःला झोकून देतात, हातचे राखून ठेवीत नाहीत. या आपल्या हिंदुराष्ट्राला परम वैभवाच्या जागी पुनः घेऊन जाण्याचे ध्येय मनात बाळगणारांना अशी सतत चालत राहणारी ध्येयनिष्ठा जोपासलीच पाहिजे. नाहीतर इतक्या मोठ्या कार्याची धुरा न थकता, न थांबता कशी वाहिली जाणार? म्हणून हा चौथा गुण मागितला आहे.

**प्रत्येक बिंदू हिंदुत्वाचा :**

सुशील, ज्ञान, वीरव्रत आणि ध्येयनिष्ठा या चार गोष्टी माणसामाणसाच्या रक्तात आणि स्वभावात भिनल्या, तर जगालाही अजिंक्य अशी सामूहिक शक्ति साहजिकच उत्पन्न होईल. कारण या गुणांनी युक्त अशा लक्षावधी माणसांची 'संहता (संघटित) कार्यशक्ती' संघाला उभी करायची आहे. जुन्या प्रार्थनेतले 'पूर्ण हिंदू' आणि 'रामपंथी' हे दोन शब्दही याच दृष्टीने महत्त्वाचे आहेत. संघ म्हणजे केवळ तोंडाने भारतमातेचा

जयजयकार करीत भगवा झेंडा खांद्यावर घेऊन जाणाऱ्या जमावाचे चित्र नव्हे. त्यातला प्रत्येकजण काही विशिष्ट गुणधर्मांनी भरलेला असला पाहिजे. सैन्यात सारे प्रथम सैनिक असतात, नंतर मग सोयीप्रमाणे कोणी वरिष्ठ, कोणी कनिष्ठ; पण सैनिकी बाणा आणि गुणविशेष प्रत्येकात भरलेले असावे लागतात. पाण्याच्या प्रत्येक थेंबात दोन अंश हायड्रोजन आणि एक अंश ऑक्सिजन असलाच पाहिजे, म्हणजेच अशा असंख्य थेंबांचा मिळून जो महासागर होतो, तो प्रचंड प्रभावी असतो! संघात ही कल्पना सुरुवातीपासून स्पष्ट आहे; त्यामुळे संघाच्या प्रार्थनेत कुठेही गुळमुळीतपणा नाही, निरर्थक शब्द नाही.

अशी ही संघाची प्रार्थना रोज मन एकाग्र करून, आणि म्हणताना अर्थ मनात आणून म्हटली तर त्याचा विजेसारखा (electrify) परिणाम होतो. माणूस प्रार्थनेतल्या आकांक्षांना आपल्या आयुष्याचे ध्येय मानून बऱ्यावाईट साऱ्या प्रसंगातही कामात टिकून राहतो असा संघाचा पिढ्यान्‌पिढ्यांचा अनुभव आहे. म्हणून साहजिकच ही संघाची प्रार्थना, संघसंस्कारांचे एक उज्ज्वल बलस्थान आहे!

❑

# ४

भारतमातेवरचे अतूट प्रेम आणि भगव्या ध्वजावद्दलची असीम श्रद्धा मनात घेऊन हिंदुराष्ट्राचे अंगभूत आम्ही सारेजण जेव्हा शक्तिमान परमात्म्याची प्रार्थना करतो आणि त्याच्याकडे 'आमची संकटे क्षणात दूर कर' असली अकर्मण्य मागणी न करता चार श्रेष्ठ गुणांचा, आणि त्यातून उत्पन्न होणाऱ्या अजिंक्य शक्तीने या आपल्या राष्ट्राला परम वैभवाच्या जागी घेऊन जाण्यासाठी आमचे प्रयत्न लौकर यशस्वी होवोत असा आशीर्वाद आपण त्याच्याजवळ मागतो, त्यावेळी आपल्या मनावर नकळत अत्यंत प्रबळ असे संस्कार घडत असतात. शक्तीचे औषध घ्यायला सुरुवात केली, आणि लगेच दोन दिवसांनी कितीशी लाली चेहऱ्यावर आली म्हणून आरसा पाहू लागलो तर काय फरक दिसणार? पण पुरेसा तीन-चार महिने त्या औषधाचा खुराक नियमितपणे चालू ठेवला म्हणजे आपोआप झोप, भूक, पचन, उत्साह सगळे ताळ्यावर येते, आणि मुख्य म्हणजे डोकेही ठिकाणावर येते! आत्मविश्वास वाटू लागतो, कुठलेही काम करण्याची हिरीरी वाटते. तसेच संस्कारांचे आहे. आपल्या संघातल्या दिवसांची भारतमाता, भगवाध्वज, प्रार्थना या पायावर उभारणी होऊ लागते, आणि हळूहळू जीवनाला एक वेगळाच अर्थ येतो. फार पूर्वी महाराष्ट्राचे माननीय प्रांतसंघचालक श्री. बाबाराव भिडे यांनी एकतेत एक सुंदर लेख लिहिला होता, त्यात ते लिहितात –

'रस्त्यात अनेक माणसे इकडून तिकडे जातात, घाईघाईने चालत असतात. कुणाला क्षणभर थांबवून विचारले की कुठे निघाला आहेस? - तर

तो तेवढ्यापुरते डोळ्यासमोर असेल ते सांगतो. पण जीवनात कुणीकडे तू चालला आहेस या प्रश्नाचे उत्तर कितीजणांना देता येईल? आपण असा विचार केला पाहिजे की या प्रश्नाचे आपले उत्तर नक्की आणि स्पष्ट असायला हवे!' संघातल्या संस्कारांच्या पायाभरणीतले तीन बलिष्ठ संस्कार आपण पत्करले म्हणजे माननीय बाबांनी मांडलेल्या या प्रश्नाचे उत्तर हळूहळू उलगडू लागते. भारतमाता आणि भगवाध्वज या दोन श्रद्धा-संस्कारांची बळकटी नित्याच्या प्रार्थनेतून हळूहळू होऊ लागते आणि श्रद्धेबरोबरच एक निष्ठा (Conviction) उत्पन्न होऊ लागते. प्रार्थनेचा अर्थ समजून ती रोज म्हणता म्हणता, नैसर्गिकच मनात येऊ लागते की नुसते परमात्म्याला साकडे घालून चालणार नाही- मला स्वतःला त्याबरोबरच आपल्या जीवनात काही निर्धार करावे लागतील, एका मुशीतून जावे लागेल, काही व्रत पत्करावे लागेल! आपल्याच मनाशी संघाचा स्वयंसेवक असा विचार करू लागला की त्याची जाणीव त्याच्याबरोबरच्या कुशल कार्यकर्त्यांना होतेच, आणि मग एका पवित्र दिवशी, शुंचिर्भूत मनाने संघाच्या चौथ्या बलस्थानाला स्वयंसेवक आपणहून सामोरा जातो, आणि संघाची महामंगल **'प्रतिज्ञा'** घेतो!

**त्यात आम्ही लीन! :**

संघाची प्रतिज्ञा हे प्रत्येकाच्या थेट हृदयाशी जाऊन भिडणारे संस्कारांचे विलक्षण बलस्थान आहे. तेथे दुसऱ्या कशाला, कुठल्याच क्षुद्रतेला शिरकाव नाही. प्रतिज्ञा घेतली की ती त्याच्या जीवनाचे अभिन्न अंग बनून जाते. या प्रतिज्ञेची थोरवी त्याला पुन्हापुन्हा सांगावी लागत नाही, प्रतिज्ञेचे वार्षिक पुनरुच्चारण करावे लागत नाही. 'रूप तुझे कैसे पाहू? - त्यात आम्ही लीन' - असे चोखामेळा म्हणतो ना? विठ्ठला, तुझ्या रूपात आम्ही सर्वस्वी सामावून गेलो असताना त्याच्याबाहेर डोळ्यांनी ते रूप आम्हाला कसे पाहता येईल?' तशी एकरूपता संघ-स्वयंसेवकाची आपल्या प्रतिज्ञेशी व्हायला हवी. माणसाच्या जीवनात प्रतिज्ञेला एक वेगळीच जागा आहे, तिची तुलना इतर कोणत्याही गोष्टीशी होऊ शकणार नाही. 'प्राण जाय, पर वचन न जाई' असा रामचंद्र दृढप्रतिज्ञ होता असे तुलसीदासांनी म्हटले आहे. ठाऊक असलेल्या इतिहासात जगात असे काही लोक होऊन गेले की ज्यांच्या शब्दाची दृढता प्रचंड कातळासारखी अभेद्य होती. त्यांच्या नावाचा वेगवेगळा उल्लेख करण्याऐवजी असे म्हणता येईल की आयुष्यभर ज्यांनी आपल्या

प्रतिज्ञेच्या पूर्ततेसाठी सर्वस्व पणाला लावले, अशांनीच इतिहास घडवला; शब्द फिरवीत केवळ स्वार्थाचा डावपेच करणारांना जग स्मरत नाही!

**प्रतिज्ञा :**

**शोधून पाहू म्हटले तरी संघाच्या प्रतिज्ञेबद्दल लिहून ठेवलेले किंवा व्याख्याने दिल्याचे संकलन कुठे सापडणार नाही. प्रतिज्ञेचा कार्यक्रम जेथे जेथे होतो तेथे त्यासंबंधी कुणी अधिकारी अवश्य काही मार्गदर्शनपर बोलतातही; पण संघाने विचारपूर्वक प्रार्थना सामूहिक केली आणि प्रतिज्ञा मात्र वैयक्तिक ठेवली. प्रार्थना 'वयम्' म्हणजे 'आम्ही सारे' करतो, प्रतिज्ञा एकवचनी आहे, आत्मलक्ष्यी (Subjective) संस्कार आहे. प्रतिज्ञेचे शब्दच पहा ना –**

**"सर्वशक्तिमान श्री परमेश्वर आणि आपल्या पूर्वजांचे स्मरण करून मी प्रतिज्ञा करतो की, आपला पवित्र हिंदू धर्म, हिंदू संस्कृति आणि हिंदू समाज यांचे संरक्षण करून हिंदूराष्ट्राची सर्वांगीण उन्नति करण्यासाठी मी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा घटक झालो आहे. संघाचे कार्य मी प्रामाणिकपणाने, निःस्वार्थबुध्दीने आणि तन-मन-धनपूर्वक करीन, व या व्रताचे मी आजन्म पालन करीन."**

**॥ भारत माता की जय ॥**

प्रतिज्ञा ही सर्वस्वी आत्मानुभूतीची गोष्ट आहे. प्रतिज्ञा घेण्याची कुणालाही सक्ती, घाई केली जात नाही. 'स्वयंस्वीकृतम्' अशी ती धारणा आहे. ती आपण होऊनच मनात निर्धार करून, मगच पत्करली पाहिजे, असा संघात संकेत आहे. पण संघाची प्रेरणा ज्याच्या मनात जागी झाली, आणि ज्याने हे काम आपल्या हातून झाले पाहिजे असे ठरविले, त्याने प्रतिज्ञा अवश्य घ्यावी असा मात्र योग्य आग्रह संघात आहे.

**प्रतिज्ञाच का? :**

एक प्रसंग या बाबतीत सांगण्यासारखा आहे. एक सर्वमान्य आणि अत्यंत सचोटीचे म्हणून प्रसिद्ध असलेले न्यायाधीश सेवानिवृत्त झाल्यावर संघाच्या संबंधात आले. काही काळातच संघविचार त्यांनी ध्येय म्हणून स्वीकारला. एकदा प्रतिज्ञा घेण्यासंबंधीची गोष्ट निघाली तेव्हा आपण प्रतिज्ञा अवश्य घ्यावी असे श्रीगुरुजींनी त्यांना सुचविले. न्यायाधीश म्हणून या गृहस्थांचा इतका दरारा, की खोट्या मुद्यांवर उभारलेला खटला

त्यांच्यासमोर कोणताच् वकील जिंकू शकणार नाही असे म्हटले जाई. ते म्हणाले, 'प्रतिज्ञाच कशाला घ्यायला हवी? मी माझा शब्द दिला तुमच्यासमोर, तो फिरायचा नाही!!'

त्यावर श्रीगुरुजींनी त्याना समजावून सांगितले ते फार मोलाचे आहे. श्रीगुरुजी म्हणाले, 'तुमच्या शब्दाच्या दृढतेबद्दल मला पूर्ण खात्री आहे. पण प्रतिज्ञेचा विधी आपण संघात करतो तो प्रत्येकाने भगव्या ध्वजासमोर काया-वाचा-मनाने या व्रताचे आजन्म पालन करण्याची मनोमन खूणगाठ बांधावी म्हणून. हा अत्यंत पवित्र असा एक आवश्यक संस्कार आहे. एकदा अशी प्रतिज्ञा घेतली, म्हणजे जीवनात येणाऱ्या भय आणि मोहाच्या कोणत्याही क्षणी आपले पाऊल स्वीकारलेल्या मार्गावरून घसरू नये यासाठी ती आपला आधार बनते; कारण ती आपण भगव्या ध्वजासारख्या कधीही न डगमगणाऱ्या शाश्वत प्रतीकासमोर उभे राहून, मन एकाग्र करून घेतलेली असते!!'

**सामूहिक मने :**

याच संकेताची दुसरी एक बाजूही तितकीच महत्त्वाची आहे. प्रतिज्ञा प्रत्येकजण आपापली व्यक्तिगत घेतो- हे खरे, पण असे प्रतिज्ञा घेतलेले आपण शेकडो-हजारो-लाखो आहोत ही सामूहिक जाणीव एक विलक्षण शक्ती उत्पन्न करते. आत्मविश्वास जागा करते. एक सामूहिक मन निर्माण करते. 'हिंदू हम सब एक' ही प्राथमिक जाणीव, त्यापुढे 'आम्ही संघाचे स्वयंसेवक' ही जास्त नेमकी सामूहिक भावना, आणि 'आम्ही सारे प्रतिज्ञा घेतलेले आहोत' ही तीव्रतम एकत्वाची अनुभूती! पहिली जन्माने आली, दुसरी गणवेष-अनुशासन-कार्यक्रम यामधून व्यवहाराने वाढली, आणि तिसरी मात्र अत्यंत उत्कट अशी, मने जुळल्यामुळे उत्पन्न झाली. त्यामुळे संघाच्या प्रतिज्ञित स्वयंसेवकांची सामूहिक मनाची ताकद खरोखरच 'विश्वस्य अजय्यां शक्तिम्' निर्माण करू शकते. कुठलीही प्रतिज्ञा मनापासून पाळणारांची एकजूट झाली म्हणजे पहाडही उलथून टाकता येतात असे इतिहासात अनेकदा अनेक ठिकाणी घडले आहे. म्हणून वैयक्तिक बळकटपणा, आणि एकत्रित सामर्थ्य ही प्रतिज्ञेची दोन्ही अंगे लक्षात घेऊन संघाने प्रत्येक जाणत्या स्वयंसेवकासाठी ही महन्मंगल आणि प्रेरणादायी प्रतिज्ञा परम पवित्र भगव्या ध्वजासमोर उभे राहून घेण्याचा एक विलक्षण प्रभावी संस्कार

उत्पन्न केला. कुठल्या ना कुठल्या कारणाने संघाच्या संबंधात आलेल्या माणसावर क्रमाक्रमाने पैलू पडावेत आणि त्याचे तेज वाढत जावे यासाठी, संघनिर्मात्याने अत्यंत कुशलतेने निवडलेल्या बलस्थानांपैकी 'प्रतिज्ञेचा संस्कार' हे असे एक मुळापर्यंत पोचणारे बलस्थान आहे.

**सावरणारी खूणगाठ :**

माणसाला प्रतिज्ञेचे विस्मरण होणारच नाही, कधी पाय घसरणारच नाही, एकदा बनला की 'बन चुका', असा भ्रम संघाच्या निर्मात्याच्या मनात कधीच नव्हता. माणूस चुका करू शकतो, आपल्या पायरीपासून ढळू शकतो, म्हणून कुणा माणसाला गुरू मानणे धोक्याचे असते - निराशा उत्पन्न करणारे असते. असे समजावून सांगून, अढळ अशा भगव्या ध्वजाची गुरूच्या जागी प्रतिष्ठापना करणारा तो महापुरुष; त्याला प्रतिज्ञितांबद्दल देखील असा भ्रम कसा असेल? म्हणून त्यांनी प्रतिज्ञेचा संस्कार स्वस्त आणि वायफळ बनू दिला नाही. अनेक ठिकाणी, प्रवेश करतानाच प्रतिज्ञा घ्यावी लागते; पदाची शपथ, सदस्यत्वाची शपथ, न्यायासनाची शपथ, न्यायालयातली शपथ अशा कितीतरी प्रकारच्या प्रतिज्ञा माणसांना रोजच्या व्यवहारात घ्याव्या लागतात. त्या कितीशा पाळल्या जातात यावर विस्ताराने लिहून हा विषय मला नासवायचा नाही, पण त्या साऱ्या शपथांची, आणि संघातल्यासारख्या प्रतिज्ञेची जातकुळी अगदी निराळी आहे हे मात्र लक्षात घ्यायलाच हवे! मूळ अपेक्षा दोन्हीमध्ये चांगली आणि निर्मळ असली तरी व्यवहारात संघाची प्रतिज्ञा मात्र माणसाला कुठल्या कुठे उंचीवर नेऊन पोचविते. तिची तुलना होऊ शकेल अशा प्रतिज्ञांचा संस्कार जगात फारच थोड्या ठिकाणी सापडेल, कारण संघात प्रतिज्ञा ही औपचारिक प्रथा नव्हे, ती हृदयाची खूणगाठ आहे! घसरता पाय सावरणारा आधार आहे.

**निर्धार :**

प्रार्थनेत आपण सर्वशक्तिमान परमेश्वराला म्हणतो की तुझ्या कार्यासाठी आम्ही 'बद्ध कटीयम्' म्हणजे कंबर बांधली आहे. एखाद्या कामासाठी कंबर कसून उभे राहायचे म्हणजे मनाचा निर्धार करावा लागतो. अत्यंत निर्भयपणे त्याची कास धरावी लागते. नि:शस्त्र असले तरी संत जसे निर्भय होते, तशा निष्ठेतूनच निर्भयता उत्पन्न होते. प्रतिज्ञा ही अशी निष्ठा बळकट करणारी गोष्ट आहे. एकदा प्रतिज्ञा घेतली म्हणजे ''कळिकाळाला

धक्के देऊ - मरणालाही मारूनि जाऊ'' - अशा निधडेपणाने माणूस काम करतो, प्रसंगांना तोंड देतो. बुद्धिनिष्ठ माणसे कधीकधी गैरसमजामुळे अशा काही भावनिक कल्पनांची हेटाळणी करतात, पण बुद्धीला पटेल तेच मी करीन म्हणणाराला देखील कुठेतरी आपली निष्ठा अर्पण करावी लागतेच, आणि त्यात वावगे काहीच नाही. संघाच्या प्रतिज्ञेचे शब्द वारंवार पाहिले म्हणजे असे लक्षात येईल की ती भावड्या भोळेपणाची नव्हे, एका विलक्षण आत्मनिश्चयाचे प्रतीक आहे. आयुष्यात कधीही ती प्रतिज्ञा घेतल्याची माणसाला खंत वाटू नये, पश्चात्ताप होऊ नये अशी परखड बुद्धिनिष्ठेची ती कसोटी आहे. तुझ्या शक्ति-बुद्धि-युक्तीचा पुरेपूर प्रयोग करून ही प्रतिज्ञा पाळण्यासाठी आजन्म कष्ट कर, असे आपल्या कर्तृत्वाला आवाहन आहे!

**स्थायी प्रेरणाच :**

संघातली प्रत्येक गोष्ट प्रत्येकाला आपआपल्या समजुतीप्रमाणे वेगवेगळी दिसू शकेल. याच संस्कारात वाढलेल्या काही मातब्बर मंडळींनी काही पैलूंवर निराळी मते मांडलीही असतील, पण त्यांनी घेतलेली संघाची प्रतिज्ञा त्यांनाही प्रेरणा देत असली पाहिजे. 'हिंदू राष्ट्राची सर्वांगीण उन्नती करण्यासाठी आपण जे काही करतो-लिहितो-बोलतो त्याचा हातभारच लागला पाहिजे' याबद्दल मतभेद होऊ शकणार नाही! सगळ्या कसोट्यांना उतरणारी, आणि प्रत्येक विचारी जागरूक माणसाच्या जीवनाला एक थोर उद्देश प्राप्त करून देणारी संघाची प्रतिज्ञा, याचमुळे गेल्या पाच पिढ्यांना एक विलक्षण प्रेरक शक्ती म्हणून सिद्ध झाली आहे! निरनिराळ्या रंगाचे, पण संस्कारांच्या बलस्थानाभोवतीच रुंजी घालणारे संघाचे लक्षावधी प्रतिज्ञित स्वयंसेवकांचे हे सुंदर इंद्रधनुष्य - सज्जनांना मनोहारी आणि दुर्जनांचा आपल्या टणत्काराने थरकाप उडविणारे ठरले आहे!

**स्वातंत्र्य आणि उन्नती :**

१९४७ मध्ये देशाला राजकीय स्वातंत्र्य मिळाले त्यापूर्वी संघाच्या प्रतिज्ञेत 'स्वतंत्र करण्यासाठी' असा शब्दप्रयोगही होता हे अनेकांना ठाऊक असेल. हा उल्लेख येथे मुद्दाम अशाकरता केला आहे की देशाला स्वातंत्र्य मिळाले पाहिजे ही ऊर्मी संघसंस्कारात प्रमुख जागी होती, याचा विसर पडू नये! 'स्वातंत्र्य' आणि 'सर्वांगीण उन्नती' या एकानंतर एक येणाऱ्या धारणा आहेत आणि साहजिकच 'राजकीय स्वातंत्र्य' हा एक टप्पा आहे,

याची स्पष्ट जाणीव डॉक्टरांनी वेळोवेळी दिलेली होती. या दोन्ही गोष्टी साधण्याकरता संघाच्या कामात 'प्रामाणिकपणाने, निस्वार्थबुद्धीने आणि तनमनधनपूर्वक' लागले पाहिजे ही जागृतीच आजवर कितीतरी लोकविलक्षण उत्तुंग कामे संघाच्या स्वयंसेवकांकडून करून घेऊ शकली आहे; 'हम दिन चार रहे न रहे । ध्येयसाधना अमर रहे ।' हा निर्धार उत्पन्न करू शकली आहे.

**स्वयंस्वीकृतम् :**

एक गोष्ट मात्र म्हणावीशी वाटते. प्रतिज्ञेचे स्मरण औपचारिक कार्यक्रम करून करण्याची संघात पद्धत नसली तरी प्रतिज्ञितांनी 'प्रतिज्ञित' म्हणून एकत्र येणे, संघाच्या जिव्हाळ्याच्या विषयांचा विचार करणे, कामाची चिंता वाहणे, स्वतः काय करतो - करू शकतो याची तपासणी करणे, आपण घेतलेल्या प्रतिज्ञेतल्या निश्चयाला उजाळा देणे, बदलत्या परिस्थितीत पुढची पावले कौशल्याने कशी टाकायची याबद्दल एकत्र विचार करणे या गोष्टी मात्र करायला हव्यात. जे 'माळकरी' असतात त्यांच्या वागणुकीत, ते अमुक केल्याशिवाय राहणार नाहीत आणि अमुक कधीही करणार नाहीत असे खात्रीने सांगता येते. त्यांच्या या निश्चयीपणाची भोळेपणा म्हणून थट्टा करता येणार नाही. तसे संघाच्या प्रतिज्ञित स्वयंसेवकांबद्दल म्हणता आले पाहिजे, आणि त्यासाठी त्याने कुणी आठवण करून देण्याची किंवा बोलावणे करण्याची वाट पाहात बसून चालणार नाही. प्रतिज्ञा ही 'स्वयंस्वीकृत' आहे. तिचे स्मरण आणि पालन आपण होऊनच करायला हवे. अशांनी एकत्र येऊन कार्यात स्वतः होऊनच हातभार लावायला हवा. त्यांनी आपला भार आजच्या तरुण कार्यकर्त्यांच्या खांद्यावर टाकता कामा नये.

**नकळत उंची वाढते :**

संघनिर्मात्याने स्पष्ट सांगितले होते की हे काम आपण निवडक लोकांकरिता (Classes) उभे केलेले नाही. हे लोकसंग्रहाचे, सामान्य माणसाला (Masses) जागविण्याचे काम आहे. तेव्हा सर्वसाधारण माणसाला करता येतील अशा गोष्टींचा आपण आग्रह धरायचा; मग त्याहीपुढे जो आपल्या स्वतःच्या उभारीने आणि कुवतीने जाऊ शकेल त्याने जावे. या कामाचे मापदंड फार उंचीचे (From a high pedestal) ठेवून साधारण मनुष्याच्या आवाक्याबाहेरचे झाले, तर तो दूरच राहील. त्याची फरपट होता कामा नये, त्याने आपण होऊन पुढे-पुढे सरकले पाहिजे.

पण मोठी लक्षात घेण्यासारखी गोष्ट ही आहे की ही भूमिका स्पष्टपणे ठेवतानाच डॉक्टरांनी संस्काराच्या पायऱ्या अशा कुशलतेने मांडल्या की त्यावरून जाणाराचा कस आपला आपण वाढत जावा! भारतमातेची पुत्र म्हणून प्रीती, भगव्या ध्वजाची गुरु म्हणू महती, सर्वशक्तिमान परमेश्वराजवळ कर्तृत्वाच्या गुणांचे मागणे, या चढत्या श्रेणीत संघात त्यांनी सांगितलेला प्रतिज्ञेचा संस्कार म्हणजे परमोच्च बिंदू आहे. माणसाला अंतर्मुख करून त्याला आजन्म क्रियाशील बनविणारी संघाची प्रतिज्ञा म्हणूनच संस्कारांच्या मालिकेतले विलक्षण बलस्थान आहे. अंतरात्म्याच्या शक्तीचे आध्यात्मिक महापुरुषांसारखे विवेचन डॉक्टरांनी केले नसेल, पण हे चौथे बलस्थान निर्माण करण्याची त्यांची योजना त्याच वाटेवरची आहे हे निश्चित! अशी ही मंगल प्रतिज्ञा घेतल्यावर पुढे त्या वाटेने किती जायचे याबद्दल संघ म्हणून काही आग्रह करणार नाही - कारण ते प्रत्येकाला शक्य नाही. आंतरिक शक्ति ज्याची त्याने शक्य तेवढी वाढवावी, पण प्रतिज्ञेतले कर्तव्याचे भान सुटू न देता काम करीत राहावे अशी अपेक्षा डॉक्टरांनी ठेवली. स्वतः ते आजन्म करून दाखविले! श्रीगुरुजी आध्यात्मिक मार्गावर कितीतरी पुढे गेलेले असले तरी त्यांनी देखील सामान्यांच्या चालीने चालत संघ वाढविला. असा हा 'लोकसंग्रह' आणि 'संस्कार' या दोन आघाड्यांचा समन्वय करीत करीत हिंदुराष्ट्राच्या परम वैभवाकडे चाललेला जगन्नाथाचा रथ भरभक्कम घोड्यांच्या ताकदीने ओढला जात आहे. त्यातले प्रतिज्ञा हे एक उंची गाठणारे बलस्थान आहे.

निबंध

# ५

आता एका अतिशय महत्त्वाच्या आणि तितक्याच नाजुक विषयाकडे आपण वळत आहोत, म्हणून त्यापूर्वी काही गोष्टी स्पष्ट केलेल्या बऱ्या. एक म्हणजे संघाचे संस्कार कितीतरी वेगळेवगळ्या कारणांनी आणि मार्गांनी जोपासले जातात, त्या सगळ्याची यादी करण्याची कल्पना या लेखमालेत नाही. संस्कारांच्या इमारतीला देखणेपणा आणि बांधेसूदपणा आणणाऱ्या कितीतरी गोष्टी माणसामाणसांच्या वागणुकीतून आकारत गेल्या आहेत, आणि त्यांचे दर्शन प्रत्यक्ष घटनांमधून आणि अनुभवातूनच घडावयाचे. आपण विचार करीत आहोत तो या इमारतीच्या शाश्वत बलस्थानांचा, तेव्हा अमुक एक विशेष गुणधर्म यात आला नाही, अशा नजरेने कुणी पाहायला नको. अर्थात एखादे महत्त्वाचे बलस्थान कुणी सुचविले तर त्याचे स्वागतच होईल.

दुसरी गोष्ट, आधीचे चार लेख वाचताना माझ्या काही मित्रांनी विचारले की कोणते वाचक हे लिहिताना डोळ्यापुढे आहेत? मला वाटते एक तर हे विषय लहानमोठ्या, नव्या-जुन्या, ज्येष्ठ-कनिष्ठ सर्वच स्वयंसेवकांना नेहमीच महत्त्वाचे आहेत. शिवाय या लेखमालेची मांडणी कदाचित सर्व पातळ्यावर काम करताना उपयोगी पडण्यासारखी आहे. अर्थात हा अखेरचा शब्द नव्हे. प्रत्येकाने आपापल्या कौशल्याने आणखी ती फुलवावी. सर्वात महत्त्वाची बाजू अशी, की संघाशी जवळचा संबंध नसलेले पण उत्सुकता असलेले सामान्य नागरिकदेखील ही लेखमाला वाचतील तर त्यांनाही काही दिशा मिळेल अशा रीतीने लिहिणे व्हावे, अशी खटपट आहे.

यात नवे काही नाही, पण काहीशा नव्या धाटणीने ते मांडले जात आहे; त्याचा काम करणारांना उपयोग व्हावा हीच भूमिका आहे, सर्वसामान्य नागरिकांचे गैरसमज कमी व्हावेत असाही प्रयत्न आहे.

हे खुलासे मुद्दाम या ठिकाणी केले, कारण 'भारतमाता' आणि 'भगवा ध्वज' ही दोन श्रद्धास्थाने, 'प्रार्थना' आणि 'प्रतिज्ञा' ही दोन व्यक्तिगत निर्धार (Conviction) बळकट करणारी विश्वासस्थाने, यांच्यानंतर आता विचार करायचा तो संघाच्या कामाच्या पद्धतीतल्या बलस्थानांचा. त्यातले खूपसे गोधळ उडविणारे, पण विचारपूर्वक उभारलेले मेसू म्हणजे संघाची अनौपचारिक **सामूहिक नेतृत्वाची व अनुशासनाची पद्धती!** 'या पद्धतीने संघाच्या संस्कारांची इमारत बळकट होते' या म्हणण्यालाच कुणी विरोध करील तरी आश्चर्य वाटायला नको, इतके निरनिराळे अर्थ या पद्धतीचे लावले गेलेले आहेत. पण बारीक अभ्यास करून या तत्त्वाचा विचार केला, तुलनेने इतर ठिकाणच्या पद्धती पहिल्या, प्रत्यक्ष वागणूक पाहिली म्हणजे असे लक्षात येते की अनुशासनाच्या सिद्धांतातून संघाचे संस्कार परिणामकारक व्हायला फारच मोठे बळ मिळाले आहे. तेव्हा अर्धवट माहितीमुळे किंवा असूयेमुळे केलेली टीका घटकाभर बाजूला ठेवून या बलस्थानाची ओळख करून घेतली पाहिजे.

**संघनिर्मात्याची भूमिका :**

ही संघाची कार्यपद्धती संघाच्या कामात रुळविणारे डॉक्टर हेडगेवार कुणी सैनिकी पेशाचे नव्हते, किंवा सर्वसत्ताधीश बनून राहण्याची उन्मत्त आकांक्षा बाळगणारे हुकूमशहा नव्हते. ही पद्धत कामाला असावी हा निर्णय त्यांचा एकट्याचा नव्हता, त्यांनी जबरदस्तीने लादलेला नव्हता. निर्लेप व निरपेक्ष सेवाभाव सर्व व्यवहारात बाणणे ही वाटते तितकी सहजसाध्य गोष्ट नाही. संघाच्या रूपाने अशा निरपेक्ष देशसेवकांचा संच उभा करण्याची आकांक्षा बाळगून डॉक्टरांनी प्रयत्न सुरू केले होते. डॉक्टर इतकेच सांगत की 'सर्वांनी मिळून जे ठरवाल ते मला मान्य आहे, पण कोठूनही हिंदू समाजाची आजची अत्यंत निराशामय अवस्था आमूलाग्र पालटून टाकील असे अनुशासनपूर्ण सामर्थ्य शक्य तितक्या लौकर आपल्या समाजात उभे राहिले म्हणजे झाले,' ... (डॉ. हेडगेवार : ना. ह. पालकर पृष्ठ १९३-१९४) पुढे सप्टेंबर १९३३ मध्ये डॉक्टरांनी एका वहीत करून ठेवलेल्या टाचणात

'तुम्ही जन्म दिलेल्या संघाचे तुमच्या इच्छेने व आज्ञेने सुइणीचे काम मी करीत आहे. मला माझी व्यक्तीची किंमत नसून संघकार्याची किंमत आहे-' असे उल्लेख आहेत. अनुशासन हे माणसाने आपण होऊन स्वतःवर घालून घेतलेले बंधन, म्हणजे आत्मानुशासन असते. दुसऱ्या कुणी लादलेले नसते. लहान मुलाला अभ्यास करण्यासाठी सांगावे लागते, समजवावे लागते, वेळीप्रसंगी रागवावेही लागते. पण तोच मोठा झाल्यावर आपला पदवी परीक्षेचा अभ्यास आपण होऊन करतो, जरूर तितके परिश्रम स्वतः होऊन करतो. बरे-वाईट कळू लागले की माणूस आपणच शिस्त पाळतो. जसे त्याला कळू लागेपर्यंत कुटुंबप्रमुखाने त्याच्या वागण्याकडे लक्ष द्यायचे, तशी भूमिका चालकाची असावी ही अपेक्षा. त्याने दिशा दाखवायची, स्वतः तसे वागायचे. पण इतरांची फरपट करायची नाही! प्रत्येकाने जाणून सारी बंधने पाळायची. यातून एक शक्ती उत्पन्न होते. सामूहिक शक्ती!

**खरे अनुशासन :**

काही शब्दांचे अर्थ समजून घ्यायला शब्दकोश फार उपयोगी पडतो, कारण नाना प्रकारचे अर्थ लावले गेले म्हणजे त्यांची कुठल्या तरी मान्य अर्थाशी तुलना करून पहावी लागते. त्यासाठी शब्दकोश काय म्हणतो हे पाहणे चांगले. अनुशासन (Discipline) याचा ऑक्सफोर्ड शब्दकोषातला अर्थ असा आहे -

'training especially of the kind that produces Self-Control, Orderliness, Obedience and Capacity for co-operation'

(मुख्यतः अशा प्रकारचे प्रशिक्षण, ज्यातून आत्मसंयम, व्यवस्थितपणा, आज्ञाधारकपणा आणि सहकार्याची क्षमता उत्पन्न होते-)

**श्रीगुरुजींनी १९६० मध्ये इंदूरला झालेल्या वर्गात सांगितले होते - "अव्यवस्थित मन कोणतेही कार्य करू शकत नाही... चित्ताची व्यवस्थितता हे अनुशासनाचे मानसिक स्वरूप आहे. (दर्शन ४ : पृष्ठ १४) आपल्या संघटनेची शक्ती तिच्या लवचिकपणातच आहे आणि त्यातच तिचा जिवंतपणा आहे. जोपर्यंत झाडात रस आहे तोपर्यंत झाडाच्या फांद्या वाकवाल तशा वाकतील, आणि सोडल्या की पुनः पूर्ववत होतील. परंतु रस संपला की वाळलेल्या फांद्या वाकवताच तुटतील. म्हणूनच केवळ कृत्रिम असे अनुशासन वाळलेल्या झाडाच्या फांद्यांप्रमाणे निष्प्राण आणि तुटणारे असते....जो अमृतरसाने भरलेला आहे**

**त्याला मारण्याची शक्ती जगात कुणातही नाही. तो आपल्या स्वतःच्या भाराने कधी तुटू शकत नाही. मोठ्या वृक्षालाही लहान लहान मुळ्या पेलून धरतात याचे कारण त्या जीवनरसाने भरलेल्या असतात. जर त्या मुळ्या निर्जीव झाल्या तर झाड पडून जाईल. (पृष्ठ २०-२१)**

वरची शब्दकोषातली व्याख्या आणि श्रीगुरुजींनी सोप्या शब्दात सांगितलेली सुंदर उपमा लक्षात घेतलीं, तर संघाच्या कामात कुठल्या प्रकारचे अनुशासन असायला हवे हे नेमके लक्षात येईल. त्यात व्यक्तीला गुलाम बनवून त्याच्याकडून यंत्रासारखे काम घेण्याची कल्पना नाही. कारण माणसाच्या भिन्नतेची गळचेपी करून एकाच साच्याचे वागणे, बोलणे, व्यवहार, विचार यांचा आग्रह धरला तर काय होते याचे अनुभव जर्मनी, इटली, रशिया वगैरे देशांत याच विसाव्या शतकात आलेले आहेत. म्हणून संघाने पत्करलेले अनुशासन लवचिक आहे, माणसाची स्वयंस्फूर्ती जागवणारे आहे, त्याच्या स्वतंत्र प्रतिभेला फुलविणारे आहे. अशी स्फूर्ती आणि प्रतिभा सगळ्यांच्या एकत्र शक्तीसाठी कशी उपयोगी पडेल याचा विचार प्रत्येकाने करावा, असे संघ सांगतो. त्याचसाठी एक प्रकारची निरोगी व्यवस्था अंमलात आणण्याचा प्रयत्न करतो.

**हुकुमशाही नव्हे :**

अशा प्रकारचे अनुशासन यावे, म्हणून निर्णय होईपर्यंत मनमोकळी चर्चा आणि त्यानंतर मात्र अनुशासनाने त्या निर्णयाचे पालन ही व्यवस्था संघाने ठरवली. साहजिकच त्याची तुलना हुकूमशाहीशी (Dictatorship) करता येणार नाही. Dictate, Dictator, Dictatorial, Despotic वगैरे शब्दांचे अर्थ तपासून पाहिले तर त्यात मुख्यतः सक्ती, नाइलाज, 'का' म्हणून विचारता येणार नाही, अशा गोष्टी असल्या पाहिजेत. हुकूमशाही सत्तेवर असणारांच्या हितासाठी, स्वार्थासाठी राबविली जाते. त्यात माणसाचा माणूस म्हणून विचारच नसतो. मुळात हा प्रकारच राजकीय सत्तेशी नाते सांगणारा!

संघासारख्या, कुटुंबाप्रमाणे वाढलेल्या कामाचा तोंडावळा अगदीच वेगळा असतो. माणसामाणसांमध्ये संघटन उभे करायला निघालेल्यांना माणसाची स्वतंत्र प्रतिभा डावलता कशी येईल! संघटनेतला प्रत्येकजण मजबूत असायला हवा, ते त्याच्या स्फूर्तीला खच्ची करून कसे होऊ शकेल?

प्रत्येकजण स्फुल्लिंगासारखा प्रकाशला पाहिजे, असे डॉक्टर हेडगेवार म्हणत. हुकुमाचे ताबेदार काय प्रकाशणार? डॉक्टरांच्या कामाच्या पद्धतीचा एक फार चांगला उल्लेख येथे सांगण्यासारखा आहे. जन्मकाळातच संघाच्या सुरुवातीचे कार्यवाह श्री. रघुनाथ बांडे यांनी एका वहीत केलेली टिपणे अशी आहेत. '२१ जून १९२६ ला झालेल्या एका बैठकीत असे ठरले की 'प्रत्येक स्वयंसेवकाने आपले ध्येय आणि आपल्या संघाचे ध्येय काय असावे हे आपल्या विचाराप्रमाणे लिहून काढावे, त्याबरोबरच आपण स्वतः संघाचे चालक झालो तर संघाची कार्यपद्धती आणि घटना कशी ठेवू हेही लिहावे आणि तो कागद सात दिवसात डॉक्टरांजवळ आणून द्यावा'. डॉक्टरांना असे विचारवंत आणि स्वयंस्फूर्त कार्यकर्ते उभे करायचे होते! (पालकर : पृष्ठ १४३)

**हुकूमशाहीची पृष्ठभूमीच वेगळी :**

कोणता हुकूमशहा असा प्रयत्न करील? हुकूमशाही, सरंजामशाही, एकाधिकारशाही, फॅसिझम यांसारख्या गोष्टी युरोपातल्या विशिष्ट परिस्थितीत रुजल्या. रानटी अवस्थेत माणूस माणसावर कुरघोडी करू लागला आणि केवळ व्यवस्था म्हणून मिळालेले नेतृत्वाचे अधिकार आपली खाजगी मालमत्ता म्हणून वापरू लागला; त्यातून राजेशाहीचा उदय झाला. राजांच्या 'देवाने बहाल केलेल्या' हक्कांचे तत्त्व सत्ताधीश, लोकांच्या माथी मारू लागले. गुलामी लादू लागले. त्याविरुद्ध लोक पेटून उठले आणि लोकशाहीची पहाट उगवली. औद्योगीकरणातून निर्माण झालेल्या संपत्तीच्या विषम वाटणीमुळे चिडलेल्या कामगार-मजूर वर्गाच्या उठावामुळे पैशाच्या जोरावर बलवान झालेल्यांच्याविरुद्ध लोकशाही उभी राहिली. या उठावांचे महत्त्व कमी नाही, पण त्या परिस्थितीत, राजसत्तेच्या किंवा एकाधिकारवादाच्या विरुद्ध ती 'लोकशाही', असा एक नकारात्मक अर्थ युरोपाच्या इतिहासात नोंदविला गेला. ज्या पद्धतीने फॅसिस्ट चळवळी वाढल्या, त्यातून हुकूमशाही फोफावली. कुठे एका माणसाचे वर्चस्व, कुठे एका गटाची बळजोरी. त्याच्या विरोधात लोकशाही ठामपणे उभी राहिली. तशी तिथली परिस्थिती होती.

पण संघाच्या स्थापनेच्या वेळची स्थिती निराळी होती. संघातला आपसातला व्यवहार अगदी **वेगळ्या प्रकाराने जोपासला गेला. त्यामुळे संघाच्या**

**व्यवस्थेतले अनुशासनाचे तत्त्व फार स्वतंत्रपणे वाढले आहे. त्याची तुलना हुकूमशाहीशी करताच येणार नाही. विचार प्रत्येकाने करायचा, सगळे दृष्टिकोण विचारात चर्चेत घ्यायचे, निर्णय होईपर्यंत भरपूर मंथन करायचे, आणि निर्णय घेतल्यानंतर मात्र सर्वांनी त्याचे शिस्तीने पालन करायचे असा संघातला अंतर्गत व्यवहार आहे. त्याचा अनुभव घेतला तरच या तत्त्वाची खरी ओळख कुणालाही होऊ शकेल. कार्यकारी मंडळांची रचना हे तिचे आजचे स्वरूप त्याच्याशी सुसंगत असेच आहे.**

**संघाची घटना :**

१९४८ मध्ये संघाच्या कामावर भारत सरकारने बंदी घातली होती. संघावरचे सगळे काल्पनिक आरोप एक तर सिद्ध करावेत, नाहीतर आरोप मागे घेऊन बंदी उठवावी अशी मागणी करण्याकरता नोव्हेंबरच्या महिन्यात सत्याग्रहाचे शिंग फुंकले गेले आणि जानेवारी १९४९ पर्यंत रोज जागोजागी सत्याग्रही स्वयंसेवक आनंदाने कारावास भोगण्याकरता जात राहिले. श्री. व्यंकटराम शास्त्री, श्री. ग. वि. केतकर, श्री. मौलीचंद्र शर्मा यांच्या मध्यस्थीने पुन्हा सरकारशी पत्ररूपाने बोलणी झाली, व ११ एप्रिल १९४९ ला सिवनी कारागृहातून श्रीगुरुजींनी संघाच्या कार्यपद्धतीवर आधारलेली संघाची घटना लेखी स्वरूपात सरकारकडे पाठविली. त्या घटनेतल्या काही कलमांवर झालेल्या परस्पर-पत्रव्यवहारात संघाच्या कार्यपद्धतीबद्दल जी चर्चा आलेली आहे, ती थोडी तपशीलाने पाहिली, तर संघाच्या भूमिकेवर चांगला प्रकाश पडतो –

> घटनेच्या मसुद्यावर सरकारचे मत कळविताना ३-५-४९ च्या पत्रात (परिच्छेद ६) म्हटले आहे– 'विशेषतः सरसंघचालकांची कर्तव्ये पुरेशा स्पष्टपणे नोंदली गेलेली नाहीत. लोकतांत्रिक कार्यपद्धतीच्या दृष्टीने त्यांची स्पष्ट व्याख्या व सूची केली जावी आणि कोणत्याही एकाधिकारवादी गर्भितार्थाचे लक्षण देखील राहू देऊ नये –'! या पत्राला उत्तर देताना, त्याचप्रमाणे पुढे सरकारशी पत्रव्यवहार बंद पडल्यावर १०-७-४९ ला पं. मौलीचंद्र शर्मा यांना लिहिलेल्या पत्रात श्रीगुरुजींनी म्हटले आहे की 'डॉक्टर हेडगेवारांनी पुढच्या सरसंघचालकाची नेमणूकही केंद्रीय कार्यकारी मंडळाच्या सल्ल्यानेच केली, आणि आता तर घटनेत आम्ही ती केंद्रीय

कार्यकारी मंडळाच्या 'संमतीने' करण्याचे नमूद करीत आहोत! सर्व अधिकार केंद्रीय कार्यकारी मंडळाकडेच आहेत, व सरसंघचालक तत्त्वचिंतक आणि मार्गदर्शक आहेत.'

पुढे संघ-वंदी उठविली जाण्यापूर्वी लिहिलेले श्री. व्यंकटराम शास्त्री यांचे एक विस्तृत निवेदन दै. 'हिंदू' मध्ये प्रसिद्ध झाले. त्यात ते या विषयावर म्हणतात– 'टीकेचा हा मुद्दा कधी माझ्या कल्पनेतही आला नव्हता, आणि मला असे वाटते की या संघटनेचे स्वरूप समजून घेण्यातच काहीशी गफलत होत आहे. शासन किंवा राज्य कधी फॅसिस्ट असूही शकते; पण ज्या संघटनेशी संबंध ठेवणे कुणावरही सक्तीचे नाही तिच्यासंबंधी असे कसे म्हणता येईल? कुणीही तिचा सदस्य वाटल्यास होईल, किंवा नाकारील, किंवा झाल्यावरदेखील आपल्या इच्छेप्रमाणे सोडू शकेल, अशा संघटनेला फॅसिस्ट म्हणणे म्हणजे केवळ तिच्यावरची आपली तीव्र नाराजी व्यक्त करणे होय...! कसेही झाले तरी हा प्रश्न त्या संस्थेच्या सदस्यांचा आहे, कुणा बाहेरच्यांनी आग्रह धरण्याचा नव्हे!!'

प्रत्यक्ष संघाच्या व्यवहारात सरसंघचालकांचे मार्गदर्शन आणि केंद्रीय कार्यकारी मंडळाचा विचारविमर्श यांचा इतका चांगला समन्वय कितीतरी वर्षे सतत होत असलेला पाहिला, म्हणजे संघाच्या अनुशासनाच्या कार्यपद्धतीची हुकूमशाहीशी तुलना करून पाहण्याचे कोणतेच समर्थन होऊ शकणार नाही. बुद्धिमान, कर्तृत्ववान, निर्णयशक्ती असलेले, अनुभवी लोक संघाच्या केंद्रीय आणि स्थानीय कार्यकारी मंडळात असतात, ते सारे कुणा एकाच व्यक्तीच्या मानसिक गुलामीत वर्षानुवर्षे निःस्वार्थपणे काम करतील असे समजणेच वेडेपणाचे आहे. 'सर्वांचे एक विलक्षण सामंजस्य' हाच खरोखर या तत्त्वाचा पाया आहे!

साहजिकच ही घटना तयार करून सरकारला प्रस्तुत केली ती एक त्या विशिष्ट परिस्थितीत उत्पन्न झालेली आवश्यकता म्हणून; परंतु या घटनेत लिहिलेली मूलभूत तत्त्वे प्रारंभापासूनच संघाच्या कामात रुळून गेलेली होती, हे मागच्या सर्व संदर्भावरून सहजच ध्यानात येते. नाही तरी डॉक्टर हेडगेवारांनी संघाचा प्रारंभ करण्यापूर्वी घटना, नियम, पदाधिकाऱ्यांचे अधिकार, आर्थिक व्यवस्था, अविश्वासाच्या आधारावर

निर्माण केलेले विधिनिषेध (चेक्स ॲण्ड बॅलन्सेस्) वगैरे सारे इतर संस्थांप्रमाणे आधी ठरवून मग सुरुवात केली नव्हती, ती त्यांना या गोष्टी ठाऊक नव्हत्या म्हणून नव्हे! त्यांना संघाचे काम वाढवायचे होते ते एका कुटुंबाच्या रूपाने, त्यामुळे या सर्व व्यवस्था हळू हळू संघात आल्या त्या विकासक्रमातील टप्पे म्हणून, आणि स्वाभाविकपणे; आणि कर्तव्याची भूमिका प्रधान असल्याने आपसातल्या अविश्वासाला जागा नव्हती. त्यामुळे संघाची रचना आणि बांधणी अलिखित पण जिव्हाळ्याच्या बंधुतेतून प्रारंभापासूनच झाली; लेखी घटना वाचली म्हणजे देखील त्यातून परस्पर-विश्वासाचे वातावरण वाक्यावाक्यांतून झळकते. हे सर्व संघात सुरुवातीपासून सांभाळले गेले आहे.

**सत्ता नव्हे, पात्रता :**

संघाच्या अनुशासनाची भूमिका भल्याभल्यांच्या चटकन गळी उतरत नाही त्याचे मुख्य कारण हे आहे की, त्यांना असे वाटते की या पद्धतीत सगळे अधिकार एकाच चालकाच्या हाती एकवटलेले असणार आणि इतर कुणाला काही बोलताही येणार नाही. 'अधिकार' या शब्दाचा अर्थ साधारणपणे सत्ता (Power) असा घेतला जातो. पण आपण जेव्हा एखाद्या सत्पुरुषाबद्दल म्हणतो की हे मोठे 'अधिकारी' पुरुष आहेत, तेव्हा त्यांच्या सत्तेचा अधिकार आपल्या मनात नसतो; आपण म्हणतो ती त्यांची पात्रता (Competence)! संगीताच्या कलेच्या क्षेत्रातलाही गुरु त्याच्या योग्यतेमुळे मोठा ठरलेला असतो, त्याच्या सत्तेमुळे नव्हे. तसे संघातले चालकाचे स्थान माणसाच्या योग्यतेवर असते, निवडही त्याच कसोटीवर होते.

संघासारख्या कामात चालकाची जबाबदारी घेणे म्हणजे सुळावरची पोळी! ते स्थान मिळविण्याची अगदी स्पर्धा लागली आहे आणि रस्सीखेच चालू आहे असे कुठे असणार? संघाच्या तीन सरसंघचालकांनी आजवर जो निरंतर कष्टांचा धडा घालून दिला आहे तो लक्षात घेतला म्हणजे संघाचे चालकत्व पत्करणे म्हणजे एक कठिण व्रतच आहे हे समजेल. तीच गोष्ट लहानमोठ्या जबाबदाऱ्या पत्करणारांची. त्यामुळे त्या जागेसाठी, जबाबदारीसाठी, व्रतासाठी जो पात्र असेल तो अधिकारी! म्हणजे त्याची निर्णय घेण्याची शक्तीही पारखून घेतलेली. हे सारे पाहिले म्हणजे संघाचे अधिकारी म्हणजे 'कुणाची रजा नाकारण्याचा अधिकार असलेले' पोटार्थी

साहेब नव्हेत, अधिक कष्टपूर्वक आणि काळजीपूर्वक काम सांभाळणारे कुशल कार्यकर्तेच आहेत, हे स्पष्ट होईल. अशांच्या मार्गदर्शनाने काम चालावे हेच सयुक्तिक नाही का? त्यातूनच अनुशासनाच्या व्याख्येत दिलेले आत्मसंयम, व्यवस्थितपणा, आज्ञापालन आणि सहकार्य करण्याची क्षमता हे गुण उत्पन्न होणार नाहीत का?

या विषयाचे असे वेगवेगळे पदर उलगडून पाहात गेले म्हणजे संघाने अनुशासनाची निवड आपल्या अंतर्गत व्यवहारासाठी का केली हे लक्षात येते. नावाला लोकशाहीतल्या पद्धतीची व्यवस्था आणि प्रत्यक्ष व्यवहारात एकाच व्यक्तीच्या भुवईकडे पाहून सारे काम चालणाऱ्या कितीतरी संस्था आपल्याला दिसतात! संघात पन्नास प्रतिज्ञित स्वयंसेवकांवर एक प्रतिनिधि निवडण्यापासून अखिल भारतीय कार्यकारिणीच्या निवडीपर्यंत सगळी प्रक्रिया तर आहेच, पण केवळ त्याच्या अक्षरांकडे नव्हे तर त्यातल्या कार्यप्रवण भावनेकडे साऱ्यांचे लक्ष एकाग्र असल्यामुळे परस्पर-विचारानेच संघातली कामे सर्व पातळीवर चालतात. संघातले पदाधिकार काही मिळविण्यासाठी नव्हेत, काही जास्त देण्यासाठीच असतात! त्यामुळे खरे तर त्यांना 'पदाधिकार' ऐवजी 'पदकर्तव्ये' म्हणायला हवे. साहजिकच अशी आपल्या कर्तव्याला जागी असणारी माणसे नेतृत्व करीत असली, तर जे संस्कार उत्पन्न होतील तेही कर्तव्यबुद्धीचेच होतील.

**संघात ब्यूरोक्रसी कितपत? :**

तुलना करायचीच झाली तर सामूहिक नेतृत्व आणि अनुशासन यांची तुलना एकाधिकाराशी नव्हे, 'ब्यूरोक्रसी' (अधिकारवाद - officialisation केंद्रीकरण - Centralisation) नावाच्या विकृतीशी करून पाहणे उपयोगी ठरेल. त्या प्रकारात कागदाच्या फाइलीमागे एखादी प्रत्यक्ष घटना, एखादी व्यक्ती, एखादी समस्या, एखादी पीडा दडलेली असते या गोष्टीचाच विसर पडलेला असतो. मोठमोठ्या नोकरशाही विभागांचे काम करताना हा प्रकार नकळत वाढतो आणि मग तो तसाच चालू ठेवणे वेगवेगळ्या पातळ्यांवरच्या अधिकारी मंडळींना सुखाचे असते! कागदाकडे, नियमाकडे, विधिनिषेधांकडे बोट दाखवून मोकळे व्हायचे, स्वतः निर्णय घेण्याची हिंमत करायची नाही, दुसऱ्याने केलेले पसंत पडायचे नाही, अधिकाराचा उपयोग मुख्यतः 'नाही' म्हणण्यासाठी करायचा, अशा तऱ्हेचे कितीतरी मूळ कामाचीच अडवणूक

करणारे दोष उत्पन्न होतात. कागदी घोडे खूप नाचतात, पण कामे होत नाहीत. पाच पन्नास हजारांच्या संस्थेत देखील हे सारे घडते, मग संघासारख्या लक्षावधींच्या अखिल भारतीय संघटनेत तसे घडले असते तरी नवल वाटले नसते. पण या दृष्टीने तुलना करून पाहिली तर काय दिसते?

इतक्या विशाल कामात थोडीफार व्यवस्थेच्या दृष्टीने काही यंत्रणा उभी करावी लागणे अपरिहार्य आहे; पण संघाच्या यंत्रणेत स्वतःच्या प्रेरणेने माणसाने काम करावे हाच मंत्र असल्यामुळे, आणि शिवाय कोणतेही फायदे स्वतःसाठी मिळविण्याची भूमिकाच नसल्यामुळे, संघात ही अशा प्रकारची ब्यूरोक्रसी अनुभवाला येत नाही. अधिकारांची, निर्णयक्षमतेची वाटणी केलेली असली तरी त्यावर दफ्तर-पद्धतीचा परिणाम कमीतकमी झालेला आहे. बारकाईने पाहिले तर एवढ्या प्रचंड संघटनेत ब्यूरोक्रसी नगण्य म्हणावी इतकी कमी कशी, आणि तरीही ही संघटना इतकी शिस्तबद्ध आणि समान विचाराने चालणारी कशी, याचे दुरून पाहणाराला नवल वाटते!

याचे थोडक्यात उत्तर एकच आहे की संघाच्या कामाची आणि त्यातल्या व्यवहाराची भूमिकाच इतर कोणत्याही संस्थेपेक्षा अगदी वेगळी आहे, आणि लोकोत्तर अशा संघनिर्मात्याने ती मोठ्या काळजीपूर्वक रुजविली आहे. संघाचा स्वयंसेवक प्रतिज्ञेत जे शब्द उच्चारतो, ते केवळ शब्द राहात नाहीत, जिवंत उदाहरणांनी ते नेहमी त्याच्या नजरेसमोर असतात. साहजिकच इथे कोणीही कुठल्याच स्वार्थासाठी काही सांगत नाही याची खात्री उत्पन्न होते आणि त्यामुळे सांगणाराकडे संशयाच्या नजरेने पाहण्याची दृष्टीच नसते. अशा या लोकविलक्षण वाटणाऱ्या, पण मनुष्याच्या निरोगी अंतर्भावनेला आवाहन करणाऱ्या पद्धतीतून संघ बांधेसूदपणे वाढला आहे आणि ते संघसंस्कारांचे एक भक्कम बलस्थानच ठरले आहे.

❑

# ६

स्वतःच्या उदाहरणाने एखादी गोष्ट लौकर समजावता येते. पटवून देता येते. तसे केवळ बोलून सांगून होत नाही, हा अनुभव सगळीकडे येतो. डॉक्टर हेडगेवारांनी त्यांना जे सांगायचे होते ते आधी केले, मग सांगितले! संघासारखे मूलभूत काम आपल्या देशात वाढले पाहिजे असे ज्याला मनापासून वाटत असेल, त्याने आपले स्वतःचे आयुष्य त्यासाठी कशा रीतीने वळविले पाहिजे यासंबंधी त्यांच्या स्पष्ट कल्पना होत्या. सुरुवातीला दहा वर्षात त्यांनी स्वतःच्या वागणुकीतून त्या कल्पना प्रत्यक्ष व्यवहारात आणून दाखविल्या. कलकत्त्याच्या प्रसिद्ध मेडिकल कॉलेजात उत्तम रीतीने उत्तीर्ण होऊन डॉक्टर होऊन आलेले केशवराव चारचौघांसारखे आपली डॉक्टरी सुरू करतील अशी सगळ्यांची साहजिकच अपेक्षा होती, पण त्यांनी मनाशी ठरविले होते की सगळीकडे दिसत असलेल्या परिस्थितीवर मात करायची असेल तर कुणीतरी झटक्याने जगरहाटीतून बाहेर पडायला हवे, आणि आपले जीवन देशसेवेसाठी लावायला हवे आहे. मग तो कुणीतरी मीच स्वतः असू नये? आणि तेव्हापासून डॉक्टरांच्या जीवनाची दिशा जी ठरली ती तनमनधनपूर्वक देशाच्या मूळ शक्तीची वाढ करण्यासाठी जीवनच अर्पण करण्याची होती. डॉक्टर हेडगेवार हेच संघाचे पूर्ण वेळ देऊन कार्य करणारे पहिले प्रचारक होते! त्यांनी स्वतःच्या उदाहरणाने घालून दिलेली संघाची **प्रचारक पद्धती** संघाच्या संस्कारांचे एक अत्यंत सुदृढ असे बलस्थान बनले.

मोठ्यामोठ्यांना आश्चर्य वाटावे असा हा संघाचा 'प्रचारक' वर्षानुवर्षे फार मोठ्या योजकतेतून, काळजीकाट्याने वाढविलेल्या संस्कारातून उभा राहिला आहे.

**असामान्य परिस्थिती :**

संघाच्या कामासाठी प्रचारक निघावेत आणि त्यांनी पूर्ण वेळ आणि कष्ट करून हेच काम करावे अशी जास्त निकड वाटू लागली डॉक्टर हेडगेवारांच्या निधनानंतर; पण प्रत्यक्ष डॉक्टरांच्याच वेळेपासून शिक्षण घेण्याच्या निमित्ताने परप्रांतात जाऊन तेथे संघाचे काम सुरू करण्यासाठी तरुण मुले जाऊ लागली होती. नुकतेच स्वर्गवासी झालेले मा. भाऊराव देवरस त्यापैकीच. तो काळ असा होता की शिक्षण पुरे झाल्यावर चांगली नोकरी मिळवून किंवा स्वतंत्र व्यवसाय सुरू करून मिळवते व्हावे, आणि हळूहळू कुटुंबाची जबाबदारी मुलाने सांभाळावी अशीच अपेक्षा असायची, आजही असते, आणि त्यात वावगे काहीच नाही. ही जगरहाटी आहे आणि त्यातूनच जग पिढ्यान्‌पिढ्या पुढे चालत राहिले आहे.

पण डॉक्टरांनी असा विचार मांडला की कधीकधी असे दिवस येतात की नाही, की ज्यावेळी सामान्य जगरहाटीपेक्षा वेगळे काहीतरी पत्करून ते दिवस पालटून टाकणारी माणसे पुढे यावी लागतात? आपल्या देशाचे आणि समाजाचे जे चित्र त्यांनी पाहिले, ते फारच चिंतेचे आणि गंभीर रंगांनी भरलेले होते, आणि ते बदलण्याचे बाळकडू देण्यासाठी त्यांनी संघाचे काम सुरू केले होते, म्हणून त्यांचे सांगणे असायचे की असामान्य परिस्थितीत असामान्य कामे करावीच लागतात, ती कुणी करायची?

**नवी निर्मिती :**

दुसरे महायुद्ध सुरू झाले त्यावेळी डॉक्टरांना सारखे वाटत होते की आपण देश स्वतंत्र करून घेण्याची एक मोठी संधी गमावत आहोत, कारण म्हणावे तसे आपले काम वाढलेले नाही. लौकरच २१ जून १९४० ला डॉक्टरांचे निधन झाले. तत्पूर्वी नागपूरच्या संघशिक्षण वर्गात अनेक प्रांतातले स्वयंसेवक आलेले पाहून त्यांना आनंद झाला होता. त्यांचे त्या वर्गातले समारोपाचे भाषण वारंवार वाचून मनन करण्यासारखे आहे. त्यांची ती कार्यवाढीची तळमळ त्यांच्यानंतरही संघाच्या स्वयंसेवकांसाठी एक विलक्षण प्रेरणाच ठरली. कार्यविस्तारासाठी बाहेर पडायचे आणि काही काळ संपूर्णपणे संघाच्याच कामाला वाहून घ्याचे या हिरीरीने तरुण निघू लागले. संघशाखांमधले कार्यक्रम, चर्चा, बौद्धिकवर्ग, गप्पागोष्टी साऱ्यांची दिशा एक होती - आपल्या शाखेतून प्रचारक बाहेर पडले पाहिजेत! यात शाखांची

चुरस लागे, आणि एकेका शाखेतून पाच-पाच सात-सात प्रचारक निघत असत आणि पराक्रमाला निघालेल्या वीराला जसा उत्कट निरोप दिला जातो तशी प्रचारकांची पाठवणी शाखेतून होत असे.

एकदा ही जी प्रचारक श्रेणी संघाच्या कार्यात सुरू झाली, ती आजतागायत सतत वाढतच राहिली आहे. आयुष्याच्या रुळलेल्या वाटेवरून वेगळे वळण घेऊन, अनोळखी वाटेने जाण्याची हिंमत करणे सोपे नसते. सुरुवातीला तर अशा तरुणाला लोक वेड्यातच काढतात. कुटुंबातल्या माणसांना देखील तो एक धक्काच असतो. आपल्या मुलाबद्दलच्या त्यांच्या कौटुबिक आशाअपेक्षांची हेटाळणी करणे बरोबर नाही - ते स्वाभाविक आहे. पण 'माते, चिंता करतो विश्वाची -' असे म्हणणारा नारायण क्षणार्धात त्या पाशातून बाहेर पडला म्हणूनच 'रामदास' झाला आणि महत्कार्य करून गेला! कुणी म्हणेल, अशा आदर्शवादी टोकाच्या गोष्टी सांगून काय उपयोग? पण गुरू गोविंदसिंहांनी प्रत्येक कुटुंबातला एक मुलगा मला सिख्ख (शिष्य)' म्हणून द्या अशी मागणी केली, आणि त्यांना हजारो कुटुंबातून कडवे लढवय्ये तरुण हसतहसत येऊन मिळाले ना? 'देखे कौन सुमनशय्या त्यज कण्टकपथ पर आता है -' हे आव्हान विशिष्ट असाधारण परिस्थितीत करावे लागते, तसे संघानेही केले, आणि त्याला गेल्या पाच पिढ्या सतत प्रतिसाद मिळत आला आहे!

**सतीचे वाण :**

प्रचारकाच्या शिकवणीतल्या अत्यंत महत्त्वाच्या 'हिंदू विचाराचा मंत्र, आणि संघाच्या कार्यपद्धतीचे तंत्र,' या दोन गोष्टी. हिंदूंना एकत्र आणायचे आणि संघाच्या योजनेप्रमाणे त्यांना संस्कार द्यायचे या कामावर प्रचारकाला एकाग्रतेने लक्ष द्यायचे असते. ही दोन्ही कामे सोपी नाहीत. त्यासाठी खूप वेळ द्यावा लागतो, विलक्षण परिश्रम करावे लागतात. आणि शिवाय स्वतःचे उदाहरण घालून द्यावे लागते. 'स्वतःसाठी यातून काही मिळण्यासाठी नव्हे, तर तूच जे काही मनाच्या-शरीराच्या-बुद्धीच्या जोरावर मिळविले असशील त्यातलेच थोडेफार या कामाकरता देण्यासाठी तू पुढे ये'— असे सांगून लोकांना जवळ करणे कठिण असते. सुरुवातीला तर लोकांना अशीच शंका येते की हा माणूस हे सारे कशासाठी करतो? याला स्वतःला यातून काय मिळायचे आहे? काहीतरी स्वतःला मिळत

असल्याशिवाय थोडाच हा हे काम करीत असणार? स्वतःची संग्रहवृत्ती वाढवीत जास्त जास्त स्वार्थ साधण्यासाठी हा आपल्याला संघात या म्हणत नाही, हेच लोकांना लक्षात यायला वेळ लागतो! कारण साधारणपणे अशी माणसे विरळाच असतात, आणि आज आपल्या देशातले वातावरण तर फारच आपले-आपले पाहण्याचे आहे! स्वतःपलिकडे कुणी पाहात नाही.

**हा पोत वेगळाच :**

पण संघाने प्रचारक श्रेणी इतकी नाजुक हातांनी वाढविली की आज संघप्रचारकाचे स्थान सर्वसाधारण समाजात फार आदराचे ठरले आहे. एकेकाळी 'प्रचारक' या शब्दाचा अर्थ स्वतःच्या उपजीविकेसाठी एखाद्या वस्तूच्या प्रचाराची नोकरी करणारा, असाच होता आणि तो व्यवहारात ठीकच होता. पण आपल्या शिक्षणाच्या पदवीच्या–मेहनतीच्या जोरावर आपली उपजीविका दसपटींनी चांगली करू शकतील असे कर्तबगार युवक जेव्हा, केवळ साधारण व्यक्तिगत गरजेपुरते लागेल तेवढेच आपल्याला पुरे, असे मानून संघासारख्या कामात संपूर्ण वेळ आणि कष्ट देण्यास तयार होतात, त्यावेळी त्यांची प्रेरणा 'वेतन' ही नसून 'वतन' (हिंदीत मातृभूमि) ही असते! आणि संघप्रचारक या उदात्त प्रेरणेतूनच काम करीत असतो याची आता लोकांनाही खात्री पटली आहे. अशा निःस्वार्थ कार्यकर्त्यांची फळी संघात एकामागून एक येणाऱ्या पिढीत तयार होत गेली, हे संघसंस्कारांचे एक विलक्षण सुदृढ असे बलस्थान आहे!

**सामान्यातूनच सगळेजण :**

बरे, कुणाला वाटेल की ज्याच्या पाठीमागे काही पाश नाही, घरचे खाऊन पिऊन सुखाचे आहे, मागची चिंता नाही अशी माणसेच या कामाला पुढे येत असतील; पण गंमत अशी असते की अशी माणसेच पुष्कळदा मागची विवंचना नसल्यामुळे पुढची स्वतःच्याच अमर्याद उन्नतीची आणि वैभवाची स्वप्ने पाहात असतात आणि त्यासाठीच दौडत असतात! त्यांच्या महत्त्वाकांक्षेचा मला अधिक्षेप करायचा नाही, आणि ज्याची तीच दृष्टी असेल त्याने ती वाट चोखाळली तर त्याला दोष देण्याचेही कारण नाही.

पण संघाचा अनुभव असा आहे की ज्याला आपल्या सामाजिक कर्तव्याची जाणीव झाली, तो मागे अनुकूलता असो की चिंता असो, ते कर्तव्य करण्यासाठी स्वतःला वाहून घेण्याचा निर्धार आपण होऊन करतो!

हा अनुभवही काही नवा नाही, माहीत असलेल्या इतिहासात प्रभु रामचंद्रांपासून आजपर्यंत शेकडो उदाहरणे अशीच सापडतील. संघाच्या प्रचारकांतले तर बहुसंख्य, आर्थिक दृष्ट्या मध्यम किंवा गरीब कुटुंबांतून पुढे आले, आणि ख्यालीखुशालीचे जीवन जगता येईल अशी स्वतःची योग्यता असतानादेखील पोट बांधून संघाच्या कामात मग्न झाले, असेच दिसेल.

कर्तासवरता हातातोंडाशी आलेला मुलगा कुटुंबाच्या भावी स्थैर्याला हातभार लावण्यासाठी वास्तविक पुढे सरसावयाचा, त्याऐवजी तो संघाच्या कामासाठी जायला निघतो आहे ही बाब त्याच्या पालकांना अडचणीची आणि गोंधळवून टाकेल यात आश्चर्य नाही, पण पालकांनीही कमी-जास्त प्रमाणात बहुतेक सगळ्या घरांतून जुळवून घेतले ही फार मोठी गोष्ट आहे! याचे महत्त्व गंभीरपणे समजावून घेतले पाहिजे. असा तरुण मुलगा काही मिळवून आणण्यासाठी जात नसून जिथे काही मिळायचे नाही अशा कामाकरता जात असताना, त्याला मनापासून आशीर्वाद देणे ही सोपी गोष्ट नाही. प्रथमपासून संघात असेच झाले नाही, अनेक पालकांना रागही आला, आजही प्रत्येकाची परिस्थिती वेगळी, त्याप्रमाणे वेगवेगळे अनुभव येत राहणार. पण आपण ज्याच्यावर कुटुंबाच्या जबाबदारीसाठी आशा लावली, तो घरच्यापेक्षा जास्त 'मोठ्या कुटुंबाच्या' कार्यासाठी जात आहे याची मानसिक तयारी पालक करतात – आणि तेही सर्वसाधारण परिस्थितीतले – हे सारे विलक्षण आहे! संघाने इतक्या वर्षात काय केले असे जेव्हा कुणी विचारतो, तेव्हा त्याला हे लक्षात आणून द्यायला हवे!

**परिस्थितीची निकड :**

मला एक उदाहरण असे ठाऊक आहे की आणीबाणीच्या काळात वडील वीस महिने तुरुंगात डांबले गेले. आईने नाना प्रकारांनी मुलांची शिक्षणे बंद होऊ नयेत यासाठी खटपट केली, आणि घर चालविले. मित्रांनी आधार दिला. फासे उलटले आणि मोकळ्या हवेत वडीलही जेव्हा मोकळे झाले, तेव्हा थोरला मुलगा बी. ई. च्या शेवटच्या वर्षाची परीक्षा देणार होता. परीक्षा झाली, पहिल्या वर्गात तो उत्तीर्णही झाला. वडील वीस महिन्यातली कठिण परिस्थिती आता सांभाळतील, त्याना आपण नोकरी करून हातभार लावायला हवा हे त्यालाही कळत असले तरी संघाच्या कामासाठी काही वर्षे द्यायचा त्याने निश्चय केला होता, आणि प्रचारक

म्हणून बाहेर पडायचे ठरवले होते. अनेकांनी पुन्हा विचार करण्याचा सल्ला मुलाला आणि आईवडिलांना दिला असेल, पण वडील मनापासून म्हणाले, 'काळजी करू नकोस. आता मी आलो आहे, सांभाळून घेईन. तुझी तयारी आहे तर जरूर जा – आमची तुला शुभेच्छा!!'

सहा मुलगे युद्धात मारले गेले, तेव्हा आता उरलेल्या सातव्या मुलाला युद्धाची झळसुद्धा लागू नये म्हणून सांभाळणारी आई. युद्धाच्या बातम्या रेडिओवर रोज यायच्या. एका संध्याकाळी रेडिओवर बातम्या सांगणारी बाई एक युद्धनौका बुडत असल्याची माहिती सांगत होती – 'बोट बुडत आहे. कप्तान धीरानं उभा आहे. सारे नाविक आपापले काम निष्ठेनं, आणि आत्मविश्वासानं करीत आहेत. असैनिकी लोकांना लहान होड्यांतून उतरवलं जात आहे – आता फक्त नाविक राहिले – आता सर्व नाविक उतरले, अधिकारीच राहिले – अधिकाऱ्यांना उतरणं बहुतेक अशक्य होणार आहे –' असे म्हणून ती काही वेळ स्तब्ध झाली! आणि मग पुन्हा म्हणाली – ''श्रोते हो, माफ करा – मी क्षणभर बोलू शकले नाही – बोट संपूर्ण बुडाली आहे – त्या अधिकाऱ्यांमधे माझा मुलगा होता!!' ....... एवढे ऐकले मात्र, आणि हे सारे ऐकत असणारी, सातवाच मुलगा जवळ उरलेली ही आई आवेगाने उठली आणि खुंटीवरची बंदूक काढून मुलाच्या हातात खुपशीत म्हणाली, ''माझ्या वेडीच्या मायेत गुंतून राहू नकोस – ही बंदूक घे आणि लढाईवर दाखल हो. देशाला तुझी गरज आहे!!!'' एका अत्युत्कट इंग्लिश कवितेतली ही कहाणी सांगण्याचा मोह मला आवरला नाही, कारण तिच्यात संवेदनशील पालकाचे काळजाला जाऊन भिडणारे चित्रण आहे.

**स्वयंप्रेरणा :**

आज बंदूक घेऊन लढाईवरच जाण्याचा प्रसंग यायची वाट पाहायला नको. जे महत्कार्य घेऊन संघ निघाला आहे, त्याच्याकरता अशाच तीव्रतेने झोकून देण्याचा विचार करूनच संघाचे प्रचारक निघतात, आणि त्यांचे कुटुंबीयदेखील त्यांना आशीर्वाद देतात. आणि या प्रचारकामधे खेडोपाडीचे तरुण आहेत, मध्यमवर्गातले आहेत, एकुलते एक आहेत, थोरले मुलगे आहेत, अठरापगड जातीतले, निरनिराळ्या भाषांचे आहेत, सगळ्या प्रांतांतले आहेत आणि गडगंज धनसंपत्ती मिळविलेल्या अन् मुलाने घरच्या उद्योगातच 'जॉईन' व्हावे असे वाटणाऱ्या घराण्यातले तरुणही आहेत. संपूर्ण

जीवन संघाच्या कामाकरता दिलेले ज्येष्ठ-श्रेष्ठही आहेत, काही उमेदीची वर्षे देणारेही आहेत. काहीजण सुरुवातीला काही वर्षांपुरते ठरवून जातात आणि नंतर परत येऊन कुटुंबात सामील होतात. काहीजण पुढेही त्याच कामात राहण्याचे ठरवतात. कुणावर जोरा नसतो. कारण हा जोरा करून साधण्याचा विषय नव्हे! संघाच्या एकंदरच कामात सक्ती आणि जबरदस्ती नाही, आणि म्हणूनच संघाचे अनुशासन कुटुंबासारखे आहे ना? मग इतक्या महत्त्वाच्या बाबतीत सक्ती असणेच शक्य नाही. प्रत्येकाचा आपापला निर्णय असतो – एखादा निर्णय परिस्थितीप्रमाणे घ्यावा लागला तरी त्यात कमी लेखणे, हिणवणे, प्रतिष्ठा-अप्रतिष्ठेचा प्रश्न नसतो. अशी ही संघाची प्रचारक श्रेणी संघाच्या कामाचा 'कणा' आहे असे निःशंकपणे म्हणता येईल. आपणही त्यात दोन डाव खेळून आपले कर्तव्य करायला हवे अशीच प्रेरणा घेऊन युवक वर्षानुवर्षे पुढे येत असतात; यायला हवेत!

**देवदुर्लभ फळी :**

शिक्षण पूर्ण करून लगेच नोकरीउद्योगाला न लागता काही काळ संघप्रचाराचे काम निर्धाराने पत्करणाऱ्या तरुणांप्रमाणेच, हळूहळू आणखी एका प्रकाराने संघाची माणसे पूर्ण वेळ देऊन काम स्वीकारू लागली, ती म्हणजे सेवानिवृत्तीनंतर. अशा मंडळींना साहजिकच काही ना काही संस्कार असतो. मुलगे-मुली आपापल्या पायावर उभी झालेली असली तरी पत्नीची साथ असते; पण मनात मात्र ऊर्मी असते की 'सेवानिवृत्तीनंतर किंवा योजनापूर्वक मुद्दाम लौकर निवृत्त होऊन, कुठली मोठी जबाबदारी अपुरी राहिलेली नसताना उगाच दिशाहीन दिवस कंठण्यापेक्षा, काही भले काम करू या.'

तसेच, अगदी आवश्यक तेवढा वेळ आणि कष्ट कुटुंबासाठी देऊन जवळ जवळ पूर्ण जबाबदारी घेऊन संघाचे, किंवा योजून दिलेले एखादे कार्य अनेक मंडळी तनमनधनपूर्वक करीत असतात. एक प्रकारचे हेही संघाचे प्रचारकच म्हणायचे. श्री. बाबा भिडे कितीतरी वर्षे महाराष्ट्राचे प्रान्तप्रचारक म्हणून नियुक्त झालेले होते, ते तर त्यावेळी आपला व्यवसायही करीत होते. पण असे म्हणतात की वर्षानुवर्षे एकही शनिवार-रविवार त्यांचा पुण्यातल्या घरी जात नसे. कुठे ना कुठे दर आठवड्याला ते प्रवासात संघकार्यासाठी असत! हा तिसरा प्रकार म्हणावयाचा – आणि आपापले

संसार सांभाळून अशा तऱ्हेने आपल्या जीवनात संघाच्या कामाला मुख्य स्थान देऊनच कष्ट करणाऱ्या हजारो कार्यकर्त्यांच्या परिश्रमावरच संघाचे काम जागोजागी उभे राहिले, वाढले, टिकून राहिले आहे.

अशी दुसऱ्या आणि तिसऱ्या प्रकारची माणसे टिपून त्यांच्या हाती तिथल्या कामाची धुरा सोपवायची, आणि विस्तारासाठी आणखी पुढे सरकायचे, या पद्धतीने पूर्णकालिक प्रचारक आज देशभर हिंडत आहेत. सरसंघचालकपदाची जबाबदारी घेतल्यावर श्री. बाळासाहेब देवरस म्हणाले होते की, 'कार्यकर्त्यांची देवदुर्लभ अशी फळी संघात निर्माण झाली आहे (केडर).' त्या फळीतले बहुसंख्य गृहस्थधर्म सांभाळून कार्य करणारे, काही निवृत्तीनंतरचे प्रचारक, आणि पूर्णकालिक जोमदार निश्चयी प्रचारकांची एक श्रेणी! अशा तीन फळ्यांच्या समन्वयाच्या आधाराने संघाची संघटना आज देशात दखलपात्र संस्कारित शक्ती म्हणून उभी ठाकली आहे.

**प्रचारक हे प्रशासक नव्हेत :**

संघप्रचारकांचे जे सारे वर्णन येथवर केले, त्यातून असा एक समज होण्याची शक्यता असते की सरकारी प्रशासनात इंग्रजांची 'आय. सी. एस्.' किंवा भारत सरकारने 'आय. ए. एस्' या नावाच्या ज्या श्रेणी तयार केल्या आणि त्यांच्याकरवी आपले केंद्रीकृत अधिकारवादी (ब्युरॉक्रेटिक) शासन चालविण्याची प्रथा ठेवली तसा हा प्रचारक वर्ग संघाने घडविला आहे की काय? संघाच्या कामात ब्युरॉक्रेसी अत्यंत कमी प्रमाणात आढळते असे मागे आपण पाहिलेच आहे. त्याचे कारण पुन्हा विचारात घेतले म्हणजे ब्युरॉक्रेसी आणि संघप्रचारक-पद्धती यातला फरक आपल्या लक्षात येईल. इंग्रजांना तर सरळसरळ परक्यांवर सक्तीने राज्य करायचे होते. आणि भारताने स्वातंत्र्य मिळाल्यावरही एकंदर राज्यपद्धती इंग्रजांच्या पायंड्यांप्रमाणे चालू ठेवलेली आहे हे खरे असले तरी भारतीय माणसे आय. ए. एस्. मधून आल्यावर थोडेसे तरी मातीशी नाते ठेवतात; पण सरकारी शासनात जो एक प्रकारचा अलिप्तपणा ठेवण्याची अपेक्षा अन् शिकवण अधिकारी-श्रेणीला असते. त्यापेक्षा अगदी वेगळ्या कौटुंबिक पद्धतीने संघाचे प्रचारक आपापल्या क्षेत्रात काम उभे करतात. शासनाचे यंत्र तयार असते आणि अधिकारी यंत्रतज्ज्ञ म्हणून त्यावर जाऊन बसतो. संघाच्या प्रचारकाला शून्यातून काम उभे करायचे असते, – आधीचे असेल तर त्याला योग्य दिशेने घेऊन जायचे

असते. जागोजागी स्थानीय माणसांना कामाची जबाबदारी पत्करण्याची सवय लावायची असते. अशा तऱ्हेने मुळातच विकेंद्रीकरणावर आधारलेले (लोकल इनीशिएटिव) संघाचे काम करणारे प्रचारक 'अधिकारवादी' बनण्याची शक्यताच कमी; कारण सारी भूमिकाच वेगळी असते. म्हणूनच आय. ए. एस्. अधिकाऱ्याप्रमाणे स्वतःला सर्वज्ञ समजणारे, किंवा आजकालच्या खाजगी कंपन्यातल्या कार्यपालकांप्रमाणे (एक्झिक्युटिव्हज्) स्वतःचा एक बळकट कब्जा (स्ट्राँग हॅण्ड) उत्पन्न करणारे, असे संघाचे प्रचारक आपल्याला आढळणार नाहीत. साहजिकच संघप्रचारकांची श्रेणी ही 'एखादी तरी ओवी अनुभवावी' या चालीचे आघाडीवरचे कार्यकर्तेच आहेत, ब्युरॉक्रेसीमधले आज्ञा सोडणारे प्रशासक नव्हेत, हेच त्यांच्या वागणुकीतून झळकते.

**आत्मपरीक्षण :**

संघाचे कामाचे शास्त्र अनुशासनाचे असले, आणि दोष शोधीत बसण्याच्या सवयीचे संघात कधीच कौतुक केले जात नसले, तरी स्वतःच अधिकाधिक निर्दोष बनण्याचा आपण होऊन प्रयत्न केला पाहिजे हीच संघातली शिकवण असते; आणि त्यामुळे संघाचा प्रचारक सदैव आत्मपरीक्षण करीत करीत पुढे जात असतो. आपल्या वागण्या-बोलण्याचा, व्यवहाराचा काय परिणाम होतो याकडे त्याचे सारखे लक्ष असते. कमी असेल ते कसे मिळवावे याची खटपट असते. व्यक्तिगत गुणसंवर्धनाकडे नेहमी ध्यान असते. शारीरिक, मानसिक, बौद्धिक अशा सगळ्या शक्तींनी तो संघाच्या कामासाठी जास्तीत जास्त सक्षम बनण्याचा प्रयत्न करीत असतो इतकेच नव्हे, तर हिंदू विचार आणि हिंदू व्यवहार यांचा अभ्यास करून ते आपल्या आचरणात आणण्याचादेखील तो जाणीवपूर्वक प्रयत्न करीत असतो. आणि हे सारे करूनदेखील, आपल्या क्षेत्रातले काम स्वतःभोवती केंद्रित न करता, तो ते संघविचाराच्या भोवतीच केंद्रित करीत असतो! भारतमाता, भगवा ध्वज, प्रार्थना, प्रतिज्ञा या मजबूत संस्कारांच्या आधारावर आणि स्थानीय 'पदकर्तव्ये' सांभाळणाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली, आपण गेलो तरी देखील तिथले काम चालू रहावे अशीच सगळी रचना कुशलतेने करीत असतो.

**केवळ आवश्यक म्हणून ! :**

हजार-बाराशे वर्षांच्या इतिहासात आपण आपले सामाजिक कर्तव्य विसरलो, त्याची पुन्हा आठवण देऊन योग्य वागणूक घडविण्याकरता संघाचे काम चालले आहे. त्यामुळे एरवी ज्यांनी आपापल्या कुटुंबाचे आणि संसारांचे समर्थपणे पालनपोषण करावे अशा तरुणांना-वृद्धांना-गृहस्थांना आज तिकडचे लक्ष काहीसे कमी करूनदेखील, या कामात स्वतःला झोकून द्यावे लागत आहे. परिस्थितीचे ते आव्हानच आहे, अन् म्हणून असाधारण काळात असाधारण वाट चोखाळावी लागते! संघाच्या सदुसष्ट वर्षांच्या वाटचालीत डॉक्टर हेडगेवारांच्यापासून आजच्या छोट्या वयाच्या पण उमेदीच्या प्रचारकापर्यंत प्रत्येकाने स्वतःच्या उदाहरणानेच ही गोष्ट दाखवून दिली आहे. 'हौतात्म्य हे व्यक्तीचे मोठेपण असेल, पण ती समाजाची कमजोरी असते' – असे श्रीगुरुजी सांगत असत. 'समाज म्हणून आज आपण असावे तसे नाही, म्हणूनच काही तरुणांना आपली आयुष्ये किंवा उमेदीची वर्षे संघटनेच्या कामासाठी समर्पण करावी लागताहेत ना? देशभरात प्रचंड संख्येने, कुटुंब सोडून असे झोकून देणारे तरुण आवश्यक असावेत, ही स्थिती मोठीशी चांगली नव्हे, हे लक्षात घेतले पाहिजे. गृहस्थी सांभाळणारे पण समाजाचे कर्तव्य पाळणारे असे लक्षावधि लोक ज्या समाजात असतात, त्या समाजासाठी थोड्या तरुणांना आपली जीवन-चाकोरी सोडून अशी उडी घ्यावी लागत नाही!'

अशी लक्षावधि नव्हे कोट्यवधि जबाबदार 'गृहस्थ'- माणसे उभी राहावीत, जागरूकतेने समाजाची शक्ति कायम ठेवण्याकरता कटिबद्ध व्हावीत हा संघाचा विशाल प्रयत्न आहे. अर्थात् ती स्थिती येईपर्यंत 'न्योछावर' (समर्पण) करणारे युवक आणि वृद्ध, संघाच्या संस्कारातून पुढे येत आहेत, येत राहतील आणि संघाचे लोकसंग्रहाचे आणि संस्कारांचे काम निरलसपणे करीत राहतील! अशा निर्धाराने उभे राहिलेले संघाचे प्रचारक, हे संघसंस्कारांचे एक प्रचंड बलस्थान आहे, आणि ते बळकट ठेवणे हे आपले सर्वांचे काम आहे! कितीतरी ज्येष्ठांनी आजन्म हे काम केले, आजही कितीतरीजण चाळीस पन्नास वर्षे सततपणे करीत आहेत; त्यांच्या श्रमाचे चीज नवनव्यांनी पुढे येऊन करायचे आहे!!

❑

# ७

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे काम म्हणजे अनेक पिढ्या सततपणे चालत असलेला एक मोठा सामाजिक प्रयोग आहे. प्रत्येक बाबतीत स्वतःचा फायदा किंवा कुठलीतरी सत्ता बळकाविण्याचा उद्देश पाहण्याच्या आजच्या दिवसात, हजारो माणसे संघासारख्या कामात काही घेण्यासाठी नव्हे, तर काही देण्यासाठी हिरीरीने सरसावतात हे सहज उलगडत नाही. असे होण्याचे रहस्य म्हणजे संघातले संस्कार, आणि त्या संस्कारांची इमारत संघनिर्मात्याने मोठ्या कुशल हातांनी उभी केली आहे. 'भारतमाता' आणि 'भगवा ध्वज' ही दोन अथांग श्रद्धेची स्थाने प्रत्येकाच्या हृदयात जागविली. नंतर हळूहळू 'प्रार्थना' आणि 'प्रतिज्ञा' या, ती जाग कायम ठेवून आत्मपरीक्षण करण्याची सवय लावणाऱ्या दोन प्रेरणा उत्पन्न केल्या. त्याचबरोबर स्वतःच्या वागणुकीने दोन पावले पुढे राहणाऱ्या कार्यकर्त्यांचे 'अनुशासन', आणि लहान मोठ्या प्रमाणात आपले कष्ट आणि वेळ देऊन संघाचे काम करणाऱ्या तीन प्रकारच्या 'प्रचारकांची' फळी उभी करणारी कार्यपद्धती, यांची काळजीपूर्वक मशागत करून संघ वाढवला.

पण केवळ चांगली तत्त्वे, काही विधी आणि कुणा कार्यकर्त्यांचा एका अनुशासनाने चालणारा गट, एवढ्याच गोष्टींच्या आधारावर सामान्य माणसाला जागे करण्याचे काम उभे राहू शकत नाही. एखादा पंथ त्यामुळे तयार होऊ शकतो, पण सामान्य माणूस त्याच्या फारसा जवळ येत नाही. संघाचा असा पंथ बनू नये असे डॉक्टर हेडगेवार नेहमी सांगत; म्हणून प्रत्येकाला करता येतील अशा आणखी काही गोष्टी संघाच्या कामात

सुरुवातीपासून रुजविल्या गेल्या, आणि त्या गोष्टींची शिकवण देणारे अन् व्यवहारात उतरविण्याचे वळण देणारे सातवे महत्त्वाचे बलस्थान उत्पन्न केले, ते म्हणजे **'संघशाखा'!**

'पाणी पिण्याचे भांडे चांगले घासून अगदी न वापरता जरी ठेवले तरी त्याच्यावर धूळ जमते, म्हणून ते स्वच्छ ठेवायचे असेल तर रोज घासावे लागते; तसेच माणसाच्या मनाचे आहे –' असे डॉक्टर समजावून सांगायचे आणि म्हणून त्यांचा आग्रह असायचा की रोज निदान एक तास तरी माणसाने संस्कारांना उजाळा मिळेल अशा वातावरणात काढला पाहिजे. संघशाखेचे तंत्र जगभरातल्या समाजशास्त्राच्या अभ्यासकांना शोधक ('रिसर्च') बुद्धीने अभ्यासण्याच्या योग्यतेचे झाले आहे. आपल्या देशातले समाजशास्त्री (आणि 'वादी') अजून संघाकडे कुठला तरी राजकीय उद्देश साधण्याकरताच उभा केलेला बुरखा समजून पाहतात आणि त्यामुळे सामाजिक जागृतीचा प्रयोग या दृष्टीने संघाच्या तंत्राचे महत्त्व त्यांच्या ध्यानात येत नसेल; पण परदेशी विचारवंत आणि राजकारणीदेखील भारतात चाललेल्या या विशाल प्रयोगाचे सखोल अध्ययन आणि मूल्यमापन कितीतरी वर्षे करीत आहेत. त्यांच्या प्रशस्तीपत्रांची संघाला अपेक्षा नाही, पण स्वार्थाने बरबटलेल्या आणि विलक्षण तणावांनी भरलेल्या रोजच्या धकाधकीत संघशाखेच्या तंत्रातून माणूस समर्पणाच्या भावनेने या कामात हातभार कसा लावतो, याची पाहणी आज जगभर चाललेली आहे, हे खरे आहे. म्हणून या तंत्रातल्या विशेष गोष्टी समजावून घेतल्या पाहिजेत.

**निरपेक्ष प्रेम :**

माणूस जगात एकटाच जन्माला येतो, पण एकटा जगू शकत नाही. काही ना काही कारणाने त्याचा इतर लोकांशी संबंध येतच असतो. स्वतःच्या काही गरजा भागवून त्याबदली इतरांच्या अपेक्षा पूर्ण करण्यात माणूस जन्मभरच गुंतलेला असतो. स्वतःची आणि आपल्यावर अवलंबून असणारांची उपजीविका नीट चालावी यासाठी इतर माणसांशी नाना प्रकारांनी त्याचे संबंध जोडले जात असताना, नोकरी, व्यापार, शेती, पैशाने पैसा कमावणे – कुठल्याही उद्योगात माणूस व्यग्र असला तरी, शेकडो लोकांशी त्याचा संबंध येतोच. आणि हा इतरांशी येणारा संबंध अगदी विरक्त संन्याशालादेखील पूर्णपणे सुटलेला नाही. गुहेत जाऊन

बसलेल्यालादेखील एक नव्हे दोन लंगोट्या तरी लागतात. आणि धुवून वाळत घातलेली लंगोटी उंदीर पळवतो म्हणून मांजर, मांजराला दूध हवे म्हणून गाय, गायीला चारा हवा म्हणून लहानसे शेत आणि शेतीवर काम करायला अन् गायीला सांभाळायला म्हणून पुनः बायकोला घेऊन येण्याची पाळी येते असे माणसाच्या संग्राहक वृत्तीचे मोठे गमतीदार वर्णन केले जाते. साहजिकच माणूस आपल्या स्वतःच्या गरजांकरता का होईना पण कळप करून राहणाराच प्राणी असतो असे शास्त्रज्ञ म्हणतात.

पण अशा बुद्धीने एकत्र येणाऱ्या माणसांचे कळप, आणि संघशाखेत एकत्र येणाऱ्या माणसांचा मेळावा, या दोहोंमध्ये एक अगदी मूलभूत फरक आहे. प्रेम-स्नेह-गोडबोलेपणा-सज्जनपणा कळपातील माणसेही एकमेकांसाठी पाळतात पण संघाच्या शाखेतले प्रेम-स्नेह-गोड शब्द-सज्जनपणा अशासारखे वागणे कुणाच्या वैयक्तिक गरजेसाठी नसते. संघाचे पूर्वी सरकार्यवाह असलेले श्री. भैयाजी दाणी विचारीत असत –' प्रेम करायला कमीत कमी कितीजणांची जरूर असते?' आम्ही एकमेकांकडे पाहून म्हटले की निदान दोन माणसे तर हवीतच. भैय्याजी हसून म्हणायचे – 'खरं म्हणजे एकच हवा, तो म्हणजे आपण स्वतः! आपण एकदा प्रेम-स्नेहाची वागणूक, स्वतःसाठी काहीही अपेक्षा न ठेवता करू लागलो की स्नेहाचे वातावरण तयार व्हायला सुरुवात होते –'. किती बारकाईचा विचार आहे हा! संघशाखेतले माणसांचे एकत्रीकरण या स्नेहाच्या आणि निरपेक्ष प्रेमाच्या धाग्याने बांधलेले असायला हवे, कारण त्यातूनच भक्कम अशी हृदयाची शक्ति उभी राहते. डॉक्टर हेडगेवार समर्थ रामदासांच्या एका ओळीत थोडा बदल करून म्हणत असत –

'शहाणे करून **धरावे** सकळ जन'! शहाणे म्हणजे जागृत करावे, आणि स्नेहाच्या सूत्राने सगळ्यांना धरून ठेवावे, हा संघशाखेचा मूलमंत्र आहे!!

केरळमधल्या एका प्रचारकाचा अनुभव तुम्हाला ठाऊक असेल. शाखेच्या बाजूने रोज आपल्या मित्रासह जाणारे एक कम्युनिस्ट कार्यकर्ते थट्टामस्करी करायचे, संघ चालवून काय होणार म्हणायचे. एक प्रकारचे विरोधी प्रेमच दोघांमधे उत्पन्न झाले होते. पुढे दोनचार दिवस मित्रांबरोबर ते स्वतः दिसले नाहीत म्हणून प्रचारकाने चौकशी केली, तेव्हा ते आजारी

असल्याचे कळले. हा त्यांना भेटायला गेला, तो कुठल्यातरी लागट तापामुळे अंगावर फोड आलेल्या स्थितीत एका अगदी बाहेरच्या झोपडीवजा खोलीत ते एकटे तळमळत पडलेले आणि घरच्याही माणसांना त्या रोगाचा संसर्ग लागेल या भीतीने तिथे जायला मनाई केलेली! प्रचारक सरळ त्या खोलीत गेला, त्यांची विचारपूस केली, पुढे आठ-दहा दिवस त्यांची प्रकृति सुधारेपर्यंत शुश्रूषा केली, स्वतःला तोच आजार होईल याचीही तमा न बाळगता त्याने केवळ निरपेक्ष स्नेहाने त्यांची सेवा केली. त्या गृहस्थांनी सद्‌गदित होऊन म्हटले की 'तुम्ही लोक इतके प्रेम कसे करता? माझ्या आजारात नेहमीच्या मित्रांनीच काय पण घरच्यांनीदेखील जी हिंमत केली नाही ती तुम्ही केलीत!'

या घटनेचा शेवट – 'आणि अशा तऱ्हेने ते गृहस्थ कम्युनिझम सोडून संघाला येऊन मिळाले –' असा होण्याचीदेखील काहीही आवश्यकता नाही!! असे डाव्या हाताचे उजव्या हातावर लगेच फळ मिळाले पाहिजे म्हणून का संघाचा माणूस लोकांवर प्रेम करतो? प्रत्येक कृतीचा तादृश परिणाम म्हणून लगेच असा फायदा पाहणेदेखील फार बटबटीतपणाचे असते, आणि त्याची गरजही नसते.

**मने जुळतात :**

१९५३ साली मी पुणे सोडले त्यावेळी नाना पालकर नगरप्रचारक होते. पुणे स्टेशनवर घरची माणसे, काही मित्रमंडळी निरोप द्यायला आली. गाडी सुटली – पुणे सुटले! थोड्याशा एकाकी मनाने मी डब्याच्या दारातच उभा होतो. तोवर गाडी शिवाजीनगर स्टेशनवर पोचली. गाडी थांबता थांबता मी पाहिले तर नाना प्रवेशद्वारातून लगबगीने येताना दिसले. जवळ आल्यावर म्हणाले, 'पुण्याच्याच स्टेशनवर येणार होतो, पण मला उशीर झाला, म्हटलं इथे तरी भेट होते की नाही! – पण सापडलास, फार बरं वाटलं –' आणि असे म्हणताना नानांनी मुद्दाम आणलेले एक गुलाबाचे फूल मला दिले आणि ते म्हणाले – 'मी तुला आणखी काय देऊ? ही आमची आठवण म्हणून घे, स्वतःला जप – अन् आम्हाला विसरू नकोस'! मित्रांनो, माझ्याकडून नानांना काय मिळवायचे होते? कुठला स्वार्थ होता त्यात? किती निरपेक्ष प्रेम त्यांनी मला दिले! मी ते फूल त्यानंतर जवळ जवळ सात वर्षे जपून ठेवले होते!

**बंधुतेचे बाळकडू :**

असा हा संघशाखेतला स्नेह, अपेक्षारहित, अत्यंत प्रांजळ, आशा असलीच तर एवढीच की हे स्नेहबंधन तुटू नये, घेतला वसा टाकू नये! याखेरीज कुणालाही आणखी काही नको असते. त्यामुळे संघशाखेशी सुरुवातीला कुठल्याही कारणाने संबंध आला, की माणूस त्या प्रेमानेच बांधला जातो, कारण संघाच्या संघटनेचा तो पहिला पाठ आहे. बंधुतेपासून सुरुवात होते, त्यामुळे समता, न्याय, स्वातंत्र्य या गोष्टींचा आपोआप उदय होतो. संघातली माणसे संघाच्या कामात परस्परांशी समतेने वागतात, अन्याय होऊ देत नाहीत, सर्वांचा विचार घेऊन चालतात – या साऱ्याचे मुख्य कारण म्हणजे संघातली बंधुतेची शिकवण. संघाच्या शाखा सुदृढ होतात त्या या पौष्टिक औषधामुळे. एकमेकांच्या घनिष्ठ स्नेहामुळे. माणूस अशा निरपेक्ष प्रेमाचा भुकेला असतो, आणि आज आपल्या देशात त्याचीच वाण आहे. संघशाखेने आपापल्या क्षेत्रातल्या लोकांना दोन्ही हातांनी जवळ करायला हवे, कुणालाच विरोधी न मानता आपल्या स्नेहाने आपलेसे करायला हवे हेच संघशाखेचे मौलिक काम असते.

चांगल्या संघशाखेची कसोटीची लक्षणे पूजनीय डॉक्टर नेहमी सांगायचे. एक तर आज आलेल्या स्वयंसेवकाला उद्या आपण होऊन यावेसे वाटेल असे संघशाखेतले वातावरण असायला हवे, आणि दुसरे म्हणजे अशा नियमितपणाने येणाराला आपल्या स्वतःमध्ये हळूहळू एक चांगला बदल होत चालला आहे असे जाणवले पाहिजे! किती सोप्या पण चपखल शब्दात लोकसंग्रह आणि संस्कार या दोन्ही पैलूंचे स्पष्ट दर्शन या सांगण्यातून होते. शाखांचे कार्यक्रम, गटपद्धति, लोकसंपर्क, व्यक्तिगत प्रगतीच्या योजना, कामाची जबाबदारी व्यवस्थितपणे पूर्ण करण्याची उभारी, या सगळ्या गोष्टींची कसोटी या दोन लक्षणांनी वारंवार लावून पाहिली पाहिजे. 'संघ हे एक विद्यापीठ आहे, विद्यापीठात स्नातक तयार होतील, व समाजात गेल्यानंतर त्या त्या संस्कारानुसार स्वाभाविक आचरण करतील –' अशा शब्दात 'सांस्कृतिक वार्तापत्र'चे संपादक श्री. वसंतराव गीत यांनी याचे वर्णन केले आहे. ही भूमिका नेहमी लक्षात घेऊन संघशाखेचे बलस्थान सर्वांनी नित्य बळकट केले पाहिजे.

**प्रयोगशाळा कोणती :**

एक गोष्ट येथे मनात येते की संघशाखा ही राष्ट्रीय संस्कारांची 'पाठशाळा' आहे असे म्हटले, तर या पाठशाळेला जोडून 'प्रयोगशाळा' हवी की नाही? शिक्षण घेत असतानाच प्रयोग करीत करीतच संघटनेचे शास्त्र शिकायला हवे की नको? कोणती आहे ती प्रयोगशाळा? माझ्या समजुतीप्रमाणे 'संघशाखेच्या आजूबाजूची लोकवस्ती' हीच संघविचारांचे प्रत्यक्ष उदाहरण घालून देण्याची प्रयोगशाळा आहे! 'वेगवेगळ्या वस्तीत संघाची शाखा सुरू केली जाते ती कशासाठी? शरीरातल्या अगदी टोकांच्या रक्तवाहिन्या याच शरीराच्या संवेदना-वाहिन्याही असतात – संघाची शाखा त्या वस्तीतल्या लोकांशी जर जागता संपर्क ठेवील, तर संघ आणि लोक यांच्यामधला तो महत्त्वाचा दुवा ठरेल. जे येतील त्यांचे तासभर काही ना काही कार्यक्रम करायचे एवढ्यापुरतेच संघाच्या शाखेचे अस्तित्व नाही. संघाचे म्हणणे लोकांपर्यंत पोचले पाहिजे. त्यातून राष्ट्रीयता व स्वयंसेवकत्वाचे संस्कार देता आले पाहिजेत. त्याचबरोबर लोकांनी आपण होऊन संघाला आधार समजून संघाजवळ आपले म्हणणे विश्वासाने सांगितले पाहिजे आणि ते संघात वरपर्यंत पोचले पाहिजे, हीही संघशाखेची तितकीच महत्त्वाची भूमिका आहे. खरे म्हणजे हे दोन्ही पैलू मिळूनच संघाच्या शाखेचे चित्र पूर्ण होते. अशा जिवंत नाडीसारख्या (Live wires) संघाच्या शाखा असल्या पाहिजेत -' (एकता.श्रावण, सन १९८२ : पृष्ठ २२) हा व्यापक विचार घेतला, म्हणजे संघात संस्कारांचे काम करता करताच त्या संस्कारांचे प्रत्यक्ष व्यवहारात प्रयोग आजूबाजूला लोकांमध्ये मिसळून केले पाहिजेत हा संघशाखेचा पैलू नजरेआड होणार नाही. संघशाखा ही त्या वस्तीसाठी एक सज्जन-शक्तीचे भक्कम केंद्र बनली पाहिजे, आणि स्वयंसेवकांच्या वागण्याने लोक अधिकाधिक संघाच्या जवळ आले पाहिजेत. त्यासाठी लोकांच्या जीवनाशी समरस होऊन संघाच्या विचाराचा स्फुल्लिंग त्यांच्यापर्यंत पोचवावा लागेल आणि संघाच्या संस्कारांचा प्रत्यक्ष अनुभव त्यांना द्यावा लागेल. संघशाखा ही समाजाशी संपर्क ठेवणारी संघाची आघाडीवरची चौकीच म्हणावयाची, याचे कधीही विस्मरण होऊन चालायचे नाही, कारण लोकसंग्रहाचा संस्कार, लोकांशी संबंध असल्याशिवाय कसा शिकता येईल?

**कार्यक्रमांचा आवाका :**

'संघ म्हणजे शाखा, आणि शाखा म्हणजे कार्यक्रम' हे श्री. बाबाराव भिडे यांनी केलेले वर्णन सरसंघचालकसुद्धा अनेकदा सांगतात, आणि या गोष्टीकडे फारच नेहमीची झाल्यामुळे आपले दुर्लक्ष तर होत नाही ना, 'अतिपरिचयात् अवज्ञा' अशी तर या तंत्राची स्थिती होत नाही ना, हे वारंवार तपासून पाहिले पाहिजे असे ते आग्रहाने सांगतात. संघशाखा म्हणजे काय, कार्यक्रम म्हणजे कोणते, याबद्दल नेहमी जिव्हाळ्याने विचार होत राहिला पाहिजे. 'संघ म्हणजे संघस्थान' असे बाबांनी म्हटले नाही —! रोज भेटण्याचे, काही नियमित कार्यक्रम करण्याचे स्थान म्हणून संघस्थान महत्त्वाचे आहेच, पण संघशाखा संघस्थानापुरतीच नसते, ती सपूर्ण वस्तीत (Hinterland) असते. साहजिकच कार्यक्रमांचा विचार करतानादेखील मधून मधून का होईना, साऱ्या वस्तीला त्यात समाविष्ट करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. मला आठवते, एका शाखेने सार्वजनिक सत्यनारायणाचा कार्यक्रम ठरवून त्यात श्री. बाळशास्त्री हरदासांचे रसाळ व्याख्यान ठेवले, आणि वस्तीतले किमान एक हजार बाल एकत्र करून सुमारे अडीच हजार घरी समक्ष जाऊन निमंत्रणे दिली. प्रत्येकाने हेच करायचे असे नाही, पण अशा कार्यक्रमातून सर्वसामान्य माणसांशी संघाचा संपर्क यावा आणि संघाचे विचार आणि काम त्यांच्यापर्यंत पोचावे यासाठी करण्याचे प्रयत्न संघशाखेनेच केले पाहिजेत.

अशा प्रकारच्या प्रयत्नांतून संघाच्या कार्यकर्त्यांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव येतो, संघसंस्कार बळकट होतात. संघस्थानावरच्या आणि बाहेरच्या अशा सगळ्या कार्यक्रमांतून संघाच्या शाखेचा प्रभाव लोकांमध्ये उत्पन्न होत जातो, आणि त्यातूनच कार्यकर्तेही शिकतात. असे हे एक दुसऱ्यावर अवलंबून असलेले संघशाखेचे पैलू ध्यानात घेऊन जी संघशाखा चालते ती संघसंस्कारांचे एक विलक्षण प्रभावी बलस्थान ठरते. तिचे कार्यकर्ते व स्वयंसेवक नुसते तत्त्व जाणणारे नसतात, प्रत्यक्ष कामात तावून सुलाखून निघालेले असतात. त्यामुळे त्यांच्या श्रद्धा, विश्वास आणि कामाची उमेद जास्त वाढलेली असते. कोणत्याही परिस्थितीसाठी ते तयार असतात, आणि सारी वस्ती त्यांच्या पाठीशी उभी असते. त्यांना स्वतःसाठी काही नको आहे, ते जे काही करीत आहेत ते एका उत्तुंग ध्येयासाठी करीत आहेत याची लोकांना खात्री असते, आणि म्हणून त्यांना लोकांचे सहकार्य असते.

या दृष्टीने संघाचे संस्कारकेंद्र म्हणून संघस्थानावरच्या कार्यक्रमांबद्दल देखील तपशीलवार विचार केला जातो. चाळीस वर्षांपूर्वी 'शालापत्रक' मासिकात एक व्यंगचित्र होते. एका माणसाचे डोके खूप मोठे आणि हातापायांच्या काड्या होत्या, त्याखाली लिहिले होते – 'बुद्धि अचाट पण शक्ति पुचाट!' दुसऱ्या माणसाचे शरीर भलेभक्कम अन् डोके बारीक : 'शक्ती अचाट पण बुद्धी पुचाट'! तिसरे चित्र प्रमाणबद्ध माणसाचे होते, अन् त्याला नाव दिले होते 'माणूस'!! स्वयंसेवकांचे कार्यक्रम योजताना असा समतोल सांभाळला जायला हवा. शरीर, मन आणि बुद्धी यांचे गुण वाढवून मोठ्या आत्मविश्वासाने संघाचा स्वयंसेवक धडाडीने लोकांमध्ये जाईल आणि संघाचा विचार पसरवील अशी त्याची तयारी साऱ्या कार्यक्रमांतून झाली पाहिजे, आणि त्यासाठी मोठ्या कुशलतेने त्याची सगळ्या बाजूंनी तयारी होईल अशा कार्यक्रमांची योजना केली पाहिजे, हीच अपेक्षा असते. म्हणून प्रत्येक कार्यक्रमातून 'संघ'-गुण उत्पन्न होतो की नाही, ही प्रभावी शाखेची कसोटी आहे.

**पर्याय नाही :**

कारण जे संघशाखेचे तंत्र डॉ. हेडगेवारांनी संघाच्या कामाला लावून दिले, ते इतके यशस्वी ठरले आहे, की त्याच्याऐवजी दुसरी कुठली झटपट युक्ती करून संघासारखे काम होणार नाही. संघशाखेला पर्याय नाही, आणि संघशाखेच्या या सगळ्या पैलूंचा विचार प्रत्येक कार्यकर्त्याला करायलाच हवा. संघाचे सारे संस्कार शाखेच्या मशागतीतून (नर्सरी) उत्पन्न झालेले आहेत, आणि तिची कार्यक्षमता लखलखीत घासून पुसून (वारंवार सर्विसिंग करून) टिकविण्यासाठी सर्वांनी हातभार लावला पाहिजे. संघसंस्कारांचे हे अत्यंत प्रभावी बलस्थान कार्यक्षम राहण्यासाठी प्रत्येकाने आपापल्या अनुभवाचे आणि कष्टाचे सहकार्य दिले पाहिजे.

❑

# ८

'भारतमाता' आणि 'भगवा ध्वज' यासारखी श्रद्धास्थाने, 'प्रार्थना' अन् 'प्रतिज्ञेसारखे' अंतर्मुख करणारे विधी, स्वतःच्या व्यवहारानेच यशस्वी करता येतील अशा 'अनुशासन' आणि 'त्रिविध-प्रचारक' या पद्धती, यांच्याबरोबरच आज देशभर पसरलेले रोज हजारो ठिकाणी चालणाऱ्या 'संघशाखांचे' जाळे आणि त्यातून निर्माण होत असलेले डोळस राष्ट्रभक्तीचे संस्कार, ही संघसंस्कारांची देखणी बलस्थाने आहेत. माणसाच्या मनाला मरगळ येऊ नये असे कुशलतेने सतत योजलेले कार्यक्रम, ही या सर्व बलस्थानांची ताकद टिकवणारी नाडी आहे. प्रत्येक कार्यक्रमाचा कोणता परिणाम मनावर घेऊन स्वयंसेवक किंवा नागरिक घरोघर परततात, यावर त्या कार्यक्रमाचे यश अवलंबून असते. मुळातच संघाचे काम हे समुदायाचे काम, आणि आज साधारणपणे माणसाला समुदायात एकत्र येऊन सामूहिकपणे काही निरोगी गोष्टी करण्याची उमेद तर कमी झाली आहे; अशा परिस्थितीत फार कौशल्याने नाना प्रकारचे कार्यक्रम सफल करीत करीत, त्यातून संघाचे संस्कार देणाऱ्या या सात बलस्थानांची ओळख स्वयंसेवकांना आणि वस्तीतल्या नागरिकांना करून दिली पाहिजे, आणि संघाच्या कामात अधिकाधिक आपलेपणाने वेळ आणि कष्ट देण्याची उभारी उत्पन्न केली पाहिजे. शाखाशाखांनी लोकसंग्रह आणि संस्कार या दोन्ही मोर्चांवर आपली निर्मिती कशी आहे, यावर सतत लक्ष ठेवले पाहिजे, विचार अन् योजना केली पाहिजे

कारण लोकसंग्रह करून, एकत्र येणारांना संस्कार देणे, तसेच

दिलेल्या संस्कारातून आणखी लोकसंग्रह करण्याची योग्यता उत्पन्न होणे, असे हे दुहेरी आणि एकमेकाला पूरक असे पैलू आहेत; आणि म्हणूनच **'लोकसंग्रह'** हेच संघसंस्कारांचे आठवे अत्यंत महत्त्वाचे बलस्थान आहे!

**लोकाश्रयच :**

जगाच्या इतिहासात कोणतेही मोठे कार्य लोकांच्या सहभागाखेरीज यशस्वी झाल्याचा दाखला नाही. 'नुसत्या भारतातल्याच नव्हे तर जगातल्या साऱ्या महापुरुषांनी आपल्या सर्व धडपडीचे मुख्य सूत्र ठेवले असेल, तर ते म्हणजे 'जागते रहो!' सामान्य माणसाला त्यांनी जागे केले, आणि म्हटले, ऊठ, जागा रहा, आणि मनातले साध्य होईपर्यंत थांबू नको-!' कलियुगात एकमात्र शक्ती म्हणजे 'संघशक्ती' असे म्हणतात, पण मला तर असे वाटते की चारही युगात संघटनेची शक्ती उत्पन्न करूनच विजय मिळविता आला. देवाने अवतार घेतला अन् चुटकीसरशी सगळी संकटे क्षणात संपवून टाकण्याची जादू केली असे कधीच घडले नाही. ज्यांना अवतार मानले जाते त्यांनी देखील 'आता मी आलो आहे, तू काही न करता स्वस्थ बैस - मी बघून घेतो -' असे कधी माणसाला म्हटले नाही. प्रत्येकाने सामान्य माणसाला जागे केले, कामाला प्रवृत्त केले आणि त्याच्यातून पहाडदेखील उलथून टाकण्याचे महत्कार्य घडवून आणले. तेव्हा लोकजागृती आणि लोकसंग्रह केल्याशिवाय कोणतेच काम उभे राहिले नाही, हा जगाच्या इतिहासाचा वज्रलेख आहे! पहिल्या लेखांकाच्या शीर्षकपंक्तीत प्रश्न टाकले होते – 'ना राजाश्रय, ना धनाश्रय. शून्यातून विश्व उभे करणाऱ्या डॉक्टर हेडगेवारांजवळ कोणती जादू होती? संघ एवढा मोठा कसा झाला?' संघाने राजाश्रयाच्या किंवा धनाश्रयाच्या पाठीमागे न लागता, लोकाश्रयाची कास धरली हे संघाचे वेगळेपणच त्याच्या आजच्या रूपाचे रहस्य आहे. ती जादू नव्हे, सतत कष्टाची परिणती आहे.

**हृदयाचा संवाद :**

कोणत्या कारणांनी लोक एखाद्या कामाला हातभार लावतात? सारे सिद्धांत समजावून घेऊन, चर्चा करून, साहित्य वाचून मनाचा अगदी निर्धार झाल्यावर एखाद्या कार्यामधे सामील झालेली माणसे थोडी असतात. अनेकदा अशा सगळ्या पूर्वतयारीनंतरदेखील माणूस प्रत्यक्ष काम करायला पुढे येतोच असेही नाही. हजारोंना विचारा, त्यांचा संघात प्रवेश इतरच एखाद्या अगदी

अनौपचारिक कारणाने झालेला असेल. अध्यात्माच्या वाटेवर बरीच पाउले चालून गेलेला कठोर तर्कवादी, सहसा कुणापुढे हार न जाणारा, मनस्वी स्वभावाचा श्रीगुरुजींसारखा पुरुष डॉक्टर हेडगेवारांच्या कोणत्या गुणामुळे प्रभावित झाला? १९३२-३३ च्या सुमारास काशीला असतानाच श्रीगुरुजींनी संघात लक्ष घालण्यास सुरुवात केली असली, तरी नागपूरला परतल्यावरदेखील त्यांचा रामकृष्ण आश्रमाकडेही खूप ओढा होता; आणि त्यातच ते १९३६ मध्ये विशेष कुणालाही – डॉक्टरांनाही न कळविता सारगाछीला निघून गेले होते. तेथून परतल्यानंतर मात्र ते डॉक्टरांच्या सहवासात अधिकाधिक रमू लागले. दुसऱ्याला जिंकण्याऐवजी त्याला 'आत्मसात' करण्याची डॉक्टरांची हळुवार पद्धत, त्यांचा अलौकिक स्नेह, संघाशी एकरूपता आणि हिंदूंच्या पुनर्जागरणाचा सतत ध्यास, यांचाच विलक्षण प्रभाव श्रीगुरुजींच्या मनावर पडला. त्यांच्याबद्दल श्रीगुरुजींनी सांगितले आहे – 'डॉक्टरजी स्वयं एक अत्युच्च आदर्श बन चुके थे! . . . उन मे माँ का वात्सल्य, पिता का उत्तरदायित्व तथा गुरु की शिक्षा का समन्वय था!' त्यांच्या या सर्वसंग्रही स्वभावामुळे श्रीगुरुजी आकर्षित झाले. सारे वाद तुटावेत असा तो हृदयाचा संवाद होता!

स्नेहाच्या धाग्याने, आणि स्वतःच्या उदाहरणानेच संघाचा कार्यकर्ता लोकांना जवळ करतो, या गोष्टीचा प्रभाव विजेसारखा असतो. मनापासूनचे अकृत्रिम प्रेम, कोणताही संकुचित स्वार्थ नसलेली गोड भाषा, जिव्हाळ्याचे वातावरण या गोष्टी संघात अनुभवाला येतात, म्हणून माणसे एकदा संघाजवळ आली म्हणजे टिकून राहतात. एखाद्या वस्तुविक्रेत्याचा कृत्रिमपणा संघाच्या कार्यकर्त्यात नसतो, म्हणूनच माणसे जवळ यायला बिचकत नाहीत. एका शहरातल्या संघकार्यालयाच्या इमारतीच्या उद्‌घाटनाच्या वेळी पूजनीय श्री. बाळासाहेब देवरसांनी सांगितले होते – 'इमारती, वाहने, टेलिफोन अशासारख्या गोष्टी अपरिहार्य म्हणून लागतात, पण संघाचे काम अशा गोष्टी आपल्याजवळ नव्हत्या तेव्हाही झाले अन् वाढले. त्याचे मुख्य कारण म्हणजे संघ घराघरात वाढला, सामान्य माणसाच्या मनात रुजला. आपसातल्या मैत्री आणि प्रेमाच्या जोरावर संघ वाढला. कार्यालयाची इमारत झाली म्हणून संघ घराघरातून निघून जर केवळ कार्यालयात येऊन बसला, तर तो 'संघ' राहणार नाही!' संघाच्या जवळ येण्याचे सर्वात मोठे आकर्षण हे प्रामाणिक स्नेहाचे बोलावणे आहे. मग बाकीचे संस्कार हळूहळू माणसाला

कार्यप्रवण करून टिकवितात हे वेगळे. पण ही स्नेहज्योत अखंड रहावी लागते. तिची जागा दुसऱ्या कुठल्याच प्रकाराने भरून काढता येत नाही. ती इतर सर्व आकर्षणांवर मात करते.

**प्रामाणिकपणा :**

अकृत्रिम आणि निरपेक्ष प्रेमाबरोबरच लोकांना जवळ करण्यासाठी दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे प्रामाणिक वागणूक. एक कार्यकर्ता ज्या नव्या क्षेत्रात काम करायला जाऊ लागला तेथील बहुसंख्य माणसांना आपण जवळचे वाटावे म्हणून तो आपले नाव बदलून राहू लागला. त्याने नावही त्या बहुसंख्य वर्गातले घेतले, जे अर्थातच त्याचे नाव नव्हते, असणेच शक्य नव्हते. ही गोष्ट जेव्हा श्रीगुरुजींना कळली तेव्हा त्यांनी मुद्दाम त्याला बोलावून घेतले अन् समजावून सांगितले –' हे बघ, आज तू त्या क्षेत्रातल्या खूप लोकांना जवळचे वाटणारे नाव-आडनाव घेऊन राहतोस आणि म्हणून तू त्यांना आपलासा वाटतोस असं तुझं म्हणणं आहे; पण उद्या ही लबाडी त्यांना कळली अन् तुझं खरं नाव त्यांना समजलं तर काय होईल? ते तुला तर वाळीत टाकतीलच, कदाचित मारहाणदेखील करतील, अन् संघाच्या कार्याचं किती नुकसान होईल याचा अंदाजही करता येणार नाही! तेव्हा असे मुखवटे घेऊन राहण्याचं कारण नाही. आता तू ते क्षेत्र सोडून दुसरीकडे कामाला जायचं, आणि जसा आहेस तसं लोकांसमोर उभं राहायचं! काम हळूहळू वाढलं तरी हरकत नाही, पण प्रतारणेवर उभं केलेलं काम प्रतारणा उघडकीला आली की समूळ नष्ट होईल इतकंच नव्हे तर नासून जाईल–!!'

**आपलेसे करावे :**

लोकसंग्रहाचे तिसरे महत्त्वाचे अंग असते - लोकांच्या सुखदुःखांशी समरस होणे. आपले स्वयंसेवक केवळ दैनंदिन शाखेचे कार्यक्रम करून स्वस्थ न बसता समाजातील इतर बांधवांपाशी जातात, त्यांच्या सुखदुःखात सहभागी होतात. स्वतःचे निष्कलंक चारित्र्य, सर्वस्पर्शी प्रेम आणि अनुशासित व निःस्वार्थ बुद्धीने केलेली सेवा यामुळे त्यांच्या अंतःकरणात विश्वास उत्पन्न करतात. स्वयंसेवकांच्या केवळ कुटुंबातले लहान मोठे स्त्रीपुरुषच नव्हेत, तर त्यांचे मित्र व त्यांच्याविषयी आपुलकी असणारेही सारेजण संघाच्या विचारांनी व भावनेने भारले जातात. 'शाखा ही जणू त्या

क्षेत्रात रहाणाऱ्या लोकांच्या सामूहिक प्रेमभावनेचे आणि इच्छाशक्तीचे प्रतीक बनते–' असे श्रीगुरुजींनी अत्यंत सुंदर शब्दात सांगितले आहे.

(विचारधन, पृष्ठ ३२४)

**प्रेमाचा प्रतिसाद :**

एकदा संघाच्या कामाबद्दल असा आपलेपणा वाटू लागला की लोक किती तऱ्हेने संघाच्या वाढीसाठी हातभार लावतात त्याला सीमा नाही! शाखा सुटल्यावर सगळ्या दमलेल्या लहानमोठ्या स्वयंसेवकांना चांगले पाणी प्यायला मिळावे म्हणून रोज सात आठ खेपा करून दोन रांजण भरून ठेवणारी संघस्थानाजवळच्या खोपटातली वृद्ध स्त्री, मुले पाणी प्यायली यातच धन्यता मानीत असे, हे तुम्ही आपल्या संघाचे शारीरिक प्रमुख श्री. सुरेशराव केतकरांकडून ऐकले असेल! रामाचा सेतू बांधायला सगळे नर-वानर कसे जुंपले याचे मोठे मनोहारी वर्णन रामायणात येते. वाळूत लोळून येऊन ते कण सेतूपाशी येऊन झटकणारी खार तर प्रसिद्धच आहे! तळजाईला पोचलेल्या दुप्पटीहून जास्त पोळ्या, एकात्मता यज्ञाच्या यात्रेला मिळालेली सगळीकडची मदत, शिक्षावर्गांना आणि शिबिरांना येणारे उत्स्फूर्त सहाय्य यांची तर आपल्याला माहिती आहेच. पण आणीबाणीच्या काळात बाहेर राहून विशाल भूमिगत काम करणारांना ज्यांनी हातोहात वीस महिने सांभाळले ते तर सारे समाजातले सामान्य नागरिक होते, त्यांची कुटुंबे, मुले, स्त्रिया साऱ्यांचे त्यात हातभार लागले होते. असाच अनुभव रामजन्मभूमी आंदोलनात संपूर्ण देशात प्रचंड प्रमाणात आला. अक्षरशः धोके पत्करून तन, मन, धन देऊन संघासारख्या कामाला लोक उचलून धरीत आले आहेत, आणि असा हा अद्वितीय लोकाश्रयच सगळ्या बऱ्यावाईट प्रसंगातून संघाच्या पाठीशी उभा राहिला आहे. संघाच्या कामातून हा जो प्रचंड लोकसंग्रह संघाच्या विचारांमुळे होत आला, तो पाहून जगाचे डोळे दिपून गेले!

**लोक उचंबळून येतात :**

आणि लोक जेव्हा एखाद्या कामाच्या पाठीशी दमदारपणे उभे राहतात ना, तेव्हा ते निडर होऊन अन्यायाच्या डोळ्याला डोळा भिडवतात! जराशा वेगळ्या संदर्भातले एक रोमहर्षक उदाहरण सांगण्यासारखे आहे. फितूर झालेल्या नरेंद्र गोस्वामीला क्रान्तिकारक कनाईलालने तुरुंगातच ठार मारले,

म्हणून कनाईलालला फाशी देण्यात आले. त्याच्या अग्निसंस्काराच्या वेळी एक लक्ष माणसे जमली होतीं, आणि त्यातला प्रत्येकजण मुक्तपणाने रडला! कनाईलालचे शरीर जेव्हा भस्म झाले, तेव्हा त्या राखेचे गंडे हजारोंनी आपल्या मुलांच्या गळ्यात अन् हातात बांधले!! प्रेमचंद या प्रसिद्ध हिंदी लेखकाची सत्याग्रह-आंदोलनावर 'जुलूस' नावाची दुसरी एक सुंदर कथा आहे. त्यात असा प्रसंग आहे – 'आठ दस सत्याग्रही जब चल पडे, तो लोग देखते खडे थे । मगर वे लोग, जो दस मिनट पहले तमाशा देख रहे थे, इधर-उधरसे दौड पडे । हजारों आदमियों का विराट दल (पुलिस के सामने) आगे चल पडा ।' सामूहिक मन हे असे जबरदस्त असते. भावना उचंबळून आल्या आणि एक वेग आला म्हणजे जनसागर रोंरावत, गर्जत उसळतो हे जगात अनेकदा घडले आहे.

संघाच्या लोकसंग्रहाची आणखी एक विशेष बाजू अशी की, केवळ प्रसंगविशेषाने नव्हे तर सततपणे आणि शांतपणे लोक गेल्या पाच पिढ्या संघाच्या कामाला आश्रय देत राहिले आहेत. हे सहजासहजी होण्यासारखे नाही - त्यामागे हजारो कार्यकर्त्यांचे निरंतर परिश्रम आहेत, जागता संपर्क आहे.

**सैल जीभ नसावी :**

अर्थात् लोक एवढे पाठबळ कशामुळे देतात हे जसे समजावून घेणे महत्त्वाचे, तसेच कोणकोणत्या कारणांनी जवळ आलेले लोक दूर जाऊ शकतात, याचाही अभ्यास कार्यकर्त्यांनी केला पाहिजे. त्यातून काय टाळले पाहिजे हे लक्षात येते. एखाद्या चांगल्या कामापासूनदेखील माणसे दूर होतात ती काही तात्त्विक मतभेद झाल्यामुळेच, असे नव्हे! भारतमाता, भगवा ध्वज, प्रार्थना, प्रतिज्ञा या सगळ्यांशी एकरूप असलेला माणूससुद्धा संघा-पासून वेगळा होताना दिसला, तर त्याचा विचार गंभीरपणाने व्हावा लागतो.

बऱ्याच वेळा माणसे आपल्या वागणुकीने तुटतात; तसे तर घडलेले नाही ना? हे तपासून पहावे लागते. कारण नवे लोक जवळ येणे जसे महत्त्वाचे, तसेच जवळ आलेले दूर जाऊ नयेत हेही तितकेच महत्त्वाचे! पूजनीय श्रीगुरुजींनी सांगितले, 'कार्याचा विस्तार होऊ लागला, कार्याची प्रतिष्ठा व प्रभाव वाढू लागला म्हणजे लोक स्वाभाविकपणेच कार्यकर्त्याची प्रशंसा करू लागतात. कार्यकर्त्यांच्या दृष्टीने हा मोठा धोक्याचा क्षण असतो. त्याच्या ठिकाणी एक प्रकारचा अहंकार निर्माण होऊ लागतो. त्याच्या त्या

अहंकाराचा दुर्गंध भोवतालच्या माणसांना जाणवू लागतो, आणि त्यामुळे ते त्याच्यापासून चार हात दूर राहू लागतात... आत्मविश्वासाच्या नावाखाली कार्यकर्त्याने अहंभावनेला बळी पडता कामा नये, त्याचप्रमाणे विनीत व नम्र होण्याच्या खटाटोपात त्याने आत्मविश्वासासही गमावता कामा नये.' (विचारधन : पृष्ठे ३६६, ३६८-६९) सद्गुणांचा अहंकारदेखील लोकांना बोचक होतो आणि लोकसंग्रहाला तडे पाडतो. म्हणून लोकसंग्रहाचे बलस्थान भक्कम ठेवण्यासाठी या नकारार्थी गोष्टींचीदेखील काळजी घ्यायला हवी. नाहीतर, आपल्या मनात तसे काही नसले तरीदेखील, आपली जीभ फटकारे मारून जाते, आणि जवळ आलेले संस्कारित लोकसुद्धा तुटतात!

**सहभागाची भावना खुरटू नये :**

लोक तुटण्याचे दुसरे कारण असते ते म्हणजे लोकांच्या स्वयंस्फूर्तीची खच्ची होणे! प्रत्येकाला कामात आपला सहभाग (involvement) वाटावा, हे लोकांना सांभाळून घेण्यासाठी जरूरीचे असते. प्रचलित संस्था-पद्धतीचे सभा-भाषणे, ठराव, निवडणुका-विश्वास-अविश्वास अशा प्रकारचे जरी संघाचे काम नसले, तरी संघाचे अनुशासन वरून लादलेले नसते हे नेहमी लक्षात राहिले पाहिजे. संघाचे पहिले प्रचारक श्री. रामभाऊ जामगडे यांनी डॉक्टरांची एक आठवण लिहिली आहे. डॉक्टर जेव्हा कुणाला भेटायला जात असत, वाटेत विचारत, 'राम, ज्याच्याकडे आपण चाललो आहोत, त्याच्याशी काय काय बोललं पाहिजे? 'मी संकोचाने म्हणे, 'मी तुमच्यापुढे केवळ बच्चा आहे, मला का विचारता?' तेव्हा डॉक्टर म्हणायचे, 'राम, कुणाच्याही बाबतीत कधी असे समजू नये की आपण त्याच्यापेक्षा सगळ्याच दृष्टीनी पुढे आहोत!! काही बाबतीत तो आपल्यापेक्षाही पुढे असू शकतो.' (राष्ट्रधर्म : एप्रिल ६९) इतक्या बारकाईने विचार करून, जवळ आलेली माणसे कामात टिकून राहावीत असा सतत प्रयत्न करणे हेही लोकसंग्रहाचेच आवश्यक दुसरे अंग आहे.

**बोलणे तैसे चालणे हवे :**

अहंकारी सैल जीभ, सहभागाची उणीव, त्याबरोबरच मिळालेली माणसे दुरावण्याची वेळ आणखी एका कारणाने येऊ शकते. बोलण्यातला आणि प्रत्यक्ष वागण्यातला फरक जितका जास्त, तितकी बघणाराची दृष्टि बदलत जाते. अविश्वास उत्पन्न व्हायला वेळ लागत नाही. आणि माणूस दूर

जातो. श्री गुरुजींनी सांगितले आहे – '–इंग्लिशमध्ये अशा अर्थाची एक म्हण आहे की कोणतीही महान् व्यक्ती तिच्या अगदी जवळच्या अनुयायांच्या दृष्टीने महान राहू शकत नाही! परंतु डॉक्टरांच्या बाबतीत मात्र परिस्थिती अगदी उलट होती. जो जो त्यांच्या अधिकाधिक निकट जावे, तो तो त्यांच्याविषयीचा आदर व प्रेम वाढत जाई..!' सांगतो एक, अन् स्वतः मात्र वागतो वेगळेच असे एकदा कुणाबद्दल लक्षात आले की लोक त्याच्यापासून दूर दूर होतात. सर्वांना आपलेपणाने समान वागविले पाहिजे असे कुणी म्हणेल पण स्वतःच जर भेदभाव करील, तर लोकांची निराशा होणारच. म्हणून या गोष्टीचीदेखील लोकसंग्रहाच्या विशाल कामात फार काळजी घतली पाहिजे. लोकसंग्रह आणि लोकाश्रय कशामुळे मिळतो, आणि तो टिकवून धरण्यासाठी काय करावे लागते - काय टाळावे लागते, याची स्पष्ट जाणीव मनाशी बाळगून संघासारख्या विशाल प्रयोगाचे काम करायला हवे, कारण संघाच्या श्रद्धा, विश्वास, कार्यपद्धती, कार्यकर्त्यांची फळी, संघाच्या भरभरून फुललेल्या शाखा या सातही बलस्थानांच्या मुळाशी **'सतत लोकसंग्रह'** हे आठवे भक्कम बलस्थान आहे!

**प्रेमाशी कसले भांडण? :**

येथे एका टीकेचा विशेष परामर्श घेतला पाहिजे. संघात लोकसंग्रहाचे प्रमुख साधन निरपेक्ष प्रेम असते असे सुरुवातीपासूनच रुजविले गेले, आणि त्यावर संघशाखेबद्दलच्या आणि याही लेखांकात मी विस्ताराने चर्चा केली आहे. 'संघातले दिवस आणि इतर लेख' या आपल्या एका फार मनोज्ञ पुस्तकात स. ह. देशपांडे यांनी १९७४ च्या मौज दिवाळी अंकात लिहिलेला 'संघातले दिवस' हा लेख समाविष्ट केला आहे. त्यात ते म्हणतात – 'माणसं जोडण्याचं साधन प्रेम आहे असं गृहीत धरलं म्हणजे बौद्धिक व्यवहारावर विश्वासच शिल्लक रहात नाही! ...विचाराच्या स्वतंत्रतेला प्रेम हा अडसर बनतो - - - प्रेमापोटीच संघात विचारशत्रुत्व निर्माण झालं - - बुद्धीची वाढ होऊ न देण्याचं तंत्र संघानं चालविलं - - - बौद्धिक आयुधं शमी वृक्षावर ठेवली, माणूस शीर्षहीनच करून टाकला!!' देशपांड्यांची दुसरी रुखरुख आहे की विचारशक्ति मलूल राहिली, घाण्याप्रमाणे फिरत राहिली. - - गुरुनिष्ठा, श्रद्धावाद, विचारशत्रुत्व, अडाणीपणावरची निष्ठा, व्यक्तिप्रामाण्य यामुळं सारं फोल वाटू लागलं (एका अन्य विचारवंताच्या संदर्भात हा उल्लेख आहे) - -'

आता एकदा या बावतीत मोकळेपणाने विचार व्हायलाच हवा, का लोकसंग्रहाचा आधार प्रेमाचा नव्हे, केवळ विचाराचा असला पाहिजे असे म्हटले, तर प्रत्यक्ष जगातला अनुभव काय आहे? संघसंस्कारांची सारी इमारत लोकसंग्रहाच्या मौलिक संस्काराच्या पायावर उभी असल्याने हा विचार नि:संकोचपणे केला पाहिजे. कारण वर दिलेली टीका सबंध घसंस्कारांच्या प्रक्रियेवरच आहे, आणि तिचा विचार सारासार बुद्धीने लाच पाहिजे. हिताचे असेल ते स्वीकारले पाहिंजे, विपरीत असेल ते डले पाहिजे.

**द्धिदारिद्र्य चालणार नाही :**

या संपूर्ण लेखमालेची उभारणी दोन ज्वलंत श्रद्धास्थाने, दोन विचार आणि निर्धार (Conviction) उत्पन्न करणारे विधि, समर्पणातून उभी राहिलेली त्रिविध-प्रचारक पद्धती, अनुभवाचा आणि प्रत्यक्ष उदाहरण घालून देणाराचा आदर करणारे अनुशासन या संस्कारांवर केली आहे. संघशाखा ही सर्वस्पर्शी तंत्र आहे. म्हणजे यात श्रद्धा आहे, बुद्धीला आवाहनही आहे, 'बोले तैसा चाले' आहे, वेळ आणि कष्ट कोणतीही मागणी न ठेवता अर्पण करणे आहे. रोज करण्याचे काम आहे. आणि सामान्य माणसाच्या चालीने चालत राहून जागृत लोकशक्ति उभी करणे आहे!! .

खरे पाहिले तर इतक्या सर्वंकष पैलूंच्या कार्यात बुद्धीला मलूल राहून चालणारच नाही. ज्याने या साऱ्या गोष्टींची जागा समजून घेतली नसेल, तो अशा कार्यात फार काळ टिकणारच नाही. संघाचा विचार बुद्धीला पटत नाही असे कुणीच म्हणत नाही, देशपांडेदेखील म्हणत नाहीत. डॉक्टर हेडगेवारांनी केलेले देशाच्या रोगाचे निदान अचूक होते, हे निर्विवादपणे सिद्ध झाले आहे. सगळा विचारसुद्धा चालकानेच करायचा, आणि इतरांनी 'त्याने विचार केलाच असेल' असे म्हणून गप्प बसायचे (!) असा अनुशासनाचा अर्थ जिथे लावला गेला असेल तिथे प्रतिभावंत व्यक्तिमत्व असलेली माणसे दुरावली असणे साहजिक आहे. पण ही विकृति संघात कधी योग्य मानली गेली नाही. स्वयंप्रेरणेने काम करणे हेच अपेक्षित आहे.

आपण आपल्या मनाने काही गोष्टी, काही कामे योजून करू असा आत्मविश्वास स्वयंसेवकात आणि कार्यकर्त्यात उत्पन्न व्हावा, प्रतिभा (initiative) वाढावी यासाठी नव्या नव्या योजना करणारे संघटकच संघात

यशस्वी ठरले. त्यांना सहकार्याची कधी उणीव पडली नाही. त्यांच्याबरोबर काम करणाऱ्यांना संघाच्या कामाची अपरिहार्यता पटली, निर्धार उत्पन्न झाला.

हजारो माणसे केवळ भावनेच्या आधारावर बौद्धिक दारिद्र्य पत्करून पिढ्यान्‌पिढ्या कार्य करीत राहिली असे समजणे वास्तविक मनुष्य-स्वभावाबद्दलचे अज्ञानच म्हणावे लागेल! असे घडत नाही. बुद्धीला भुरळ पाडून माणसाकडून काहीतरी मुलखावेगळे करून घेणारे असे संघाच्या संस्कारात काय आहे? बुवाबाजी, व्यक्तिप्रामाण्य या शब्दांनी संघाच्या व्यवहाराचे वर्णन करता येणार नाही, कारण संघात व्यक्तीचे महत्त्व असलेच तर ते त्याच्या अनुभवामुळे, त्याच्या पात्रतेमुळे आहे तेवढेच; त्याच्या पदाधिकारामुळे किंवा त्याच्याकडून काही स्वतःसाठी मिळविता येणार आहे म्हणून नाही! ही निष्ठा अडाणीपणावरची नव्हे, 'ये हृदयींचे ते हृदयी घातले -' अशी ज्यांची कार्यक्षमता आहे त्यांच्या त्या कौशल्यावरची निष्ठा आहे. कुणी कुणाला अडाणी म्हणायचे? सहीदेखील करता येत नसलेले पण शेकडो स्वयंसेवकांना संघविचाराची एकनिष्ठा समजावणारे हिंदू तरुण मंडळाचे पूरणसिंह पैलवान अडाणी? नाना ढोबळ्यांचे 'समाजतळातले मोती' अडाणी? अनुभवशून्य पढतपंडितांना तुकारामाने विनंती केली आहे - 'अहो पंडितजन । तुका टाकावा थुंकोन ।।' - विद्वानांनो, मला तुमच्यापासून दूरच ठेवा!!' - ही विद्वत्तेची हेटाळणी नव्हे, पण अनुभवाशिवाय परिपूर्णता नाही, हा रोकडा व्यवहार इथे सांगितला आहे. नुसते पांडित्य लोकसंग्रहाला उपयोगाचे नाही.

संघात बुद्धीची गळचेपी नाही, पण अतिवादामुळे अकर्मण्यता येऊ नये हा मात्र आग्रह आहे! 'उठा, आणि कर्ते व्हा' (Be up and doing) ही प्रेरणा आहे. डॉक्टरांच्या बैठकीत ही साधकबाधक चर्चा होत असे, श्रीगुरुजींशीही तपशीलाने विचारविमर्श होई. श्री. बाळासाहेब देवरसांच्या प्रश्नोत्तराच्या बैठकी फार उपयुक्त ठरल्या आहेत. अन्य कार्यकर्तेही 'विचार करून पहा -' याच अपीलावर संस्कार करण्याचा प्रयत्न करतात. सर्वसाधारणपणे असाच अनुभव माझ्या नकळत्या आणि कळत्या शिशुपणापासूनच्या संघजीवनात मला आला. कामाच्या व्यवस्थेसाठी काही निर्णय घ्यावे लागतात, त्यात सगळ्यांचे सगळेच म्हणणे समाविष्ट होणे शक्य नसते, हा व्यवहार आहे; पण एखाद्याने आपण बुद्धनिष्ठ आहोत

म्हणून, आपल्या म्हणण्याप्रमाणे जेथे होत नसेल तेथे लगेच बिनडोकपणाचा ('शीर्षहीन'ता) आरोप करणे, न्यायाचे नाही.

**प्रेमाची आडकाठी? छे छे :**

सगळ्या गोंधळात टाकणारा कठोर घाव (unkindest cut) म्हणजे 'विचारांच्या स्वतंत्रतेला प्रेम हा अडसर बनतो -' हा आहे! विचारस्वातंत्र्यामुळे जेव्हा कधी कधी टोकाच्या भूमिका घेतल्या जातात अन् जो कटुपणा येतो तो उलट प्रेमाच्या वातावरणात निवळतो! नाही तर समन्वयाला दुसरे काही कारणच उरणार नाही! निरपेक्ष प्रेमाची ताकद केवळ बुद्धिनिष्ठेने जोखता येत नसते.

संघातले अनुशासन भाबड्या प्रेमाच्या आधारावर नव्हे, रोकड्या अनुभूतीवर आधारलेले आहे. लोकसंग्रहाचा आधार जर 'स्नेहसूत्र' हा मानला असेल, तर त्यात वावगे ते काय? माणसाला चार निरपेक्ष प्रेमाच्या शब्दांनी जे सुख होते त्याची किंमत आपण त्याला तर्कापोटी देऊ शकणार नाही. एक स्विच दाबला की शंभर दिवे एकदम पेटतात तसे संघाचे संस्कार नाहीत; एक एक पणती लावीत आसमंत उजळून टाकावे तसे ते वर्षानुवर्षाचे काम आहे. प्रत्येक पणती स्वतंत्रपणे जळते, पण सगळ्या मिळून अंधःकार चिरून टाकतात, तसे ते आहे! तेल सगळ्या पणत्यात एकच असते, तसेच स्नेहबंधन संघाच्या लक्षावधी स्वयंसेवकांमध्ये आणि त्यांच्याकरवी सामान्य माणसांपर्यंत पोचविण्यासाठी, संघ-संस्कारांची बांधणी आहे आणि त्यासाठी प्रेमावर आधारलेला सतत वाढणारा लोकसंग्रहाचा संस्कार हे प्रचंड बलस्थान आहे. बुद्धी खुरटून जावी असे तुम्हाला सांगितले कुणी? पुणे महानगराचे पूर्वीचे संघचालक श्री. विनायकराव आपटे तळमळीने सांगायचे - 'संघाच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर प्रत्येकाने विचार करायला हवा, आपले म्हणणे मांडायला हवे!' फक्त संघाला तत्त्वबोध आणि कर्मबोध करणारा वाद हवा, नुसता वादंग नको!!

❑

# ९

जन्माला येतात तेव्हा सारेच लहान असतात. जे कोणी काही विशेष करून दाखवितात ते मोठे समजले जातात. असे काही कर्तृत्व हातून व्हावे यासाठी तयारी मात्र लहानपणापासून करावी लागते. आपण जे काम हाती घेतले आहे ते जागृतीचे, निःस्वार्थपणाचे, कष्टाचे आणि ध्येयनिष्ठेचे बाळकडू घेतलेले तरुणच पार पाडू शकतील याची स्पष्ट जाणीव डॉक्टर हेडगेवारांना होती. आणि असे संस्कार लहान वयातच करता येतात हे त्यांनी ओळखले होते. म्हणून संघस्थापनेच्या वेळी ते स्वतः पस्तीस वर्षांचे होते, तरी त्यांनी दहा-पंधरा वर्षांची लहान मुले बरोबर घेऊन संघाचे काम सुरू केलें! संघाचे आजचे सरसंघचालक त्या पहिल्या बाल-स्वयंसेवकांपैकी आहेत, आणि तेव्हापासून आजतागायत संघाचा **बालविभाग** हे फार महत्त्वाचे बलस्थान संघसंस्कारांच्या जडणघडणीत आहे..

**खेळाची मैदाने :**

जबरदस्त महत्त्वाकांक्षी शक्तीने जगावर साम्राज्य करायला निघालेल्या नेपोलियनच्या आरमाराशी वॉटर्लूच्या लढाईत घनघोर युद्ध झाले, आणि त्यात इंग्रजांचा विजय झाला. त्या यशाबद्दल सांगताना असे म्हटले जाते की, 'वॉटर्लूची लढाई जिंकली आम्ही वास्तविक ईटन आणि हॅरोच्या खेळांच्या मैदानांवर'! ईटन आणि हॅरो येथील विद्यालयांतल्या मुलांना खेळांच्या मैदानावर जे शारीरिक आणि मानसिक शिक्षण-वळण दिले गेले त्यातून आपल्या देशासाठी सर्वस्व पणाला लावून उठण्याची ऊर्मी उत्पन्न

झाली, आणि असे हे वालक जेव्हा युवक वनून आमच्या सैन्यात आले तेव्हा ते नेपोलियनच्या पाशवी आक्रमणाला यशस्वीपणे तोंड देऊ शकले, इतका मोठा अर्थ याच्या पाठीमागे आहे. ती माणसे पोटार्थी नव्हती. त्यांच्यामध्ये देशाच्या गौरवाचा, अस्मितेचा एक स्फुल्लिंग होता. म्हणूनच त्यांना जबरदस्त शत्रूविरुद्धदेखील विजय मिळविता आला.

**प्रत्येक बाबतीत पशू श्रेष्ठ? :**

परमेश्वराने निर्माण केलेल्या सर्व गोष्टींत 'माणूस' ही सर्वश्रेष्ठ निर्मिती आहे (The best Creation of God!), अशी मनुष्य आपली तारीफ करतो. संशोधकांनीदेखील हा सिद्धांत मांडला आहे. काय 'बेस्ट' आहे माणसात? वास्तविक पाहता प्रत्येक चांगल्या किंवा वाईट गुणाबद्दल वोलायचे, तर उदाहरण दिले जाते ते कुठल्यातरी पशू-पक्ष्यांचे. डोळे सुंदर हरणाचे, पाय सुंदर घोड्याचे, ताकद खरी हत्तीची, डौलदारपणा हंसाचा, बांधेसूदपणा सिंहाचा. पराक्रमी माणसाला उपमा देतात ती 'नरपुंगव' म्हणून बैलाची! अहो, लुच्च्या मनुष्याचे वर्णनही 'कोल्ह्यासारखा लुच्चा' असे करतात. कोल्हा माणसासारखा लुच्चा असे म्हणत नाहीत. सुडबुद्धी सर्पाची, खुनशीपणा वाघाचा, धडाडी चित्त्याची, चिवटपणादेखील घोरपडीचा! माणसाची उपमा देऊन कुठल्या सद्‌गुणाचे किंवा दुर्गुणाचेदेखील वर्णन केले जात नाही. सगळ्या वावतीत श्रेष्ठत्व कुणा पशूचे किंवा जनावराचे!! मग माणूस कसा काय सर्वश्रेष्ठ? शिवाय परमेश्वराने प्राण्याला एक विशेष गोष्ट दिली आहे ती म्हणजे प्राण्याचे पिल्लू जन्माला येताक्षणीच चार पायांवर उभे राहते, नाचू बागडू लागते, थोड्याच दिवसात सुटवंग होते. पण माणसाच्या पिल्लाची मात्र अठरा-वीस वर्षे सगळ्या प्रकारची काळजी घ्यावी लागते! ते कितीतरी काळ आपल्या आई-वडिलांवर अवलंबून असते, म्हणजे याही बाबतीत माणूस सर्वश्रेष्ठतेची शेखी मिरवू शकत नाही.

**माणसाचे पिल्लू :**

पण परमेश्वर मोठा न्यायी आहे. त्याने पशूला स्वावलंबन दिले, ते माणसाला दिलेले नाही. पण माणसालाही एक गोष्ट अशी दिली आहे की जी पशू-पक्ष्यांजवळ नाही! बरे-वाईट, योग्य अयोग्य समजण्याची आणि आपले आपण निर्णय घेण्याची, विचार करण्याची बुद्धी फक्त माणसाजवळच तीव्रतेने असते, ती पशूंना नाही! अंधारातून जाताना माणूस कुठे

ठेचकाळला, तर पुन्हा तेथून जाताना तो सांभाळून जातो, प्राणी अशा ठिकाणाहून जाताना पुन्हा ठेचकाळतो! 'निश्चयात्मिका बुद्धी' असे ज्याला ज्ञानेश्वरांनी म्हटले आहे, ती विवेकाची शक्ती, हीच माणसाची सर्वश्रेष्ठ गोष्ट! त्यामुळेच माणूस, बाकीच्या बाबतीत इतर प्राण्यांपेक्षा कमज़ोर असला तरी देखील, परमेश्वराची सर्वोत्कृष्ट निर्मिती ठरतो-! आणि म्हणूनच जर माणसाने काही महत्कार्य करावे असे वाटत असेल तर त्याची ही बुद्धी सतेज करायची, सांभाळण्याच्या अठरावीस वर्षातच तिला कर्तवगारीचे वळण द्यायचे, शरीराने आणि मनाने त्याला बळकट करायचे हे काम त्याच्या लहानपणापासूनच करायला हवे. ही नेमकी गोष्ट लक्षात घेऊन संघात बाल सवयंसेवकांच्या कामाकडे जागोजागी विशेष लक्ष पुरविले जाते, आणि तसे ते मोठ्याच काळजीपूर्वक पुरवायलाही हवे.

**कार्यावरचा विश्वास :**

कोणतीही बरीवाईट गोष्ट उचलून घेण्याची लहान वयाच्या मुलांची शक्ती विलक्षण असते. कोरे करकरीत इंजिन कारखान्यातून बाहेर पडताना त्याची कार्यक्षमता अत्युत्तम असते ना, तसे बालांचे मन देखील अतिशय त्वरेने एखाद्या गोष्टीची छाप स्वीकारून घेते. संघाच्या संस्कारांची जी बलस्थाने आपण या लेखमालेत विचारात घेत आहोत, त्याचा प्रभाव बालवयात फारच उत्कटपणाने होतो आणि आयुष्यभर टिकून राहतो असा संघाचा अनुभव आहे. संघाचे संस्कार खरोखरच चांगले आहेत, जरुरीचे आहेत, मोलाचे आहेत अशी आपली खात्री पटली आहे ना? मग ते लहानपणापासूनच मनावर बिंबले पाहिजेत, आणि त्यासाठी संघात बालविभागाचे काम विशेष लक्ष देऊन केले पाहिजे, या म्हणण्यात वावगे काहीच नाही.

कधीकधी असा एक गैरसमज पसरविला जातो की संघात लहान लहान मुले घेऊन त्यांना अपरिपक्व अवस्थेत निराळेच वळण लावण्याचा प्रयत्न होतो. पण या प्रचाराने बावरून जाण्यासारखे काहीच नाही. संघाचा विचार, संघाचा संस्कार, स्वतःच्या प्रगतीबरोबरच आणखीही काही कर्तव्य माणसाला केले पाहिजे याची जाणीव मनात ठेवून या देशाच्या वैभवासाठी कष्ट करणारांची संघटना उभी करायची असेल, तर त्यासाठी संस्कारांना योग्य असे उत्तम बालवय वाया घालवून चालायचे नाही. म्हणून

बालविभागात काम करणाराला सर्वप्रथम या गोष्टीचा आत्मविश्वास असला पाहिजे की जे काम मी करीत आहे ते योग्य आहे, आवश्यक आहे, महत्त्वाचे आहे!! या बाबतीत जरासा देखील संशय मनात असता कामा नये. कारण हे पिढ्यापिढ्यांचे काम असेच वाढत आले, आणि असेच उभे राहू शकेल. बालविभागाचे काम करणाराला ही खात्री असली पाहिजे की मी जे काम करीत आहे ते महत्त्वाचे आहे, संघाच्या पायाभरणीचे आहे, आणि त्याचे एक नाजूक शास्त्र आहे.

**उत्तम शिक्षक, बालांसाठी :**

या विश्वासाने काम करणाराला याचे तंत्र आणि शास्त्रदेखील समजावून घ्यावे लागते. विचारपूर्वक योजना करून काळजीने करण्याचे हे काम आहे. ज्याला दुसरे काही करता येण्यासारखे नाही त्याला बालांचे काम सोपविणे, हा अविचार ठरेल. बालांचे काम करणारे कार्यकर्ते समजूतदार, शारीरिक आणि बौद्धिक तयारीचे, बालांनी अनुसरण करावे असे, आणि तसेच मने ओळखणारे असले पाहिजेत हा संघात पूर्वीपासूनच दंडक आहे. शिक्षणक्षेत्रातले एक उदाहरण या ठिकाणी आठवते. नूतन मराठी विद्यालयाची पुणे शहरात अनेक वर्षे ख्याती आहे. त्या शाळेत पूर्वी श्री. गोंधळेकर आणि श्री. लिमये हे दोन निष्णात शिक्षक पहिल्या तीन वर्गांना नेमलेले असत. आणि शाळेत पहिलीत प्रवेश घेतलेल्या निवडक मुलांच्या दोन तुकड्या ते तिसरी उत्तीर्ण होईपर्यंत बरोबर घेऊन जात असत. तीनही वर्गांच्या अ आणि ब या तुकड्यांचे वर्गशिक्षक नेहमी हेच दोघेजण असायचे. यामागे एक मोठी विचारपूर्वक केलेली योजना असायची. बालवयात कसे वळण लावायला हवे, या बाबतीत निष्णात असलेलेच शिक्षक मिळाले पाहिजेत; कारण तीच वर्षे महत्त्वाची असतात, अशी प्रिं. नारळकरांची भूमिका होती. संघाच्या बालविभागासाठी शिक्षक निवडताना हाच विचार केला जातो, आणि सर्व बाजूंनी स्वतःची चांगली प्रगती केलेली आणि संघसंस्कारांची सगळी बलस्थाने ओळखणारी माणसेच या कामासाठी राखून ठेवली जातात.

**शिक्षकाची स्वतःची तयारी :**

संघाच्या बालशिक्षकाची स्वतःची सर्व बाजूनी चांगली प्रगती, आणि कामातला निष्णातपणा कसा असतो, कसा असायला हवा, यावर या

बलस्थानाचे सारे बळ अवलंबून आहे. या बाबतीत खूप सांगता येण्यासारखे आहे. पण त्यातल्या तीन महत्त्वाच्या गोष्टी आहेत.

पहिली म्हणजे शिक्षकाला दोन पावले पुढे राहता यायला हवे. शारीरिक, मानसिक, बौद्धिक अशा सगळ्या दृष्टींनी शिक्षक आपल्यापुढे आहे याची जाणीव बालकांना होत राहिली पाहिजे. बालवय हे विभूतीपूजेचे मोठे वेडे असते. संघात तशी पूजा वाढवावयाची नाही, पण समोरचा माणूस काहीतरी जास्त योग्यता मिळविलेला आहे असे दिसल्याखेरीज मुले त्याच्याजवळ येत नाहीत. मोठ्या माणसांसारखे मुलांना त्याच्याजवळ काही मागायचे नसते (No axe to grind), पण त्याच्या व्यक्तिमत्त्वाकडे मात्र मुले स्वाभाविकपणे आकर्षित होतात. आपले असे व्यक्तिमत्त्व असावे याची काळजी शिक्षकाने घेतली पाहिजे.

दुसरी गोष्ट म्हणजे आपल्या आकर्षक व्यक्तिमत्त्वाच्या भोवती गोळा होणारी ही मुले केवळ आपल्याभोवतीच घोटाळत न राहता, हळुवारपणे आपल्याऐवजी संघाची बलस्थाने हे आपण त्यांच्या आकर्षणाचे केंद्र बनवितो की नाही, याचे भान नेहमी शिक्षकाने ठेवले पाहिजे. हे काम सोपे नाही, झटपट होणारेही नाही, पण आवश्यक आहे. तसे झाले नाही तर एकंदर कार्याचेच मोठे नुकसान होते. डॉ. हेडगेवारांच्या लोकोत्तर व्यक्तिमत्त्वाने आकर्षित झालेले बाल आणि तरुण संघात आले, पण डॉक्टरांनी त्यांच्या निष्ठा संघविचाराशी जोडल्या, स्वतःभोवतीच केंद्रित केल्या नाहीत; आणि म्हणूनच संघ व्यक्तिनिरपेक्ष रीतीने वाढला. डॉक्टरांच्याच एका मित्राने संघस्थापनेनंतर काही वर्षांनी रामसेना नावाची एक संस्था सामाजिक कार्यासाठी उभी केली होती, पण ती त्या गृहस्थांच्या पाठीमागे चालू राहू शकली नाही, असे उदाहरण आहे. संघातल्या बालशिक्षकाला नेहमी सावध राहिले पाहिजे की केवळ आपल्याभोवतीच तर सारे गुंतून राहत नाही ना? हळू हळू संघविचाराभोवती साऱ्यांना जाणिवेने उभे करण्याकडे आपले दुर्लक्ष होत नाही ना?

तिसरी अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे शिक्षकाची स्वयंसेवकांशी वागणूक अतिशय प्रामाणिकपणाची असायला हवी. लहान मुले देखील प्रतारणा चटकन ओळखतात, दुटप्पीपणा आणि भेदभाव त्यांनाही खोलवर

दुखावून जातो. संघातल्या बालशिक्षकांनी आजवर या तीन गोष्टींची नेहमीच काळजी घेतली आहे, आणि म्हणूनच संघाच्या बालविभागाचे काम अत्यंत सुदृढ अशा पायावर उभे राहिले आहे.

**निर्मितीचा उद्देश :**

एकेका कालखंडात संघाच्या संस्कारांतून कशा प्रकारचा स्वयंसेवक तयार व्हावा याबद्दलच्या, एकेक वेगवेगळ्या कल्पना संघाच्या कार्यकर्त्यांनी गेल्या पन्नाससाठ वर्षांच्या इतिहासात राबविलेल्या दिसतात. स्वातंत्र्यापूर्वीच्या कालखंडात, स्वातंत्र्याच्या प्रयत्नासाठी कणखर, बलदंड, निर्भय, तीव्र भावनांचे कल्लोळ मनात वागवीत असलेले बेडर, आणि तरीही योजनाबद्ध रीतीने संघाचे काम वाढविण्याची सतत धडपड करीत असलेले स्वयंसेवक निर्माण व्हावेत, ही कल्पना होती आणि त्याप्रमाणे त्या काळात लहानपणापासूनच सारे प्रयत्न, सगळे कार्यक्रम, या गुणांना पोषक असे योजले जात असत. रात्री बेरात्री डोंगरकपारीतून भटकायचे, रात्रीच्या वेळी पोहायला जायचे, हजार हजार जोर मारायचे, मैलचे मैल दौड करायची अशा प्रकारच्या कार्यक्रमात बाल-तरुण सारे रंगून जात असत.

पुढे स्वातंत्र्याबरोबरच घडलेल्या दुर्दैवी घटना आणि बदललेली परिस्थिती पाहून संघाचे काम वेगाने वाढविणे हाच एक ध्यास सर्वांना लागला आणि त्यासाठी विस्तारक, प्रचारक म्हणून काही काळ बाहेर पडण्याची अहमहमिका सुरू झाली. त्या दृष्टीने सारे प्रयत्न सुरू झाले. १९४८ च्या बंदीनंतरच्या काळात काम अधिक गुंतागुंतीचे झाले आणि त्या दृष्टीने काम टिकवून धरणारे निष्ठावंत कार्यकर्ते निर्माण व्हावेत असा प्रयत्न जास्त प्रमाणात होत राहिला. अशा तऱ्हेने वेगवगेळ्या परिस्थितीत मनुष्यनिर्मितीच्या कामाचा प्रकाशझोत त्या त्या वेळच्या आवश्यकता लक्षात घेऊन वळत राहिला, आणि हे स्वाभाविकच होते.

आजची परिस्थिती, पुढच्या पन्नास वर्षातल्या अपेक्षा, येणाऱ्या वातावरणाची चाहूल या सगळ्या गोष्टी लक्षात घेऊन आज कशा तऱ्हेचे स्वयंसेवक निर्माण झाले पाहिजेत याचे स्पष्ट स्वरूप बालविभागाच्या कार्यकर्त्यांच्या डोळ्यासमोर असले, तरच योग्य ते प्रयत्न होतील आणि त्यातून होणाऱ्या निर्मितीतून, येणाऱ्या काळावर मात करण्याची ताकद उभी

राहील. हा दूरवरचा विचार संघात पूर्वीही होत राहिला, आणि आजही झाला पाहिजे, म्हणून हा मुद्दा जरा विस्ताराने, पण संकेताने मांडला आहे.

उद्देश स्पष्ट असला म्हणजे पावलेही त्या दिशेने बरोबर पडतात. माझ्या कल्पनेप्रमाणे आज संघसंस्कारातून निर्माण होणारी माणसे **'देशाच्या स्थितीचा चारी बाजूंनी विचार करणारी, आपल्याआपण डोळसपणे बघणारी, हजारो लोकांना बरोबर घेऊन त्यांची दुःखे आपली समजून त्यांना त्यातूनही देशहिताच्या कामाला लावू शकणारी, निराश झालेल्या सामान्य माणसाला धीर देऊ शकणारी'** अशी असायला हवीत. आणि त्याची तयारी बालविभागातूनच सुरू व्हायला हवी. कारण आजचे बाल स्वयंसेवकच येत्या कठीण काळातले चिवट कार्यकर्ते व्हायचे आहेत.

**स्वतंत्र व्यवस्था हवी :**

अशी तयारी बालवयापासूनच करून घ्यायची म्हणजे यापूर्वीचे काही अनुभव लक्षात घेतले पाहिजेत. बालांचे कार्यक्रम संघात नेहमीच खेळ, गाणी, गोष्टी या त्रिसूत्रीवर आधारलेले असतात. या तीनही गोष्टी बालसुलभ असल्या पाहिजेत. बौद्धिक विभाग, शारीरिक विभाग, प्रसार विभाग या सर्व विभागांनी बालांच्या दृष्टीने स्वतंत्र विचार करून योजना तयार करणे जरूरीचे असते. मी तर म्हणेन, संपूर्ण देशासाठी आणि शिवाय प्रांताप्रांतांसाठी बालविभागाचे निराळे प्रमुख नेमावेत आणि त्यांना संपूर्णपणे बालांच्या कामावर आणि शास्त्रावर एकाग्रतेने विचार आणि योजना करण्यास सांगावे, इतका हा विषय महत्त्वाचा आहे. सर्वसाधारण योजनेबरोबरच सहज होईल तेवढा कार्यक्रमापुरता बालांचा विचार वास्तविक पुरेसा नाही. त्यासाठी स्वतंत्र कार्यकर्त्यांची योजना करावी इतके हे कार्यक्षेत्र वैशिष्ट्यपूर्ण (Specialised) आहे. आजवर जेथे जेथे असा स्वतंत्रपणे विचार होत राहिला तेथील बालांचे काम संघाला फार मोठे सुपीक ठरले. मशागतीने (नर्सरी) दर्जेदार कार्यकर्ते निर्माण करण्याचे क्षेत्र ठरले. म्हणून या क्षेत्राचा विचार सततपणे एक 'शास्त्र' म्हणून होत राहिला पाहिजे.

संपर्क, एकत्रीकरण, कार्यक्रम आणि गुणसंवर्धन या चारी मोहऱ्यांवर, बालाचे काम करणारांनी दूरचा विचार करून योजना आणि प्रयत्न करीत राहिले पाहिजे. या चार पैलूंचा थोडक्यात आढावा घेणे फार उपयोगी ठरेल :-

१) **बालांशी संपर्क :**

बाहेरची आकर्षणे कितीतरी असतात. शाळेच्या मैदानावरचे खेळ, चित्रपट, दूरदर्शन, चार-सहा बालमित्रांबरोबर गप्पागोष्टी, छंद, नैपुण्यवर्ग याप्रमाणेच दिशाहीन संगतदेखील मुलांना आपल्याकडे खेचीत असते. असे असूनही त्यांनी संघाकडे आकर्षित व्हावे यासाठी सर्वात जास्त प्रभावी ठरणारी गोष्ट म्हणजे 'निरपेक्ष मैत्री!' संघातला गटनायक, गणशिक्षक आपला सगळ्यात जवळचा 'मित्र' असे ज्याला वाटेल तो आपोआप संघाकडे आकर्षित होतो आणि बाकीच्या आकर्षणांवर मात करून संघात रुळतो. स्वतःचे काही फायद्याचे साधून घ्यायचे आहे म्हणून हा माझ्याशी दोस्ती वाढवीत नाही, याची मात्र खात्री पटावी लागते. आणि अशी प्रामाणिक मैत्री करणे सोपे नाही. कोणत्याही परिस्थितीत प्रथम ज्या मित्राची आठवण यावी असा मित्र बनणे, हे कठिण असते. त्यात खूप जबाबदारी असते. ती पत्करायची असते. त्यासाठी जवळून ओळखावे लागते. अडचणीच्या प्रसंगी झीज सोसूनही मित्राची काळजी करावी लागते. संघातले मित्र हे अशा प्रकारचे मित्र आहेत हे लहान मुलांनाही लक्षात येते, आणि मग त्या मैत्रीच्या अतूट धाग्याने ते जुळले तर ते आजन्म टिकून राहतात. हा स्नेहाचा तंतू त्याच्या घरातल्या माणसांच्यापर्यंत पोचला म्हणजे पक्का होतो, आणि मुलांच्या बरोबरच सारे घर संघमित्र बनते. हीच मुले जातील तेथे संघाच्या नावाची द्वाही आपण होऊन फिरवितात. खरोखर संघाचे शेकडो बाल स्वयंसेवक संघाचे अलिखित प्रचारक असतात! असे मैत्रीच्या सूत्राने बांधलेले, कार्यकर्त्यांच्या व्यक्तिमत्त्वाने भारलेले, आपण संघाचे आहोत याचा सार्थ अभिमान असलेले बाल स्वयंसेवक सतत संपर्काने टिकवून ठेवणे ही या कामातली गुरुकिल्ली आहे.

२) **बालांचे एकत्रीकरण :**

बालांना संघाकडे आकृष्ट करण्यासाठी ज्याप्रमाणे वैयक्तिक निर्मळ मैत्रीचा चुंबक काम करतो, तसेच त्यांच्यात सामूहिक भावना उत्पन्न करण्याकरता पथकाभिमान (esprit-de-corps) फार मदत करतो. आपल्या पथकाचा, गटाचा, गणाचा अभिमान हवा, तो सद्‌गुणांच्या बाबतीत. आम्ही सगळेच्या सगळे कोणतेही काम एकत्र करू, आमच्याकडून प्रत्येक काम व्यवस्थित होईल, आम्ही एकमेकांची काळजी घेऊ, आम्ही उत्तम खेळू,

सारेजण मिळून एका कुटुंबासारखे राहू अशी भावना संघाचे संस्कार योग्य तऱ्हेने रुजण्यासाठी फार उपयोगाची ठरते. अशा सामूहिक भावनेमुळे मैत्रीच्या सूत्रातून कुठलाही मणी ओघळला जात नाही. मोठेपणीदेखील बालवयात एकत्र काढलेले दिवस आठवतात, उभारी टिकवतात. अर्थात् पथकाभिमान निरोगी असावा याची जी पथ्ये पाळावी लागतात ती समजून घ्यायला हवीत. ते बंद-वर्तुळ बनता कामा नये, मोठ्या पथकाचे अंग म्हणूनच राहिले पाहिजे-संघाच्या मूळ सर्वसंग्राहक विचारापेक्षा वेगळे बनता कामा नये, याची काळजी घ्यावी लागते. संघात आजवर या मनांच्या एकत्रीकरणाचा प्रयोग फार यशस्वी झाला आहे, आणि त्यातूनच 'नौ मत का एकमत'' करण्याची किमया संघाला साधली आहे. त्याचे वळण लहानपणापासून लावणे हा बालविभागाचा दुसरा महत्त्वाचा पैलू आहे.

**३) बालांचे कार्यक्रम :**

विलक्षण आकर्षक कार्यक्रम हा तर बालशाखेच्या भरभराटीचा गोरस आहे. पण 'आकर्षक' म्हणजे बाहेर ज्यांचे आकर्षण मुलांना वाटते तसेच कार्यक्रम, असा याचा अर्थ नव्हे. व्यवस्थितपणा, शिस्त, काही नियमांत वागणे, काही विचार करायला लावणारे ऐकणे, काहीसे गंभीर विषयाबद्दल बोलणे-वाचणे, सततपणे एखादी गोष्ट आवडीने करणे अशासारख्या पद्धती मुलांना आजकाल नको असतात असे म्हटले जाते. काही अंशी ते खरेही आहे.

पण अनुभव असा आहे की याच गोष्टींची आवड कौशल्याने उत्पन्न करताही येते. ज्या उपक्रमात माणूस स्वतःच्या मनाने सहभागी होतो (involved) त्यातली सगळी शिस्त तो आपण होऊन पाळतो, आणि हे लहान मुलांच्या बाबतीत देखील तितकेच खरे आहे. हा सहभाग मनात उत्पन्न करण्याची खटपट नेहमी करीत रहावे लागते. वैयक्तिक कौशल्याचे खेळ, टोळीच्या श्रेष्ठत्वाचे खेळ, धिंगामस्तीचे खेळ, मोकळ्या उंच स्वरात एकत्र गायलेली गाणी, तरतरीतपणा वाढविणारी संघाची समता-व्यायाम - योग-आसने-मनोरे-स्पर्धा, मन रंगून जाईल असा योगचाप, यासारख्या कार्यक्रमांत मुले किती दंग होतात याचा प्रदीर्घ अनुभव आहे. हे कार्यक्रम कंटाळवाणे होतात असे म्हणणाराला या कार्यक्रमांची गोडी स्वतःलाच कळली नाही असे म्हणावे लागेल.

चुणचुणीत बालांच्या गणात पूर्वी छुरिका शिकवली जात असे. वेत्रचर्माचे द्वंद्व खेळून हातापायावर आणि तोंडावर वेत्राचे फटके खाल्लेले बाल ते वण आजही अभिमानाने वागविताना दिसतील. १९५१-५२ मध्ये प्रथम पुणे शहरात बालांचा घोष तयार केला. चोवीस झांजवाले, दोन ढोलकिये, दोन टोलवाले, दोन शिंगवाले, हातात घोषदंड घेऊन चालणारा आणि त्याच्या संकेतांवरच वादनाचे संचालन करणारा घोषप्रमुख, सगळेच बाल स्वयंसेवक. त्यांचे तालात वाजविणे, त्या तालावर काही पथकांचा योगचाप, काही पथकांचे प्रचलन-दोन्हीला जुळणारा ताल, आणि अशा एक हजार बालांच्या वीस तुकड्यांचे या घोषावर पुणे शहराच्या राजरस्त्यावरून विजयादशमीचे पथसंचलन! सैनिकी रचना वाजविणाऱ्या संघाच्या नेहमीच्या घोषाबरोबर जाणाऱ्या तरुणांच्या संचलनापेक्षाही हे बालांचे पथसंचलन जास्त रसरसलेले (Lively) होते असा निर्वाळा त्यावेळी प्रत्येकाने दिला. तरुणांच्या संचलनात घनगंभीर रणभेरींचा प्रचंड दवदबा होता, पौरुषाचे दर्शन होते, तर बालांच्या या पथसंचलनात स्वावलंबी सहभागी चपळ चैतन्याची उभारी होती. हे केवळ उदाहरण म्हणून लक्षात घ्यायचे.

आता तर बालांचे घोषपथक गावोगावी उभे राहात आहे. अशा कल्पकतेतून सहभागी भावना मुलांमध्ये उत्पन्न करावी लागते आणि मग त्याचे परिणाम विलक्षण प्रभावी असतात हे लक्षात घेतले पाहिजे. स्वतः मनाने अलिप्त, आंबलेला, विटलेला, दुसरे काही करता न येणारा शिक्षक हे करू शकणार नाही. पण स्वतः स्फुल्लिंग असलेल्याला तेच कार्यक्रम बालांना रंगवून टाकतील असे करता येतील, हाच अनुभव आहे. सर्व कार्यक्रमातून धडाडी, निर्णयशक्ती, सामूहिक भावना, उमदेपणा आणि आत्मविश्वास उत्पन्न व्हावा अशी योजना केली, म्हणजे त्याकडे बाल स्वयंसेवक नक्कीच आकर्षित होतात आणि टिकून राहतात.

**४) बालांचे गुणसंवर्धन :**

अ) अगदी महत्त्वाचा गुण साऱ्या प्रयत्नातून उत्पन्न व्हायला हवा तो म्हणजे आपण संघासारख्या कामात लहानपणापासून आहोत याचा सार्थ अभिमान बालांच्या मनात निर्माण झाला पाहिजे. आजच्या काळात संघाच्या स्वयंसेवकाने जेथे जाईल तेथे हिंमतीने संघविचाराचा प्रतिनिधी म्हणून ठाम उभे (assert) राहिले

पाहिजे. हा आत्मविश्वास बालपणापासून रुजला तरच तो तरूणपणी बळावेल. हा केवळ संस्थेचा, आखाड्यातल्या पठ्ठ्यांच्यासारखा अभिमान नव्हे. एक महत्कार्य (मिशन) घेऊन आम्ही निघालो आहोत याची ती सार्थ जाणीव, आणि ती व्यवहारातून झळकली पाहिजे. मी संघाचा स्वयंसेवक आहे हे सांगताना कुणी बिचकू नये, ही येणाऱ्या काळाची गरज आहे, त्याची तयारी बालवयातच व्हावी लागेल.

ब) दुसरी आवश्यकता असते चतुरस्रपणाची. समाजात वावरताना नाना प्रकारचे विषय समोर येतात. त्या निमित्ताने लोकांशी संपर्क येतो. प्रत्येक बाबतीत सगळी माहिती कुणाला असणे शक्य नाही. पण लोकांच्यामध्ये मिसळताना त्यांच्या विषयांवर संघाच्या माणसाला बोलता आले पाहिजे. एकांगी आणि टोकाची भूमिका घेणाराचे लोक स्वागत करीत नाहीत, त्याच्या सांगण्याचा परिणाम अनुकूल होत नाही; ही गोष्ट लक्षात घेऊन बालवयातच संघाच्या स्वयंसेवकाला वेगवेगळ्या विषयांचे सामान्यज्ञान, स्वतः विचार करण्याची सवय, निरनिराळे पैलू समजून घेण्याची उत्सुकता यासारखे वळण लागायला हवे.

क) तिसरा महत्त्वाचा पैलू लहानपणापासूनच पडला पाहिजे तो म्हणजे क्रियाशीलतेचा. संघाच्या स्वयंसेवकांनी शतकानुशतके विस्कळीत झालेल्या लोकांमध्ये संघटनेची भावना निर्माण करून त्यांचे नेतृत्व करावे, अशी अपेक्षा आहे. शहरांतले तीन टक्के आणि खेड्यातले एक टक्का लोक संघात यावेत अशी अपेक्षा डॉक्टर हेडगेवारांनी व्यक्त केली होती. ती इतके स्वयंसेवक संघात येऊन समाजाचे क्रियाशील नेतृत्व करण्यासाठी सक्षम व्हावेत अशा स्वरूपाची होती, केवळ संख्यात्मक नव्हती. स्वतः अत्यंत क्रियाशील असणाराच माणूस इतरांचे विधायक नेतृत्व करू शकतो. संघाचे काम सतत प्रयत्नांनी माणसे घडविण्याचे आहे. आणि जे स्वतः त्या मुशीतून घडले असतील तेच असे काम करू शकतात. म्हणून योजनापूर्वक आणि कष्टपूर्वक कोणतेही काम करण्याची सवय बालवयातच लागायला हवी.

बालविभागाचे काम करणारांना बालांना ही सवय लागण्याकडे सावध लक्ष ठेवले पाहिजे.

ड) चौथा आणि अत्यंत मूलभूत गुण उत्पन्न करावा लागतो तो संघसंस्कारांच्या सर्व बलस्थानांची चांगली ओळख! शिक्षकाच्या व्यक्तिमत्वाने आकर्षित झालेला, संघातल्या कार्यक्रमात रंगून गेलेला, स्वाभाविकपणे प्रगत होत असलेला बाल स्वयंसेवक संघाच्या साऱ्या बलस्थानांच्या आधारावर भक्कमपणे उभा राहील तेव्हाच उत्तुंग कार्य मोठेपणी करून दाखवील. त्याचे मन या सर्व बलस्थानांशी निगडित झाले पाहिजे. कारण पुढची पन्नास वर्षे संघाचे महत्कार्य आजच्या बालांनाच सांभाळायचे आहे!

'असावा-नसावा' या प्रकारची सगळ्या गुणांची जंत्री करण्याचा येथे उद्देश नाही. म्हणून गुणसंवर्धनाचे चार महत्त्वाचे पैलूच नमूद केले आहेत. एकंदर मांडणीही बालांचे काम करणारांसाठी आहे, बालांसाठी नव्हे; आणि हेही मुद्दामच योजून असे मांडले आहे. संघाचा बालविभाग आणि त्याचे कार्य संघाच्या संपूर्ण पद्धतीत अत्यंत महत्त्वाचे आहे आणि त्याचे स्थान 'परिशिष्टाचे' नव्हे, मूळ गाभ्याचे आहे. बाल स्वयंसेवकांची जोपासना हे संघसंस्कारांचे एक विलक्षण प्रभावी बलस्थान आहे, या दृष्टीने त्याकडे सर्व पातळ्यांवर बघितले जावे ही काळाची मागणी आहे.

❑

# १०

संघ ही जर एक पाठशाळा असेल, तर संघशाखेच्या क्षेत्रात वसलेली हजारो सामान्य माणसे ही संघाची प्रयोगशाळा आहे याची जाणीव सतत असली पाहिजे. संघाच्या कामाचे शास्त्रही आहे, तसेच त्यात कलाही आहे. संस्कारांचे शास्त्र, लोकसंग्रहाची कला! प्रयोगशाळा फक्त शास्त्रीय विषयांनाच लागते असे नाही, कलाविषय देखील प्रयोगांच्या आधाराने शिकावे लागतात. आजकाल मानसशास्त्रातसुद्धा प्रयोगांनी शिकवले जाते. जे शिकायचे त्याचा प्रत्यक्ष प्रयोग करून बघितल्याखेरीज पाया पक्का होत नाही. संघातली कला आणि शास्त्र, दोन्हीचा प्रत्यक्ष अनुभव लोकांना आला नाही तर संघ संघापुरताच राहील, आणि लोकांच्या जीवनात संघाच्या विचाराला जागा उत्पन्न होणार नाही. तशी जागा निर्माण झाल्याशिवाय संघाच्या संघटनेच्या कार्याचा प्रभाव देशाच्या सामूहिक वातावरणावर आणि माणसांच्या वैयक्तिक वागणुकीवर होणार नाही. म्हणून **संघाची माणसे संघाच्या अंतर्गत व्यवहारात, आणि बाहेर समाजात, कशी वागतात** ते संघसंस्काराचे अत्यंत महत्त्वाचे दहावे बलस्थान आहे.

भारतमाता आणि भगवा ध्वज या दोन उत्तुंग श्रद्धास्थानांचे, प्रार्थना आणि प्रतिज्ञा या निर्धारांचे, अंतर्गत व्यवस्थेसाठी समजून-उमजून स्वीकारलेल्या अनुशासनात्मक पण कौटुंबिक वातावरणाचे, अधिकाधिक वेळ देऊन आणि कष्ट करून कामाला हातभार लावण्याच्या त्रिविध प्रचारक - पद्धतीचे, आणि या सर्व गोष्टींच्या निर्मितीसाठी उभ्या केलेल्या विलक्षण शाखा-तंत्राचे संस्कार करून, जास्तीतजास्त लोकांना दोन्ही हातांनी जवळ

घेण्यासाठी निघालेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्वयंसेवकांची, रोजच्या जीवनातील वागणूक कशी असते, समाजाच्या प्रयोगशाळेत या सर्व संस्कारांचा प्रयोग ते कसा करतात आणि त्याचे शिक्षण बालपणापासून कसे दिले जाते यावरच संघाच्या प्रभावाचे मोजमाप करता येण्यासारखे आहे. म्हणून हे बलस्थान संघरचनेच्या बाहेरच्या वर्तुळावरचे अतिशय महत्त्वाचे अंग आहे.

**संघाचे सामूहिक दर्शन :**

संघातल्या संस्कारांचे दर्शन सामान्य लोकांना संघाच्या कार्यक्रमांतून, सेवा-कार्यातून आणि नैमित्तिक उपक्रमांमधून होते ही गोष्ट तर काही प्रभाव उत्पन्न करणारी असतेच. संघाचे नेत्रदीपक शारीरिक कार्यक्रम, कार्यक्रमांची व्यवस्था आणि शिस्त, काटेकोरपणा, स्वयंस्फूर्ती या गोष्टींची माणसे वाखाणणी करतातच. सेवाकार्य करताना संघाचे लोक कुठेही चुकारपणा करीत नाहीत, अप्रामाणिक असत नाहीत, उत्कृष्ट संघभावनेने (टीमवर्क) कामे पार पाडतात, भेदभाव ठेवीत नाहीत याचेही लोकांना कौतुक असते. गोवंशाची हत्त्या बंद व्हावी यासाठी केलेली चळवळ, आणीबाणीतल्या सार्वत्रिक गळचेपीचा पद्धतशीर विरोध, विशाल हिंदू संमेलने, प्रचंड शिबिरे, शिशुमंदिरांचे मेळावे, भव्य एकात्मता यज्ञयात्रा, या आणि अशा प्रकारच्या उपक्रमांतून दिसणारे योजनाबद्ध संघटन समाजाला प्रकर्षाने जाणवते. ही माणसे एका ध्येयाने प्रेरित झालेली आहेत, फार चांगल्या आणि आपण होऊन स्वीकारलेल्या शिस्तीची आहेत, सुलतानी किंवा अस्मानी संकटाला पुढाकार घेऊन तोंड देणारी आहेत, याची प्रत्यक्ष दृश्ये लोकांना दिसतात; आणि अशी कामे नीट करावीत तर ती संघवाल्यांनीच, अशी एक सर्वसाधारण माणसाची देखील खात्री होऊन चुकली आहे. समुदायाचे काम एकोप्याने, सचोटीने, व्यवस्थितपणे, योजनापूर्वक आणि देखणेपणाने करण्याबद्दल, संघाच्या संस्कारातून वाढलेल्या मंडळींचे नाव झाले आहे, आणि त्यामुळे विरोधी दृष्टीने पाहणारेदेखील या सर्व बाबतीत संघाचे 'उदाहरण' म्हणूनच उल्लेख करतात, आदर्श मानतात.

**संघाच्या माणसाची ओळख :**

संघाची माणसे एकत्र येऊन कशा तऱ्हेने योजलेली कामे करतात याबरोबरच, संघाचा माणूस व्यक्तिगत व्यवहारात एकटा देखील कसा

वागतो याकडे लोकांचे लक्ष असते. संघातला आहे ना, मग तो अमुक गोष्ट करणारच नाही, आणि अमुक गोष्ट केल्याशिवाय राहणार नाही असा सज्जनतेच्या अंगाने जाणारा विश्वास लोकांच्या मनात वर्षानुवर्षांच्या अनुभवांनी जागा झाला आहे हे अनेकदा आढळून येते. एका राज्यपालांजवळ त्यांच्या काही अंतरंग-मित्रांनी तक्रार केली की 'अहो, तुमचा रक्षक-सचिव (ए. डी. सी.) पोलिस विभागातला अधिकारी आहे, पण तो संघाचा तृतीय वर्ष-शिक्षित स्वयंसेवक आहे म्हणे!' राज्यपाल हसून म्हणाले, 'ते मला माहीत आहे, आणि मला अशाच प्रकारचा माणूस हवा. संघाचे लोक त्यांचे काम चोख करतात-!!' संघाबाहेर सज्जन आणि सद्‌गुणी माणसे नाहीतच असा आत्मसंतुष्टपणाचा (सेल्फ-राइचस्‌नेस) आणि अहंकाराचा अर्थ याबाबतीत लावण्याचे कारण नाही; पण एक गोष्ट मात्र खरी - बाहेर माणसाच्या सज्जनतेबद्दल खात्री वाटू नये असे आज वातावरण उत्पन्न झाले आहे, आणि त्याच्या पार्श्वभूमीवर संघाच्या लोकांबद्दल मात्र उपजतच वाटणारी शाश्वती उठून दिसते! ही खरोखर संघाच्या सहा पिढ्यांच्या कामातून निर्माण झालेली एक विलक्षण मिळकत आहे. दुर्जनच प्रतिष्ठा मिळवून बसले आहेत आणि सज्जनांना दबून बसावे लागत आहे अशी आजची परिस्थिती चहूकडे दिसत असताना, संघाच्या माणसांनी मात्र सामूहिक कामातच नव्हे तर वैयक्तिक वागणुकीतही साधारणपणे मिळविलेला हा लोकांचा विश्वास नजरेआड करता येणार नाही.

**प्रत्यक्ष व्यवहारात? :**

कधीकधी एक प्रश्न मात्र मनात येतो, आणि तो येथे स्वच्छच सांगून टाकलेला बरा. संघसंस्कारांचा लोकांना जीवनात अनुभव आला पाहिजे असे वाटत असेल तर या प्रश्नाला आपण धिटाईने सामोरे गेले पाहिजे. प्रश्नाचा राग न करता, उत्तराचा शोध घेतला पाहिजे.

प्रश्न असा. संघाचा स्वयंसेवकही त्याच्या रोजच्या जीवनात माणूस म्हणून, आणि समाजातला म्हणून, कितीतरी वेगवेगळ्या भूमिकांत वावरतो. प्रत्येक ठिकाणी केवळ संघातले चार सद्‌गुण दर्शवीत, संघाचा माणूस म्हणूनच केवळ त्याला वागायचे नसते. एकाच वेळी मुलगा, बाप, भाऊ, नवरा, सासरा यासारखी एखादी भूमिकाही त्याची असते. तसेच तो गिऱ्हाईक, व्यापारी, कामगार, मालक, शेतकरी, अधिकारी, प्रशासक,

वकील, डॉक्टर, शिक्षक, विद्यार्थी अशापैकीही काहीतरी असतोच. त्याचप्रमाणे त्याची सामाजिक संस्थांमध्येसुद्धा सदस्य, कार्यकर्ता, पदाधिकारी, अशासारखीदेखील भूमिका असते. हे केवळ विविध नमुने म्हणून उल्लेख केले. या नाना प्रकारच्या भूमिकांमध्ये त्याचा सर्वसाधारण माणसांशी संबंध येत असतो – त्यांच्या भूमिका कधी त्याच्याशी जुळणाऱ्या असतात, कधीकधी संघर्षाच्याही असतात. अशा रोजच्या धकाधकीत संघाचा माणूस कसा वागतो? त्याचा संघाच्या संस्कारांशी संबंध असतो की नाही? असावा की नाही? संघात माणसे जवळ करण्याकरता, त्यांचे व्यक्तिमत्त्व फुलविण्याकरता तो जसा स्नेहाने, प्रेमाने, उदार मनाने, न्यायाने, हळुवारपणाने, सहकार्याने वागतो, जी आपुलकी, निस्वार्थी मित्रता, सरळपणा, सज्जनता त्याच्या वागण्यात संघातल्या लोकसंग्रहासाठी असते त्याच गोष्टींचा अनुभव त्याच्या बाहेरच्या वेगवेगळ्या भूमिकांमध्येही लोकांना येतो की नाही? यायला हवा की नाही? की या सगळ्या गोष्टी संघाबाहेरच्या जगात जाताना कोट काढून ठेवावा तशा काढून ठेवून, संघाच्या माणसानेही इतरांसारखेच अनुदारपणे, अन्यायाने, कठोरपणाने भयंकर आपमतलबीपणाने वागायचे? 'व्यवहारात असे चालत नाही, व्यवहारात असे वेगळेपणाने वागावेच लागते, अखेर मला धंदा करायचा आहे, आपली कामे करून घेण्याकरता अशी दडपणे आणावीच लागतात, अखेर हुंडा घरच्यांच्या हट्टासाठी अडवून मागावाच लागतो, शेवटी मजूर - ते - मजूरच, त्यांच्याशी असेच वागावे लागते, कोण करीत नाही भ्रष्टाचार, त्या चक्रात बाहेर राहून चालत नाही,–' ही आणि अशा प्रकारची समर्थने करीत करीतच संघाचा माणूस जर आपल्या व्यक्तिगत जीवनातल्या निरनिराळ्या भूमिकांत वागत राहिला तर लोकांनी काय समजायचे? संघातली शिकवण, संघातली वागणूक बाहेर प्रत्यक्ष 'व्यवहाराला' उपयोगाची नाही असा याचा अर्थ होईल की नाही? संघातल्यासारखीच सगळी माणसे बाहेर नसतात त्यामुळे अगदी तसाच प्रतिसाद बाहेर मिळेल असे नव्हे; पण बाहेर ज्याला सामान्य माणूससुद्धा वावगे समजतो ते तरी संघवाल्याच्या हातून होऊ नये ही जाणीव आपण ठेवावी की नाही? संघातल्या वैयक्तिक सद्‌गुणांचा, संस्कारांचा, लोकसंग्रही कौशल्याचा अनु॰ संघाच्या माणसाच्या बाहेरच्या व्यवहारातदेखील लोकांना आला पाहिजे की नको? संघात निर्माण होणाऱ्या व्यक्तिगत चारित्र्याचा लोकांना अनुभव

यायला हवा की नाही? फक्त प्रश्न उभा केला आहे. त्यात कुणाचाही वैयक्तिक अधिक्षेप नाही. पण या प्रश्नावर नेहमी विचार केला पाहिजे, या दृष्टीने आपले वागणे वारंवार तपासून पाहिले पाहिजे असे संघात नेहमी सांगितले गेले आहे. आपला व्यवहार हे संघाचे खरोखरच बलस्थान व्हायला हवे असेल तर या नाजुक गोष्टींचे चिंतन नेहमी करीत राहिले पाहिजे अशीच संघात अपेक्षा व्यक्त केली गेली आहे. म्हणून हा प्रश्न संघाच्या संस्कारातूनच उत्पन्न होतो, हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

**समन्वयाची शिकवण :**

आपण हिंदू संस्कृतीचे रक्षण आणि संवर्धन करण्याची प्रतिज्ञा घेतली आहे; त्या संस्कृतीचे प्रमुख देखणे वैशिष्ट्य म्हणजे कोणताही प्रश्न 'नष्ट करून' संपविण्याची कल्पना आपल्याला बरी वाटत नाही. जीवनात प्रत्येक गोष्टीला दोन बाजू असतात, काही प्रमाणात दोन्ही बरोबर असतात, दोन्हीकडे काही अतिरेक होतात. त्यातून 'समन्वय' साधीत साधीत लोकांचे जीवन सुरळीतपणे चालावे, अशी आपल्या संस्कृतीची कल्पना आहे. माणसांनी एकमेकांशी समंजसपणाने वागावे, शक्तिवानाने दुबळ्यावर, धनवानाने गरीबावर, बुद्धिवानाने अज्ञान्यावर अन्याय आणि कुरघोडी करू नये, त्याची पिळवणूक करून आपला फायदा साधण्याचा प्रयत्न करू नये, 'एकमेकां सहाय्य करू' अशा वृत्तीने रहावे अशी आपल्या संस्कृतीची शिकवण आहे.

आणखी तपशीलाने या बाबतीत ज्याचा त्याने अभ्यास अवश्य करावा. पण अशा शिकवणीच्याच आधारावर कुणी कसे वागावे, कुणाचे कर्तव्य काय, याचे संकेत ठरवून देणाऱ्या अशा आपल्या धर्माचे रक्षण करायला आपण निघालो; मग आपल्या रोजच्या व्यवहारात आपल्याला आपल्या धर्माच्या आणि संस्कृतीच्या मूळ भूमिकेप्रमाणे एकमेकांशी वागायला नको का? हेच संघातले बाळकडू असते. व्यापाऱ्याने रोजच्या जीवनात मात्र भांडवलदारी पद्धतीने वागायचे, मालकाने अरेरावी करायची, मजुरांनी कामचुकारपणा करायचा, वरपित्याने वधूपक्षाला नाडायचे, अशा प्रकारच्या सगळ्या गोष्टी ज्याने त्याने आपल्या व्यक्तिगत जीवनात करीतच रहायचे - आणि संघाच्या चार भिंतीच्या आत मात्र समन्वयाच्या आणि संस्कृतीच्या गोष्टी बोलायच्या, हा दंभ ठरेल! संघाच्या आचारविचारात अशा

दुटप्पीपणाचे कधीच समर्थन केले जात नाही. म्हणूनच संघाच्या संस्कारातले **'प्रत्यक्ष जीवनात संघविचाराप्रमाणेच वागणे'** हे फारच मोठे बलस्थान आहे. ते नीट सांभाळले गेले पाहिजे. कारण त्याखेरीज सामान्य लोकांना संघाच्या संस्कारांची प्रत्यक्ष अनुभवाने ओळख व्हायची नाही, आणि तशी ती झाल्याशिवाय लोकांना आपण होऊन संघाजवळ यावेसे वाटावे इतका विश्वास बळावणार नाही. संघाचा विचार, संघाचे संस्कार, आणि सर्वसाधारण समाज, यांच्यामधला मुख्य दुवा म्हणजे संघाचा माणूस! तो निरनिराळ्या भूमिकांमध्ये लोकांशी कसा वागतो हे म्हणूनच अत्यंत महत्त्वाचे आहे; आणि याची काळजी घेण्याची शिकवण, हा संघातला फार मोठा संस्कार आहे. शेकडो ज्येष्ठ कार्यकर्त्यांच्या वागणुकीतूनच हा संस्कार संघात केला जातो, आणि आजवरचा त्याबद्दलचा प्रयत्न पुष्कळच आशादायक झाला आहे. जे घडले पाहिजे असे संघाचे म्हणणे आहे, त्याची कल्पना लोकांना प्रत्यक्ष वागणुकीतूनच येऊ शकणार, म्हणून या दहाव्या बलस्थानाचे महत्त्व असाधारण आहे.

❑

# ११

या सर्व दहा आधारस्तंभांवर तोललेली संघकार्याची इमारत केवळ एखाद्या संस्थेची 'संपत्ति' म्हणून कार्यालये थाटून बसण्यासाठी उभी केलेली नाही हे उघडच आहे. पूजनीय डॉक्टर हेडगेवारांचे सांगणे असे की, परकीयांचे राज्य अनेक वर्षे आपल्या देशावर राहिले म्हणून आपण कमजोर झालो, हे म्हणणे तितकेसे खरे नाही! खरोखर आपला समाज आधी विस्कळीत झाला, दुबळा झाला, म्हणून त्यामुळे इंग्रजांना येथे राज्य बळकावण्याचे फावले!! म्हणजे इंग्रजांची सत्ता हे आपल्या दुरवस्थेचे 'कारण' नसून, तो आमच्या दुर्बलतेचा 'परिणाम' होता!! म्हणून आपल्या समाजातील कोट्यावधि लोकांना संघटित करायचे, आणि त्यांच्या मनावर राष्ट्रीयत्त्वाचे संस्कार घडवून आणायचे यासाठी संघाचा प्रारंभ करण्याच्या वेळेपासूनच, डॉक्टरांच्या मनातली भूमिका स्पष्ट होती की जसजशी संधि येईल तसतसा लोकांच्या सामूहिक आणि व्यक्तिगत जीवनाचा प्रत्येक पैलू 'राष्ट्रीय' स्वयंसेवकत्वाने विकसित करायचा आहे. हे राष्ट्र परम वैभवाला नेण्यासाठी जे जे करणे आवश्यक आहे ते ते सगळे आम्ही करणार आहोत, याबद्दल संघात कधी कुणाला शंका नव्हती आणि नाही.

**संघाला मिशा आल्या! :**

संघाचे एके काळचे सरकार्यवाह आणि वर्धा जिल्ह्यातील संघाच्या कामाचे आधारस्तंभ कै. अप्पाजी जोशी यांची एक आठवण मौजेची आहे. संघाची पस्तीस-चाळीस वर्षे उलटून गेलेली असताना एकदा कुणीतरी प्रश्न

विचारला की, 'पूर्वी संघ अमुक अमुक कामे करीत नव्हता, आता ती कामे संघाची माणसे करू लागली. कुठे राजकारणांत, कुठे शिक्षणात, वनवासी सेवाकार्यात असे संघाचे लोक शिरकाव करू लागले हे कसे काय? म्हणजे संघ बदलला, संघाने डॉक्टरांच्या वेळच्या मर्यादा सोडून दिल्या, हे कसे?' त्यावर अप्पाजी हसून म्हणाले, 'पूर्वी लहानपणी संघाला मिशा नव्हत्या, जशा लहान मुलाला नसतात; आता वयाप्रमाणे संघाला मिशा फुटल्या!!' यावर हंशा पिकला; आणि मग अप्पाजींनी समजावून सांगितले – 'असे पहा, या सगळ्या गोष्टी सुरुवातीपासूनच आपण करायला लागलो असतो, तर त्यातच गुंतून पडण्याची आणि मूळ व्यक्तिनिर्माणाच्या कामाकडे दुर्लक्ष होण्याची भीती होती, म्हणून डॉक्टरांनी आपले अवधान सुटू दिले नाही. त्यांना या सर्व पैलूंची संपूर्ण जाणीव होती इतकेच नव्हे, तर त्यावर संघविचारांचा प्रभाव आपण उत्पन्न करायचा हे स्वच्छ त्यांच्या डोळ्यासमोर होते. पण काही वर्षे झाड वाकडेतिकडे वाढू नये आणि गुराढोरांनी ओरबाडू नये म्हणून त्याला आपण कुंपण घालतो की नाही? तशा मर्यादा जाणून बुजून पत्करलेल्या होत्या. - - - - -

'आता शक्ति वाढत आहे,आत्मविश्वास वाढत आहे, त्यात मुख्य तत्त्व काही सोडले किंवा बदलले असे नाही; मात्र एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की हे काम जे उभे केले आहे ते अमुक वर्ज्य, तमुक निषेधाचे, अमक्याचा काही संबंध नाही, तमुकशी आम्हाला काय करायचे, अशी बंधने घालून घेण्यासाठी नाही! 'परं वैभवं नेतुम् एतत् स्वराष्ट्रम्' या आपल्या उदात्त ध्येयासाठी जे जे करणे हिताचे आणि आवश्यक असेल ते ते आपण करणार. अखेर संपूर्ण समाजाला निरोगी आणि बलवान करायचे असेल, तर त्याच्या सर्व अंगांशी आपल्याला घुसळण करावीच लागेल, आणि ती आपण करणार! प्रश्न फक्त योग्य वेळेचा आणि तयारीचा असतो. हा परिवार वाढता आहे, आणखी वाढतच जाणार तो. त्यासाठी स्वाभाविक ते सारे आपण करणार!'

**निसर्गाचा क्रम :**

हा प्रसंग तपशीलाने अशासाठी दिला की **'संघ-परिवार'** ही गोष्ट कालक्रमाप्रमाणे एक अत्यंत प्रभावी बलस्थान म्हणून कशी स्वाभाविकपणे विकसित होत गेली, त्याची स्पष्ट कल्पना यावी. एखाद्या फळझाडाचे रोपटे

आपण मातीत लावतो, रुजवितो, त्याची मशागत करतो, त्यावेळी एकदम त्याच्या फळांची वाट पाहात नाही! हळूहळू ते जमिनीतून वर डोकावू लागते, मग बळ धरते.

तरीसुद्धा काही दिवस त्याची पुरेशी वाढ होईपर्यंत ते नीट वाढावे म्हणून आपण त्याला जाळीचे कुंपण घालतो. त्याचा बुंधा बळकट होऊ लागला, त्याला पाने-फुले येऊ लागली, म्हणजे हळूहळू फांद्याही फुटतात, काही वर्षांनी फळेही येतात; मग त्याला कुंपणाची गरज नसते. फक्त कुणी कुऱ्हाडच घेऊन त्याच्या मुळावरच घाव घालीत नाही ना, एवढे पहावे लागते. मग तो वृक्ष फळा-फुलांनी डंवरतो, हिरवीगार छाया देतो, पर्यावरणात सहयोग करतो.

**हाडात मुरलेला रोग :**

संघ-परिवाराचा विकास अशा अत्यंत नैसर्गिक पद्धतीने होत आला आहे, असे आपल्या ध्यानात येईल. डॉक्टर हेडगेवारांनी आपल्या देशाच्या परिस्थितीबद्दल एक वेगळाच दृष्टिकोन त्यावेळी मांडला. सर्वसाधारणपणे तेव्हा असे म्हटले जात असे की आपल्या देशावर आक्रमणकारी इंग्रज शासन करू लागले, त्यानी आपल्यामध्ये फूट पाडली, आपली बुद्धि भ्रष्ट केली, त्यामुळे आपला देश कमजोर झाला आणि आपण पारतंत्र्यात खितपत पडलो. म्हणजे आपल्या कमजोरीचे कारण काय, तर इंग्रजांचे राज्य; असा समज त्यावेळी सगळीकडे होता आणि मोठमोठे पुढारीदेखील असेच मांडीत असत. पण डॉक्टरांना हे म्हणणे पूर्णपणे बरोबर वाटत नव्हते. ते म्हणाले, इंग्रजांचे राज्य आपल्या देशात रुजले-वाढले-टिकले तो आपल्या सामाजिक कमजोरीचा परिणाम होता. आपण सर्व दृष्टींनी दुर्बळ झालो, आपल्यातला बंधुभाव नाहीसा झाला, हेवेदावे वाढले, राष्ट्रीय जागृति उरली नाही; या सर्व गोष्टींमुळे इंग्रजांचे फावले आणि तागडी घेऊन आलेला साहेब आपल्या एवढ्या मोठ्या प्रचंड देशावर राजदण्ड पेलू लागला! म्हणजे इंग्रजांचे राज्य हे आपल्या कमजोरीचे 'कारण' नसून, तो आपल्या दुबळेपणाचा 'परिणाम' आहे असे डॉक्टर म्हणत असत. साहजिकच उपाय केला पाहिजे तो ही दुर्बलता नाहीशी करण्यासाठीच, केवळ इंग्रजाला घालविण्यासाठी नव्हे, असे मूलगामी विचार त्यांनी मांडले होते. आपल्या देशाच्या रोगाचे हे वेगळे निदान पूजनीय डॉक्टरांनी केले, ते किती अचूक होते ते आता सिद्ध झाले आहे.

**सामूहिक आकांक्षा :**

अर्थातच इंग्रजांचे राज्य जाऊन आपले शासन प्रस्थापित झाले म्हणजे आपोआप सगळी कमजोरी नष्ट होईल असे नाही. स्वातंत्र्य आल्यामुळे अनेक गोष्टी आकाराला आणण्याचे अधिकार आपल्या हातात आले हे उत्तमच झाले, परंतु त्या सर्वच क्षेत्रांमध्ये खणखणीत राष्ट्रवाद रुजवायचा असेल, तर संघसंस्कारांनी भारलेली आणि आपल्या राष्ट्राला पुनः श्रेष्ठत्व मिळवून देण्याची सामूहिक आकांक्षा मनात बाणविलेली लाखो माणसे विविध क्षेत्रात पसरली पाहिजेत, ही स्वातंत्र्यानंतर आवश्यकच गोष्ट होती. इतरांनी त्याकडे फार दुर्लक्ष केले, परंतु संघाने मात्र हा नाना कार्यक्षेत्रातला विकास मोठ्या काळजीकाट्याने वाढवीत नेला आहे. 'संघ-परिवार' ही संकल्पना त्यातूनच स्वाभाविकपणे विकसित होत चालली आहे. ही मूळ संघविचाराचे प्रगतिशील विकसन (Progressive Unfoldment) करण्याची प्रक्रिया गेली काही वर्षे मोठ्या योजकतेने समाजाच्या सर्व पैलूंमध्ये फुलविली जात आहे, हे संघसंस्कारांचे नैसर्गिक प्रत्यक्षीकरण (Manifestation) घडविले जात आहे. 'संघ कल्पनेचा स्वाभाविक विकास' हे असे संघसंस्कारांचे आज एक जबरदस्त बलस्थान झालेले आहे.

**एकदम अखिल भारतीय स्वरूप :**

संघाची शिकवण घेऊन समाजाच्या जीवनातील निरनिराळ्या कामांमध्ये आपण गेलो की तेथेही खूप नव्या गोष्टी शिकायला मिळतात. गेली जवळजवळ सात शतके आपल्या समाजात आपण संघाचे काम नेटाने करीत आहोत; माणसे बदलली तरी झेंडा पडू देणार नाही अशा जिद्दीने हजारो कार्यकर्ते विविध क्षेत्रात आज काम करीत आहेत. एक गंमत अशी आहे की आपण कोणतेही नवे क्षेत्र निवडून त्यात काही कार्य उभे करण्याचे ठरविले की त्या कामाला अखिल भारतीय स्वरूप यायला आता फारसा वेळ लागत नाही. कारण साठ-पासष्ट वर्षांच्या सतत प्रयत्नांमधून संघाचा विचार आणि कार्य-व्यवस्था आता संपूर्ण देशभर व्यवस्थित रुजलेली आहे, आणि त्यातून आता चांगली पाचपन्नास कार्ये संघपरिवारात सामावली आहेत. ही निरनिराळ्या क्षेत्रातली कामे करताना आपले संघातले संस्कार, आणि प्रत्यक्ष लोकांच्या जीवनातले ताण-तणाव या दोन्हीची सांगड घालून काही देखणे काम करून दाखविण्याचा आपला प्रयत्न आहे.

**मुळातली मशागत मात्र हवीच :**

पण. एक गोष्ट मात्र ध्यानात ठेवणे आवश्यक असते. विविध क्षेत्रात होत असलेली कामे, ही जर संघ-परिवाराच्या वृक्षाची फुले-फळे आणि डंवरदार हिरवी पाने असतील, तर त्यांची ती टवटवी कायम राहण्यासाठी झाडाच्या मुळाशी खतपाणी घालण्याकडे आपले दुर्लक्ष होऊन चालणार नाही. संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते नेहमी या गोष्टीकडे आपले लक्ष वेधीत असतात. परवाच कुणीतरी म्हटले – 'आता चार राज्यांमध्ये आपले शासन आहे, तेव्हा अमुक-अमुक गोष्टी आपण करून घ्याव्यात - - -' त्यावर माननीय आबाजी थत्ते लगेच म्हणाले – 'राज्य आपले नव्हे, भारतीय जनता पक्षाचे राज्य! राज्यशासन ही भाजपची जबाबदारी, आणि ते त्यांचे क्षेत्र आहे. हे केवळ एक उदाहरण म्हणून सांगितले. असेच परिवारातील सर्व प्रकारच्या विविध कार्यांचे आहे. आपण संघाचे कार्यकर्ते त्यांना आवश्यक ते सहाय्य करतोच, मात्र प्रत्येक कार्याचे क्षेत्र निराळे, आणि संघाची सर्व परिवाराकडून मुख्य अपेक्षा एवढीच की संपूर्ण जोर आपल्या मूलभूत उद्देशाच्या पूर्ततेसाठीच लागावा. संघाचे म्हणून आपले स्वतंत्र आणि वेगळे वैशिष्ट्यपूर्ण असे जे काम आहे, ते आपण करीतच राहिले पाहिजे कारण तोच सर्व परिवाराचा गाभा आहे!'

**सगळे संघ विचारालाच पूरक :**

परिवारातली सर्व प्रकारची कार्ये त्या त्या क्षेत्रात आपल्या विचाराला अनुसरून काही भरीव काम करण्यासाठी आपण उभी केली आहेत, आणि ते ते कार्यकर्ते त्यावर तपशीलवार विचार आणि योजना करून देशात आणि परदेशातही कामे करीत आहेत. मात्र आपली अशी भूमिका आहे की संपूर्ण परिवाराचा अंतिम उद्देश स्पष्ट आणि एकच आहे, तो म्हणजे 'परं वैभवं नेतुम् एतत् स्वराष्ट्रम् !' आपल्या पवित्र आणि श्रेष्ठ हिंदू संस्कृतीवर आधारलेले आपल्या राष्ट्राचे जीवन स्वावलंबी, पराक्रमी आणि चैतन्यसंपन्न झाले पाहिजे ही आपली सर्वांची आकांक्षा आहे. तेव्हा परिवारातल्या प्रत्येक कार्यामध्ये या आपण हृदयाशी धरलेल्या उत्तुंग ध्येयाचेच हित पाहिले जावे अशी आपली स्पष्ट धारणा आहे. संघाचे मूलभूत काम जास्तीतजास्त लोकसंग्रह करून, त्यांना योग्य ते राष्ट्रीय संस्कार देण्याचे आहे; त्याला पोषक असेच वातावरण संपूर्ण समाजामध्ये उत्पन्न व्हावे अशी परिवारातील प्रत्येक कार्याची भूमिका असावी, हीच अपेक्षा आहे.

**कोणी वगळायचा नाही :**

माननीय श्री. एकनाथजी रानडे म्हणत असत, 'समाजात मी फक्त दोनच प्रकार मानतो – एक म्हणजे जे आज संघाचे स्वयंसेवक आहेत ते, आणि दुसरा जे उद्या स्वयंसेवक होणार आहेत त्यांचा! कधी ना कधी संघाच्या संस्कारातून समाजातला प्रत्येकजणच प्रेरणा घेणार आहे यावद्दल मला शंका वाटत नाही.' इतके सर्वांना सामावून घेणारे संघाचे काम अत्यंत मूलगामी असल्यामुळे संघाला कुणीही वर्ज्य नाही, कुणालाही वगळायचे नाही. अगदी विरोधी असला तरीही त्याच्या मनात संघसंस्कारांच्या सर्व बलस्थानांची जाण आज ना उद्या आपण उत्पन्न करू अशी सर्व समाजाला दोन्ही हात पसरून जवळ घेण्याचीच भूमिका आहे. परिवारातल्या प्रत्येक कार्यात हे असेच असेल असे नाही, परंतु संघाच्या कामाचे हे वैशिष्ट्य आपण अत्यंत काळजीपूर्वक जोपासले पाहिजे अशीच संघाची सतत शिकवण आहे, हे आपण विसरू शकत नाही!

**येणारे रचना-पर्व**

येणाऱ्या काळात आपल्या देशाच्या इतिहासात एक नवे 'रचना-पर्व' आकाराला येणार आहे, त्याची सुचिन्हे गेल्या दहा वर्षात दिसू लागली आहेत. ते हिंदू-प्रवोधनाचे पर्व आहे. हिंदुत्व हा कुणाच्या विरोधासाठी उभा झालेला संकुचित विचार नसून भारताचीच नव्हे तर संपूर्ण विश्वाची पुनर्रचना आणि समतोल सांभाळण्याची त्या विचारामध्ये कुवत आहे, तिच्या पाठीशी संघ परिवाराची शक्ति आपण उभी करीत आहोत. संघाची एक निश्चितच उजळ प्रतिमा लोकांच्या मनात अत्यंत परिश्रमांनी उत्पन्न झालेली आहे; आपल्या महन्मंगल प्रार्थनेतील आपल्या 'हिंदुराष्ट्रांगभूताः' या अस्मितेला यापुढच्या काळात आपल्याला मूर्त स्वरूप द्यायचे आहे. हिंदुत्व ही विधायक रीतीने समाजाला कात टाकून पुनः झळझळीत तेज आणू शकणारी प्रेरणा आहे, त्यातूनच संपूर्ण परिवार एकाच दिशेने पुढच्या काळात मार्गक्रमण करणार आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या या सर्व संस्कारांतून विलक्षण जागृति आणि क्रियाशीलता निर्माण करण्याचे महत्कार्य पुढच्या दशकात आपण करणार आहोत, आणि संघ-परिवार त्या संस्कारांचे एक प्रभावी बलस्थान आहे.

**आपली उत्तुंग आकांक्षा :**

या संपूर्ण लेखमालेत संघसंस्कारांच्या अकरा बलस्थानांची ओळख सामान्य उत्सुक वाचकाला व्हावी याच प्राथमिक उद्देशाने संघाच्या कामाचा प्राण असलेल्या या संस्कारांची मांडणी केली आहे. परमपूजनीय सरसंघचालक श्री. बाळासाहेब देवरस यांनी गेल्या विजयादशमीच्या महोत्सवातील भाषणात व्यक्त केलेली भावना येथे शेवटी नमूद केली म्हणजे त्यात सर्व आले –

''हिंदू हा एक सभ्य, उदार, निर्भय आणि पराक्रमी समाज आहे असा त्याचा ठसा सर्वत्र उमटला पाहिजे. असा समाजच हिंदुत्वाचे मानवकल्याणकारी तत्त्वज्ञान पेलू शकतो. असा समाजच सज्जनांना अभय आणि दुष्टांना धाक उत्पन्न करू शकतो. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने ६६ वर्षांपूर्वी असा समाज बनविण्याचे ध्येय स्वीकारूनच जन्म घेतला आहे. हा ध्येयवाद सतत अंतःकरणात जागता ठेवून, संघाचे कार्यकर्ते आता समाजजीवनाच्या विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत झाले आहेत. समाजाविषयीच्या आत्यंतिक आत्मीयतेने, स्वार्थनिरपेक्षतेने, परिश्रमाने आणि हिंमतीने ते कार्य करीत असल्यामुळे त्या त्या क्षेत्रात त्यानी आपला प्रभाव निर्माण केला आहे. राष्ट्रबांधणीच्या आणि आपले उदात्त तत्त्वज्ञान व्यवहारात आणण्याच्या संघाच्या या कार्याला सर्वांचे हातभार लागावेत (हीच काळाची गरज आहे.)''

REFBK-0026855

मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे
निबंध 3५१८
दा. क्र. २६८५५
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

मूल्य रु. १५/-

# आमची प्रकाशने

१) **भारतातील ख्रिस्ती संप्रदाय : रा.स्व. संघाची भूमिका**
डॉ. श्रीपती शास्त्री — रु. ५/-

२) **भारतमाता पूजन पोथी**
पां. कृ. सावळापूरकर — रु. ४/-

३) **भारतातील प्राचीन विद्यापीठे**
मो. दि. पराडकर — रु. १०/-

४) **आपल्या समाजाचे भवितव्य**
द. बा. ठेंगडी — रु. ४०/-

५) **दलित समस्या एक विचार**
द. बा. ठेंगडी — रु. ३/-

६) **मुस्लिम मानस (तरंग-अंतरंग)**
मुझफ्फर हुसैन — रु. ४०/-

**भारतीय विचार साधना, पुणे**